# वृषाली जोशी

# अंतोन चेकॉव्ह

## लघुकथासंग्रह



# चेकॉव्हच्या कथा

मूळ लेखक – अंतोन चेकॉव्ह

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# चेकॉव्हच्या कथा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

**आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.**

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# चेकॉव्हच्या कथा

## लेखक : अंतोन चेकॉव्ह

## अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २ जानेवारी २०२१

©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

चेकॉव्हच्या कथा

कथांचा क्रम

अंतोन चेकॉव्ह

१ एका कारकुनाचा मृत्यु

२ मर्दानगी

३ विद्यार्थि

४ हद्दपार

५ झोपाळू

६ आवडती

७ वाग्दत्त वधू

८ छोटा कुत्रा बरोबर असलेली बाई

# अंतोन चेकॉव्ह



अंतोन पॅव्हलोविच चेकॉव्ह हा थोर रशियन लेखक १८६० मध्ये रशियात जन्मला व १९०४ मध्ये जर्मनीमध्ये क्षयरोगाने म्रृत्यु पावला. त्याच्या कथांमध्ये वरवरच्या क्षुल्लक गोष्टींवर भर देत, तो कल्पक, भावनामय असे एक प्रकारचे विशिष्ट वातावरण तयार करतो. त्या काळच्या रशियाचे यथार्थ वर्णन त्याच्या कथांमधून ठळकपणे समोर येते. मानवी मनाचा तळ गाठणारे असे हे वर्णन असते.


या पुस्तकात त्याच्या आठ कथा आहेत. 'एका कारकुनाचा मृत्यू' ही कथा त्या काळच्या कनिष्ठ दर्जाच्या लोकांना त्यांच्या

वरिष्ठांची व नोकरी जाऊन जी दुरावस्था होईल, त्याची किती भीती, काळजी व दुःख वाटत असे याचा अचूक मागोवा घेते. 'मर्दानगी' या कथेत, गरीबीचे आयुष्य जगतांना नाईलाजाने कायदा मोडणाऱ्या गुन्हेगाराला न्यायाधीश कसा त्याच्या परिस्थितीचा विचार न करता, जे एका अर्थाने बरोबर वाटते, कडक शिक्षा देतो, हे गुन्हेगाराच्या तोंडच्या खुसखुशीत भाषेत सांगितले आहे. 'विद्यार्थी' या कथेत तो आपल्याला सेंट पीटरचे येशूबद्दलचे प्रेम नाकारणे हे उमराव मंडळींनी गोरगरीबांना धिक्कारण्याचे प्रतिक असल्याचे दाखवून, मानवी मनाची सत्ये कशी अनादी काळापासून आजपर्यंत अदृष्य धाग्याने जोडली गेली आहेत, ते जाणवून देतो. 'हद्दपार' या कथेत सैबेरियाला हद्दपारीची शिक्षा भोगणाऱ्यांचे अटळ प्राक्तन सांगितले आहे. केवळ सगळया इच्छा आकांक्षा सोडूनच इथे जगणे शक्य असल्याचे दाखवले आहे. 'झोपाळू' कथेतील मुलगी दुष्कृत्य करण्यास तयार होण्याची दयनीय पार्श्वभूमी उभी करण्यात लेखक यशस्वी झाला आहे. 'आवडती' तील कथानायिका अजिबात कणखर व्यक्तिमत्व नसलेली, प्रेमळ व जगण्यासाठी सतत दुसऱ्यावर अवलंबून असलेली दाखवली आहे. तर 'वाग्दत्त वधू' ची नायिका बरोबर त्याउलट, स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा शोध घेण्यास निघालेली आहे. तिचा जीवनप्रवाह बदलणारे हे वळण

ती साशाच्या मदतीने मिळवू बघते. ‘छोटा कुत्रा बरोबर असलेली बाई’ ही चेकॉव्हची गाजलेली कथा असून, यात नेमक्या शब्दात भावनिक गुंतागुंतीचा पट मांडून, बाकी सगळे वाचकांच्या कल्पनाशक्तीवर सोडले आहे.

# The Death Of a Clerk

# एका कारकूनाचा मृत्यु



एका छान संध्याकाळी, कार्यालयातील चांगला व्यवस्थापक इव्हान चेर्व्हियाकोव्ह स्टॉलमधील दुसऱ्या ओळीत बसून चष्मा घालून, 'कॉर्नव्हीलच्या घंटा' हे नृत्यनाट्य बघत होता.

चष्मा लावून ते बघतांना त्याला आनंदाच्या अत्युच्च्य शिखरावर असल्यासारखे वाटत होते. पण अचानक, हा 'पण

अचानक’ गोष्टीत नेहमी येतो. लेखकांचे बरोबर असते. आयुष्य नेहमी अतर्क्य गोष्टींनी भरलेले असते. अचानक त्याचा चेहरा सुरकुततो. डोळे गरागरा फिरू लागतात. श्वास थांबतो. तो चष्मा काढून ठेवतो. तो पुढे वाकतो आणि आक् --- छी! तो शिंकतो. कुणालाही, कुठेही शिंकायला बंदी नसते. शेतकरी शिंकतात, पोलीस इन्स्पेक्टर शिंकतात, नगरसेवकही शिंकतात. प्रत्येकजण शिंकतो. चेर्व्हियाकोव्हला त्याची जराही लाज वाटली नाही. त्याने रुमालाने नाक पुसले आणि तो नम्र माणूस असल्याने त्याने आजूबाजूला पाहिले, की आपल्या शिंकेमुळे कुणाला त्रास तर झाला नाही ना. त्याला असे दिसले, की त्याच्या पुढच्या ओळीत बसलेला म्हातारा त्याच्या हातमोज्यांनी त्याची मान व डोक्याचे टक्कल पुसत होता आणि काहीतरी पुटपुटत होता. चेर्व्हियाकोव्हने त्याला दळणवळणाच्या शाखेत काम करणारा जनरल ब्रिझहॅलोव्ह म्हणून ओळखले.

चेर्व्हियाकोव्हने विचार केला, ‘मी त्याच्या अंगावर शिंतोडे उडवले. तो माझा वरिष्ठ नाही. इतरत्र नोकरी करतो. पण तरीही, हे लाजिरवाणे झाले. मला माफी मागितली पाहिजे.’

चेर्व्हियाकोव्ह खोकला. पुढे वाकला आणि जनरलच्या कानात कुजबुजला, “महाशय, मला माफ करा. मी चुकून तुमच्या अंगावर शिंकेचे शिंतोडे उडवले.”

“ठीक आहे. असू दे.”

“दया दाखवून, मला माफ करा. मला असे काही करायचे नव्हते.”

“ओहो! खाली बसा मला नृत्यनाट्य बघू द्या.”

चेर्व्हियाकोव्हला लाज वाटली. तो मूर्खासारखा हसला व रंगमंचाकडे बघू लागला. तो बघू लागला पण त्याला पूर्वीइतके छान वाटेना. काळजीने तो पोखरून निघाला. मध्यंतरात तो ब्रिझहॅलोव्हच्या जवळ गेला. त्याच्या भोवती फिरून, त्याचा भित्रेपणा मागे टाकत, कुजबुजला,

“महाशय, मला माफ करा. मी चुकून तुमच्या अंगावर शिंकेचे शिंतोडे उडवले. मला --- मला असे मुळीच --- “

जनरल त्याचा खालचा ओठ दाबत, वैतागून म्हणाला, “अरे, जाऊदे. मी ते कधीच विसरून गेलो. तू मात्र ते अजून धरून बसला आहेस.”

जनरलच्या डोळ्यात संशयाने बघत, चेर्व्हियाकोव्हने विचार केला, ‘त्याच्या डोळ्यात काही सदिच्छा दिसत नाही. त्याला

बोलायचेही नाही आहे. मला खरेच, असे करायचे नव्हते. पण काय करणार! ते नैसर्गिक होते. नाहीतर त्याला वाटेल, की मी मुद्दाम असे केले. आता त्याला असे वाटत नसले, तरी पुढे मागे --- !’

घरी आल्यावर चेर्व्हियाकोव्हने त्याच्या बायकोला जनरल ब्रिझहॅलोव्हच्या गर्विष्ठपणाबद्दल सांगितले. त्याला वाटले की त्याच्या बायकोने तो प्रसंग काही फारसा मनावर घेतला नाही. ती थोडी घाबरली, पण नंतर तो नवऱ्याचा वरिष्ठ नसल्याचे ऐकून, तिचा जीव भांड्यात पडला.

ती म्हणाली, “पण तुम्ही जाऊन, त्याची माफी मागितली पाहिजे.”

“तेच तर! मी त्याची माफी मागितली. पण तो नंतर विचित्र वागला. घड काही बोलला नाही. आणि नंतर काही बोलायला वेळच झाला नाही.”

दुसऱ्या दिवशी चेर्व्हियाकोव्हने केस कापले, नवीन गणवेष घातला. तो जनरल ब्रिझहॅलोव्हच्या घरी स्पष्टीकरण देण्यासाठी गेला --- त्याच्या हॉलमध्ये खूप अर्जदार बसले होते. त्यांच्याशी बोलून जनरलने चेर्व्हियाकोव्हकडे नजर वळवली.

चेर्व्हियाकोव्ह बोलला, “महाशय, तुमच्या लक्षात असेल, तर काल नृत्यनाट्य बघतांना, मी चुकून तुमच्या अंगावर शिंकेचे शिंतोडे उडवले. मुद्दाम नव्हे --- “

“ती किरकोळ बाब आहे --- देवाला माहिती आहे.”

पुढच्या अर्जदाराकडे वळून, जनरल बोलला, “मी तुम्हाला काय मदत करू शकतो?”

फिका पडून चेर्व्हियाकोव्हने विचार केला, ‘तो काही बोलत नाही. म्हणजे तो रागावलेला आहे --- नाही. हे असे अर्धवट सोडून देता येणार नाही --- मी त्याला स्पष्ट करेन.”

जेव्हा शेवटच्या अर्जदाराबरोबर जनरलचे संभाषण संपले, तेव्हा जनरल आतल्या खोलीत गेला. चेर्व्हियाकोव्हही त्याच्यापाठोपाठ जाऊन, पुटपुटु लागला,

“मी तुम्हाला त्रास देतो आहे, असे वाटत असेल, तर ते तसे नाही. मी हे पश्चात्तापदग्धतेने बोलतो आहे. सर, तुम्हालाही हे माहिती आहे, की मी हे मुद्दाम केलेले नाही.”

जनरलने रडका चेहरा करून, ‘हे आता थांबव’ असा हात वर केला. तो दारामागे अदृष्य होत म्हणाला, “सर, तुम्ही नक्कीच विनोद करत आहात.”

चेर्व्हियाकोव्हने विचार केला, ‘हा कुठल्या प्रकारचा विनोद आहे? हा कुठल्याही प्रकारचा विनोद नाही. या जनरलला अजून काही समजत नाही! हे जर असे असेल, तर या अती शहाण्याची मी क्षमा मागणार नाही. त्याचे वाटोळे का होईना! पण मी आता त्याच्याकडे येणार नाही. अजिबात येणार नाही. मी त्याला पत्र लिहीन.’

घरी जाता जाता चेर्व्हियाकोव्हने असा विचार केला. पण त्याने पत्र लिहिले नाही. त्याने खूप विचार केला. पण पत्रात काय लिहायचे, ते त्याला कळेना. मग दुसऱ्या दिवशी त्याने स्वतःच जाऊन, स्पष्टीकरण द्यायचे ठरवले.

जनरलने त्याचे प्रश्नार्थक डोळे, त्याच्याकडे वळवले, तेव्हा तो गुणगुणल्यासारखे बोलू लागला, “महाशय, मी काल तुम्हाला त्रास द्यायला आलो होतो. तुम्ही खुषीने जे म्हणालात, तसा तो विनोद नव्हता. मी चुकून तुमच्या अंगावर शिंकेचे शिंतोडे उडवले. मुद्दाम नव्हे. त्याबद्दल मी माफी मागतो --- मी कधीच याकडे विनोद म्हणून बघितले नाही. मी तुमच्याबरोबर विनोद करायचे धाडस करेन का? आपण विनोद करू लागलो, की आपल्याला व्यक्तींबद्दल काही आदर रहात नाही --- जाऊ दे --- “

निळा पडून थरथर कापत जनरल बोलला, “बाहेर चालू लाग.”

“काय, सर?” भीतीमध्ये बुडून जात, कुजबुजत्या सुरात चेर्व्हियाकोव्हने विचारले.

त्याचा पाय आपटून, जनरल म्हणाला, “बाहेर चालू लाग.”

चेर्व्हियाकोव्हच्या पोटात ढवळले. काही न पाहता, काही न ऐकता, तो दाराकडे वळला. बाहेर पडून पसार झाला. यांत्रिकपणे घरी पोचला. गणवेष न काढता, सोफ्यावर पडला आणि मेला.

The Malefactor

# मर्दानगी



कोर्टात वरिष्ठ वकीलासमोर एक बारीकसा, फाटका व फार गबाळा शेतकरी उभा होता. खटल्याची सुनावणी चालली होती. त्याच्या अंगावर कॅलीकोचा शर्ट व ठिगळे लावलेली पँट होती. त्याच्या तोंडावर वण होते. केस वाढून चेहऱ्यावर आले होते. त्याच्या जाड केसाळ भुवयांमधून, जेमतेम दिसणारे त्याचे डोळे त्याची वाईट पण ठाम मनस्थिती दर्शवत होते. डोक्यावरील न

विंचरलेल्या, वाढलेल्या केसांचे जंगल कोळयासारखा ताठरपणा दाखवत होते. तो अनवाणी पायाने आला होता.

वकिलाने सुरवात केली, "डेनिस ग्रीगोरीव्ह, जवळ येऊन माझ्या प्रश्नांची उत्तरे दे. सतरा जुलैला रेल्वेचा वॉचमन सेम्योनोव्हीच अकिनफोव्ह याने, सकाळी रूळ तपासत असतांना, एक्याणवाव्या खांबाशी तुम्हाला रूळ जोडणारे स्क्रू उचकटतांना पाहिले. हे बघा, हे नट हातात असलेल्या तुम्हाला त्याने पकडले. असेच झाले का?

"काय?"

"अकिनफोव्हने सांगितल्याप्रमाणेच सर्व झाले का?'

"नक्कीच."

"छान! आता सांग, तू असे का करत होतास?"

"काय?'

"हे तुझे काय काय थांबव आणि प्रश्नांची उत्तरे दे."

"जर मला त्यांची गरज नसती, तर मी तसे केले नसते."

"काय गरज होती?"

"आम्ही ते गळ जड करण्यासाठी वापरायचो."

"आम्ही कोण?"

“आम्ही म्हणजे क्लीमोव्हो शेतकरी.”

“हे बघ भावा, ऐक. मूर्खपणा करू नको. शहाण्यासारखे बोल. गळ जड करण्यासाठी वापरायचो, वगैरे काही खोटेनाटे सांगू नको.”

डेनिस त्याचे डोळे मिचकावत पुटपुटला, “मी आजपर्यंत आयुष्यात कधी खोटे बोललो नाही आणि आता मी खोटे बोलेन का? महाशय, गळाशिवाय आपले चालेल का? जर तुम्ही हुकाला एखादा किडा किंवा छोटा मासा लावलात, तरी तो गळाला काही जड लावल्याशिवाय खाली कसा जाईल? आणि म्हणे खोटे बोलतो” --- “पुढे तो मूर्खासारखे बोलला, “गळाला लावलेले जिवंत आमिष वरच तरंगत राहिले, तर तुमच्या गळाच्या काठीचा काय उपयोग आहे? पाईक मासा व बरबोट मासा हे नेहमी पृष्ठभागावर नव्हे, तर खोल तळाशी असतात. तिथे ते त्या आमिषाचा चावा घेतात. पृष्ठभागावर फक्त गोबीसारखे मासे, असले तर असतात. पण ते नदीत रहात नाहीत. त्यांना मोठी जागा आवडते.”

“तू मला गोबीबद्दल कशासाठी सांगतो आहेस?”

“का? पण तुम्हीच तर विचारले. समाजातील चांगले लोक तसेच मासे पकडतात. फ्रान्सच्या खाडीमध्ये सुद्धा मुले गळाला

काही जड लावल्याशिवाय मासे पकडायला जात नाहीत. अर्थात, कोणी मूर्ख असेल तरच फक्त --- "

"म्हणजे तुला असे म्हणायचे आहे, की तू हे स्क्रू उचकटून गळाला लावत होतास?"

"नाहीतर मग काय? बोटे वाजवण्यासाठी वापरत होतो का?

"पण तुला त्यासाठी थोडेसे शिसे, बंदुकीची गोळी किंवा काही प्रकारचे खिळे वापरता आले असते."

"शिसे असे कुठीही सापडत नाही. ते विकत घ्यावे लागते. नटसारखे चांगले दुसरे काही नाही. तो जड असतो व मध्ये भोकही असते."

"तो इतके मूर्खपणाचे नाटक करतो आहे. जसे काही तो कालच जन्माला आला आणि चंद्रावरून पडला. ए बुद्दू माणसा, तुला हे कळत नाही का, की जर वॉचमनला ते दिसले नसते, तर गाडी रूळावरून घसरली असती. लोक मेले असते. तू त्याना ठार केले असतेस."

"देवानेच मला असे होण्यापासून रोकले. मी लोकांना का मारेन? मी काय घर्म न मानणारा माणूस आहे? की खलनायक आहे? सर, मी देवाचे आभार मानतो, की माझ्यामुळे माणसे मेली नाहीत. असले विचार सुद्धा आमच्या डोक्यात येत नाहीत.

स्वर्गातील देवांनो, आमच्यावर कृपा करा आणि आम्हाला वाचवा. सर, तुम्ही आम्हाला कसे वाचवणार?”

“तुला काय वाटते, गाडीला अपघात कशामुळे होतात? दोन तीन स्क्रू आणि नट काढून, तुझा स्वतःचा अपघात झाला असता?”

डेनिस बावळटासारखे हसला आणि अविश्वासाने डोळे बारीक करून, वकिलाकडे बघू लागला.

एवढी वर्षे गावातील सर्व लोक रुळांचे स्क्रू आणि नट काढत आले आहेत. पण देवाने आम्हाला वाचवले. आणि आता अपघात? --- लोक मरणे? --- जर मी रूळ काढले असते किंवा रुळावर लाकडाचा मोठा ओंडका ठेवला असता, तर गाडी कलंडली असती. पण एवढ्याश्या स्क्रू आणि नटने --- छे!”

“पण तुला हे समजले पाहिजे, की नट्समुळे रूळ सांधले जातात.”

“आम्हाला ते समजते --- आम्ही काही सगळे काढत नाही --- काही ठेवतो --- आम्ही इतका अविचार करत नाही --- आम्हाला तेवढे समजते --- “

डेनिस जांभई देऊन तोंडासमोर क्रॉस काढतो.

वकील म्हणतो, “मागच्या वर्षी एक गाडी रूळावरून घसरली होती. आता मला ती का घसरली, ते कारण कळते आहे —-- “

“काय म्हणालात, सर?”

“मी म्हणालो मागच्या वर्षी एक गाडी रूळावरून का घसरली ते --- मला आता समजले.”

“दयाळू वकीलांनो, त्यासाठीच तुम्ही शिक्षण घेतलेले असते. मग तुम्हाला समजणारच. कुणाला समजायला पाहिजे, ते देवाला कळते --- इथे तुम्ही कसे आणि काय बघत बसला आहात! पण वॉचमनही शेतकऱ्यासारखाच माणूस आहे. त्याला काही कळत नाही. तो तुमची मानगूट पकडून --- तुम्हाला खेचून काढतो. कारण नंबर एक तो विचार करतो व --- तुम्हाला खेचून काढतो. ते म्हणतात, “काय पण शेतकऱ्याचे डोके! आणि काय पण त्याचे विचार! --- न्यायाधीश महाराज, हे पण लिहा की त्याने मला दोनदा पाडून माझे दात पाडले आणि माझ्या छातीवर गुद्दे हाणले.”

“त्याने तुम्ही असलेल्या जागेमध्ये शोध घेतला, तेव्हा त्याला उचकटलेला दुसरा एक नट सापडला --- तो तू केव्हा उचकटलास?

“लहान लाल पेटीखालील, असे तुम्हाला म्हणायचे आहे का?”

“तो कुठे सापडला, ते मला माहिती नाही. तो तू केव्हा उचकटलास?”

“मी नाही उचकटला. एक डोळावाल्या सेमयॉनचा मुलगा इग्नाश्का, त्याने मला तो दिला. म्हणजे लहान पेटीखालचा. आणि तो अंगणातील गाडीखाली आहे, तो मी मीट्रोफॅनबरोबर उचकटला होता.”

“मीट्रोफॅन पेट्रॉव्ह?”

“ --- तुम्ही त्याचे नाव कधी ऐकले नाही का? तो जाळी बनवून, चांगल्या सुस्थितीतील लोकांना विकतो. त्याला पण असल्या प्रकारचे नट लागतात. साधारण प्रत्येक जाळ्यासाठी डझनभर लागत असावेत.”

“ऐक. गुन्हेगारी कायद्यातील कलम एक हजार एक्याऐंशी प्रमाणे, मुद्दाम केलेल्या रेल्वेच्या नुकसानासाठी, रेल्वेने होणाऱ्या वहातुकीच्या नुकसानीसाठी, बेकायदेशीर कृत्यासाठी, शिक्षा होते. त्या नुकसानाचा परिणाम अपघातात होऊ शकतो. हे तुला समजले का? हे स्क्रू उचकटल्याने, तुला सक्तमजुरीची शिक्षा होऊ शकते, हे लक्षात घे.”

“हे सगळे तुम्हालाच माहिती असेल. आम्ही तर बोलून चालून अडाणी लोक! आम्हाला काय माहिती असणार?”

“तुला सगळे काही समजते. तू खोटे बोलतोस आणि अडाणीपणाचे सोंग घेतोस.”

“मी का खोटे बोलेन? माझ्यावर विश्वास नसेल, तर गावात कुणालाही विचारा. गळाला जड काही लावले नाही, तर काही मासे मिळणार नाहीत --- सर्वात भिकार असणारे लहान मासेदेखील गळाला लागणार नाहीत.”

“अरे मूर्खा, गप्प बस --- “

तिथे शांतता पसरते. डेनिस एका पायावरून, दुसऱ्या पायावर रेलतो. हिरव्या कापडाने आच्छादित टेबलाकडे बघत रहातो. आणि जणू त्याला ते दिसत नसून, सूर्याकडे बघत असून, ताण आल्यासारखे डोळे मिचकावत रहातो. वकील भराभर लिहितो आहे.

थोड्या शांततेनंतर डेनिस विचारतो, “मी जाऊ का?”

“नाही. तुला पकडून, तुरुंगात टाकायचे आहे.”

डेनिस डोळे मिचकवायचे थांबवतो आणि त्याच्या जाड भुवया उचलून, प्रश्नार्थक नजरेने बघत रहातो.

“म्हणजे? तुम्हाला काय म्हणायचे आहे? --- तुरुंगात? महाशय, मला वेळ नाही. मला जत्रेला जायचे आहे. शिवाय यागोरकडून डुकराचे तीन रुबल्स वसूल करायचे आहेत --- “

“गप्प बस. मला त्रास देऊ नकोस --- “

“तुरुंगात --- जर खरे काही कारण असते, तर मी गेलो असतो --- पण इतक्या क्षुल्लक गोष्टीसाठी? --- का म्हणून? मी काही चोरले नाही. मी काही मारामारी केली नाही --- आणि तुम्हाला मी कर्जबाजारी आहे, असा काही संशय असेल, तर त्या वॉचमनवर विश्वास ठेऊ नका --- कुणातरी नोकरीत कायमस्वरुपी असलेल्या माणसाला विचारा --- तो वॉचमन भिकार माणूस आहे. त्याला विचारू नका.”

“बकबक एकदम बंद!”

डेनिस पुटपुटतो, मी आहे हा असा आहे. मी शपथेवर सांगतो, की वॉचमनकडील हिशेब म्हणजे खोटेपणाचा कळस आहे. आम्ही तीन भाऊ आहोत. कुझ्मा ग्रीगोरीव्ह, येगोर ग्रीगोरीव्ह आणि मी डेनिस ग्रीगोरीव्ह.”

वकील ओरडला, “तू मला नीट काम करू देत नाही आहेस. ए सेमयॉन, याला घेऊन जा.”

दोन नेमलेले शिपाई त्याला घेऊन जातांना, डेनिस पुटपुटत रहातो, “आम्ही तीन भाऊ आहोत. भावाकरता उत्तर देण्यास भाऊ बांधील नाहीत. कुझ्मा काही पैसे देणार नाही. डेनिस, तुलाच वकिलाला जबाब द्यावा लागेल. आमचा आधीचा मालक, जनरल मेला. त्याच्या आत्म्याला शांती लाभो. तो असता, तर त्याने तुम्हाला चांगले सुनावले असते. तुम्ही कसेही तर्क लढवत आहात, नीट जाणतेपणे नव्हे. तुम्ही पाहिजे तर मला चाबकाने फोडून काढा. पण हे तुरुंगात टाकणे --- बरोबर नाही.”

The Student

# विद्यार्थी



पहिल्यांदा हवा चांगली होती. काळे पक्षी गात होते आणि जवळील दलदलीत, काही जिवंत हलकासा रडका सूर उमटला. सुतारपक्षी केकाटला व त्याचा आवाज वसंत ऋतुतील हवेत आनंदाने, जोरात घुमला. पण जेव्हा जंगलात काळोख पसरला, तेव्हा पूर्वेकडून गार, बोचरा, नकोसा वारा वाहू लागला. सर्वत्र शांत झाले. बर्फाची टोके साठलेल्या पाण्यापर्यंत पोचली. जंगल

सुने सुने, स्वागतोत्सुक नसलेले, रिकामे झाले. हिवाळा आल्यासारखे वाटू लागले.

इव्हान वेलीकोपोलस्की, चर्चमध्ये रहाणारा विद्यार्थी, तेथील कामगाराचा मुलगा, पाणीदार कुरणामधून घरी परतत होता. त्याची बोटे गोठली होती आणि त्याचा चेहरा वाऱ्याने फटकारला जात होता. त्याला वाटत होते, की ही थंडीची लाट नेहमीचा शिरस्ता सोडून, अचानक आली आहे. त्यामुळे सगळ्या निसर्गातील सुसंवाद नाहीसा झाला आहे. त्यामुळे अंधारही लवकर पडला. त्याच्या आजूबाजूला कुणी नव्हते व खास पुसट दिसू लागले होते साधारण दोन मैलावर असलेल्या गावात नदीजवळील बागेत, फक्त दिवा जळत होता. गार व अंधारी संध्याकाळच्या पोटात सर्व काही बुडून गेले होते. विद्यार्थ्याच्या लक्षात होते, की जेव्हा त्याने घर सोडले, तेव्हा त्याची आई हॉलसमोरील जमिनीवर बसलेली होती. तिच्या पायात काही नव्हते व ती चहाचे भांडे साफ करत होती. वडील स्टोव्हवर शेकताना खोकत होते. आज गुड फ्रायडे असल्याने, उपास असल्याने, घरी स्वयंपाक नव्हता. त्याला फार भूक लागली होती. आता इतक्या थंडीतून आल्यामुळे, विद्यार्थ्याला वाटले की असाच वारा सम्राट पीटरच्या वेळीही वहात असेल का आणि तेव्हाही अशीच रानटी गरिबी आणि भुकेचे थैमान असेल का?

अशीच गळणारी छपरे असतील का? असेच अज्ञान आणि क्रोध असेल का? आसमंतात भरून राहिलेला असाच भकासपणा व अंधार असेल का? जुलूम व छळवणूक असेल का? हे सगळे भयंकर प्रकार होते आणि पुढेही रहातील. अजून हजारो वर्षांनी, आयष्य याहून चांगले नसेल. त्याला घरी जावेसे वाटेना.

बागांना खिडक्या म्हणत असत कारण त्याना आई आणि मुलगी नावाच्या दोन खिडक्या असत. आगीने गरम होत होते. काटक्या जळताना आवाज येऊन, नांगरलेल्या जमिनीवर उजेड पडला होता. उंच, जाड, म्हातारी विधवा वासिलीसा पुरुषाचा कोट घालून, उभी होती आणि विचारात हरवून उदासीनतेने, आगीकडे बघत होती. तिची छोटीशी, चेहऱ्यावर वांग व थोडी मूर्ख छटा असलेली मुलगी लुकेरया जमिनीवर बसून, भांडी घासत होती. घोड्यांना नदीवर नेऊन, पाणी पाजणाऱ्या स्थानिक नोकरांचे पुरुषी आवाज येत होते. त्यांनी नुकतेच जेवण संपवले होते.

विस्तवाजवळ येत विद्यार्थी बोलला, “परत थंडी सुरु झाली. शुभ संध्याकाळ!”

वासिलीसा दचकते. पण त्याला ओळखून, आल्हादकपणे हसते.

ती म्हणते, “मी तुला ओळखलेच नाही. देव तुझे भले करो. तू श्रीमंत मनुष्य होशील.”

ते बोलत रहातात. तिने आधी ओली दाई म्हणून व नंतर सेविका म्हणून सभ्य लोकांकडे काम केलेले असते. तिचे बोलणे नाजूक व सभ्य असते. तिच्या चेहऱ्यावरून मर्यादाशील हसणे, कधी जात नाही. नवऱ्याने मारझोड केलेली तिची गावठी मुलगी, लुकेरया विद्यार्थ्याकडे आगीने डोळे दिपल्यासारखी फक्त शांतपणे बघत रहाते. तिचे हावभाव मुक्या बहिऱ्यासारखे, विचित्र असतात.

त्याचे हात आगीजवळ नेत विद्यार्थी म्हणतो, “अशाच तऱ्हेने पीटरने एका गार रात्री, स्वतःला उब मिळवली होती. म्हणजे तेव्हाही थंडी होती. ओहो, ती कसली भयाण रात्र होती! आजी, ती फारच लांब आणि उदास रात्र होती.”

तो आजूबाजूला अंधारात बघतो आणि आक्रमक झाल्यासारखा डोके हलवून विचारतो,

“तुम्ही बाराव्या चर्चमध्ये असाल, अशी मी अपेक्षा करतो.”

वासिलीसा म्हणते, “हो.”

शेवटच्या जेवणाच्या वेळी, तुम्हाला आठवत असेल, पीटर येशूला म्हणाला होता, “मी तुझ्याबरोबर यायला तयार आहे.

तुरुंगात आणि मृत्युतही" आणि देव त्याला म्हणाला, 'मी तुला सांगतो पीटर, त्या दिवशी तू मला ओळखतोस, असे तीन वेळा नाकारण्यापूर्वी, कोंबडा आरवणार नाही.' जेवणानंतर येशू मरणकल्पनेने सुन्न होऊन, बागेत प्रार्थना करत होता. बिचारा पीटर आतल्या आत खलास होत होता. तो अशक्त झाला. त्याचे डोळे जड झाले. त्याला झोप आवरेना. तो झोपला. मग त्याच रात्री तुम्ही ऐकल्याप्रमाणे, जुडास येशूचे चुंबन घेतो आणि त्याला वधस्तंभाकडे घेऊन जातो. त्याला मुख्य धर्मगुरूकडे जावेच लागते. तो मार खातो. असे बघा, दुःखाने, रागाने व झोपेच्या अभावी, पीटर दमतो. पृथ्वीवर काहीतरी भयंकर घडणार आहे, असे त्याच्या लक्षात येते --- तो येशूवर वेड्यासारखे प्रेम करत असतो. आता तो लांबून बघतो की ते कसे त्याला फोडून काढत आहेत --- "

लुकेरया हातातले चमचे टाकून देते आणि विद्यार्थ्याकडे नजर रोखून बघत रहाते.

तो पुढे चालू ठेवतो, "ते मुख्य धर्मगुरूपाशी येतात. येशूला प्रश्न विचारण्यात येतात. मध्यंतरीच्या काळात थंडी असल्यामुळे, नोकर अंगणात आग पेटवतात आणि उब घेऊ लागतात. पीटर त्यांच्याबरोबर आगीजवळ उभा राहून, उब घेऊ लागतो. एक बाई

त्याला बघून म्हणते, ‘हा माणूस सुद्धा येशूबरोबर होता.’ याचा अर्थ, त्यालाही न्या आणि प्रश्न विचारा. आगीजवळील सर्व नोकर त्याच्याकडे संशयाने पाहू लागतात आणि त्यातील एकजण म्हणतो, “मला हा मनुष्य माहिती नाही. थोड्या वेळाने परत कोणीतरी त्याला येशूचा शिष्य म्हणून ओळखून म्हणते, “तू त्यांच्यापैकी आहेस.”. पण तो ते नाकारत रहातो. तिसऱ्या वेळी कुणीतरी त्याच्याकडे वळून म्हणते, “मी आज तुला त्याच्याबरोबर बागेत पाहिले का?” तिसऱ्यांदा तो नकार देतो. तेव्हाच बरोबर कोंबडा आरवतो. लांबवरील येशूकडे बघून, पीटरला येशूचे जेवणाच्या वेळेचे शब्द आठवतात. ते आठवत रहातात --- त्या धक्क्यातून तो सावरतो. अंगणातून बाहेर जातो. आणि कटुतेने विलाप करतो. चर्चमधील शिकवणीत असे म्हटले आहे, ‘तो बाहेर जातो. खूप शोक करतो. मी त्याची कल्पना करू शकतो. फार, फार अंधारी व शांत बाग असते. शांततेत अस्पष्टपणे मुसमुसणे ऐकू येते ---

विद्यार्थी एक सुस्कारा टाकून, विचार करू लागतो. वासिलीसा अजून हसत असते. पण मध्येच अचानक तिचा घसा दाटून येतो व गालावरून खूप मोठे अश्रु गळू लागतात. ती जणू तिला रडण्याची लाज वाटत असल्यासारखा, धगीपासून तिचा चेहरा हाताच्या कपड्याने दूर करते. लुकेरया अजूनही एकटक

विद्यार्थ्याकडे बघत असते. अचानक ती थांबते. तिचे हावभाव जड ओझे दिल्यासारखे व आतल्या आत दुःख दाबल्यासारखे होतात.

नोकर नदीवरून परत येत असतात. त्यातील घोड्यावर बसलेला एकजण आधीच जवळ आलेला असतो. आगीचा उजेड त्याच्यावर पडतो. परत काळोख दाटून येतो व त्याचे हात गार पडतात. विद्यार्थी त्या विधवांना शुभ रात्री म्हणतो आणि चालू पडतो. भयाण वारा वहात असतो. खरेच हिवाळा आलेला असतो. दोन दिवसावर इस्टर आला आहे, असे वाटत नसते.

आता विद्यार्थी वासिलीसाचा विचार करत असतो. ती शोक करत होती, तर त्याचा अर्थ असा होता, की त्या भयानक रात्री पीटरवर जो प्रसंग गुदरला, त्याच्याशी तिचा काहीतरी संबंध होता ---

तो मागे वळून बघतो. अंधारामध्ये, एकाकी अग्नीज्वाळा लपलपत असतात. त्याभोवती आता लोक दिसत नाहीत. विद्यार्थी परत असा विचार करतो, की वासिलीसा शोक करत होती व तिची मुलगी त्रासली होती. तर मग अर्थात त्याने आताच त्या दोघींना जे सांगितले, ते एकोणीस शतके आधी घडलेले होते, त्याचा वर्तमानकाळाशी --- त्या दोघींशी --- आणि त्या रीत्या

गावाशी, त्याच्याशी, सर्व लोकांशी काही संबंध होता. जर म्हातारी बाई शोक करत होती तर ते काही, तो भावनेला हात घालणारी गोष्ट सांगू शकत होता, म्हणून नव्हे, तर पीटर तिच्या जवळचा होता आणि त्याच्या मनावर काय परिणाम झाला, याबद्दल तिला रुची होती म्हणून!

अचानक त्याच्या मनातून आनंदाची लहर दौडत गेली. क्षणभर थांबून, त्याने श्वास घेतला. त्याने विचार केला, भूतकाळ हा सलग घटना साखळीने वर्तमानाशी जोडलेला असतो. त्याने साखळीच्या एका टोकाला स्पर्श केल्यावर, दुसरी हलली.

त्याने जेव्हा बोटीतून नदी ओलांडली, आणि मग डोंगरावर जाऊन त्याचे रहायचे गाव पाहिले, पश्चिमेकडील सूर्यास्ताची थंड अरुंद, किरमिजी किनार पाहिली, तेव्हा त्याने विचार केला की कसे सौदर्याने व सत्याने मानवी आयुष्याला बागेत व श्रेष्ठ धर्मगुरूच्या अंगणात मार्गदर्शन केले आहे आणि ते आजपर्यंत सलग चालले आहे. प्रसंगापरत्वे ती मनुष्याच्या आयुष्यातील मुख्य गोष्ट आहे. सर्वसामान्यपणे पृथ्वीवर, तारुण्याची भावना --- तो फक्त बावीस वर्षांचा होता --- व्यक्त करता येणार नाही, इतक्या गोड अनोळखी, गूढ आनंदाने त्याचे हृदय भरून टाकले. त्याला आयुष्य सुखी, आश्चर्यकारक व अर्थगर्भित वाटू लागले.

# In Exile
# हद्दपार



टोपणनाव स्पष्टोक्ता असलेला म्हातारा सेमयॉन आणि ज्याचे नाव कुणाला माहिती नाही असा तरुण टार्टार, दोघे मोठ्या आगीच्या कडेला बसले होते. इतर तीन बोटवाली माणसे झोपडीच्या आत होती. वाकलेला व तोंडाचे बोळके झालेला, साधारण साठीचा पण रुंद खांद्यांचा, सेमयॉन अजून तब्येत राखून असलेला दिसत होता. तो प्यायलेला होता. तो खरे तर फार वेळापूर्वीच झोपायला गेला असता. पण त्याच्या खिशात बाटली होती आणि त्याला भीती वाटत होती की झोपडीतील लोक त्याच्याकडे व्होडका मागतील. टार्टार आजारी होता, त्याने स्वतःला चिंध्यांमध्ये गुरफटून घेतले होते. सिंबीरस्क राज्यामध्ये

किती चांगले होते आणि कशी त्याने हुशार व सुंदर बायको घरी ठेवली आहे, ते तो सांगत होता. तो पंचविशीचा होता. त्याहून जास्त नाही. आणि आता आगीच्या उजेडात, तो दुःखी चेहऱ्याचा अशक्त मुलगा दिसत होता.

स्पष्टोक्ता म्हणत होता, "इथे काही स्वर्ग नाही, हे स्पष्टच आहे. तू स्वतःच बघ. उजाड किनारे, सगळीकडे वाळू आणि अजून काही नाही --- इस्टर केव्हाच होऊन गेला. पण अजून नदीवर बर्फ तरंगतो आहे. आज सकाळी बर्फ पडला."

टार्टार म्हणाला, "हे वाईट आहे. वाईट!" त्याने भीतीने आजूबाजूला पाहिले.

त्यांच्यापासून दहा पाऊलांवर अंधारी थंड नदी वहात होती. ती झिजलेल्या वाळूच्या किनाऱ्यावर जोराने आपटत, आवाज करत होती आणि वेगाने दूरवरच्या समुद्राला मिळण्यासाठी धावत होती. किनाऱ्याजवळ एक सपाट तळ असलेली मोठी बोट अंधारात उभी होती. बोटवाले तिला बॅरिग म्हणत. पलीकडील किनाऱ्यावरील दिवे, सापासारखे वळवळत, उघडमिट होत होते. हे मागील वर्षीचे गवत जाळणे चालले होते. ते चमचम करून पुन्हा अंधारमय होत होते. छोटे बर्फाचे खडे बोटीवर आपटत होते. ओलसर, गार ---

टार्टारने आकाशाकडे पाहिले, घरी जितका अंधार होता, तितकाच अंधार भोवताली होता. जितक्या चांदण्या घरी चमकत होत्या, तितक्याच चांदण्या इथेही आकाशात चमकत होत्या. पण काहीतरी कमी होते. घरी सिंबीरस्क राज्यामध्ये चांदण्या अशा नव्हत्या. आकाशही असे नव्हते. तो परत बोलला, "हे वाईट आहे. वाईट!"

"तुला त्याची सवय होईल." असे म्हणून स्पष्टोक्ता हसला. "तू अजून तरुण, मूर्ख व अननुभवी आहेस. तुला मूर्खासारखे, असे वाटते आहे, की तुझ्याइतके दुःखी कोणीच नाही. पण एक वेळ अशी येईल, की तू म्हणशील, "देवा, प्रत्येकाला असे आयुष्य दे,"

टार्टारने आगीमध्ये अजून लाकडे घातली व तो त्याजवळ सरकून म्हणाला,

"माझे वडील आजारी आहेत. जेव्हा त्यांच्या मृत्यू होईल, तेव्हा माझी आई व बायको इथे येतील. त्यांनी तसे वचन दिले आहे."

स्पष्टोक्ता विचारता झाला, "तुला इथे त्यांची काय गरज आहे? अरे भावा, हा सैतान तुला गोंधळवतो आहे. त्याच्याकडे लक्ष देऊ नकोस. त्याचे ऐकू नकोस. तो तुला बाईच्या मोहात

पाडेल. पण तू त्याला जखमी कर. तो तुला स्वातंत्र्य देतो असे म्हणेल, पण तू बळकट रहा. तुला कोणाचीही गरज नाही. वडील नको, आई नको, बायको नको, स्वातंत्र्य नको, सामानही नको! तुला कसलीही गरज नाही. सगळे खड्ड्यात जाऊदे.''

स्पष्टोक्ता बाटलीतील एक घोट प्यायला आणि बोलू लागला,

''माझ्या आवडत्या भावा, मी साधासुधा शेतकरी नाही. मी वाईट, धसमुसळा आहे. मी जेव्हा स्वतंत्र होतो व कुर्स्कमध्ये रहात होतो, तेव्हा मी कोट घालून, इकडेतिकडे फिरत असे. आणि आता मी अशा अवस्थेला येऊन पोचलो आहे, की मी गवत खाऊन, जमिनीवर नागडा झोपू शकतो. देवाने प्रत्येकाला असे आयुष्य द्यावे. मला कसली गरज नाही. आणि मी कुणाला घाबरत नाही. माझ्या मते, माझ्यापेक्षा जास्त श्रीमंत व स्वतंत्र मनुष्य कोणी नाही. त्यांनी मला रशियाहून इथे जेव्हा पाठवले, तेव्हा माझा पहिला दिवस फार त्रासाचा गेला. मी सैतानाला सांगितले की मला माझी बायको, कुटुंब, स्वातंत्र्य हे काही नको! मी चांगला राकट आहे. तू बघतोस, की मी तक्रार न करता, मजेत रहातो. जर सैतानाचे फक्त एकदा ऐकून तुम्ही छान मजा केलीत, तर तुम्ही गाळात गेलात. मग तुम्हाला कोणी वाचवू शकत नाही.

मग तुम्ही दलदलीत मानेपर्यंत फसलात आणि कधीच बाहेर येऊ शकणार नाही. तुझ्यासारखे मूर्ख शेतकरीच नव्हे, तर अमीर उमराव आणि सुशिक्षित लोकही त्यात फसतात. साधारण पंधरा वर्षांपूर्वी, एका सभ्य गृहस्थाला रशियाहून इथे पाठवले गेले. त्याने काही कारणावरून त्याच्या भावांशी भांडण केले आणि मृत्युपत्र खोटेनाटे दाखवले. असे म्हणतात, तो राजपुत्र किंवा उमराव होता. काय खरे कोणाला माहिती! तर हा गृहस्थ इथे आला आणि प्रथम त्याने घर व मुखोर्टीन्सकोईला जमीन घेतली. तो बोलला, “मला माझ्या स्वतःच्या श्रमांनी, माझ्या घामावर रहायचे आहे. कारण आता मी सभ्य गृहस्थ नाही. मला हद्दपार केले आहे. मी म्हणतो, देव मला मदत का करणार नाही?” ही चांगली गोष्ट आहे. तेव्हा तो तरुण व चपळ होता. नेहमी कामात मग्न असे. त्याचे शेत त्याने नांगरले. मासे पकडले. घोड्यावरून चाळीस चाळीस मैल प्रवास केला. इथे पहिल्या वर्षापासून एक त्रास आहे. त्याने गायरीनो येथे पोस्टात जायला सुरवात केली. तो माझ्या बोटीवर उभा राहून सुस्कारा टाकत म्हणे, “ओहो सेमयॉन, मला त्यांनी घरून पैसे पाठवून, खूप दिवस झाले. मी म्हणे, “व्हॅसिली सरगीच, पैशांची गरज नाही.” पैसा कशासाठी? जशा काही गरजा कधी नव्हत्याच, ते जणू स्वप्न होते, अशा तऱ्हेने जुन्या गोष्टी सोडून दे. नवीन आयुष्य सुरु कर. सैतानाचे काही ऐकू नकोस --- तो तुझे काही

भले करणार नाही. फक्त फासात अडकवेल. तुला आता पैसा हवा आहे. मी म्हणतो, थोड्या काळात काय होते बघ, तुला दुसरे काही हवे असेल. आणि मग अजून काही व अजून काही. जर तुला सुखी व्हायचे असेल, तर पहिल्या प्रथम सगळ्या इच्छा सोडून दे. हो --- नशीबाने आपल्याकडे पाठ फिरविली आहे, त्यामुळे मी त्याला म्हणतो, त्याच्या पाया पडून पैसे मागायचे काही कारण नाही. आपण त्याला कमी लेखून, हसले पाहिजे. नाहीतर ते आपल्याला हसेल." मी त्याला असे बोललो --- दोन वर्षांनी, मी त्याला या बाजूला आणले आणि तो हात चोळत हसू लागला. तो बोलला, "मी माझ्या बायकोला भेटायला गायरीनोला चाललो आहे. तिला माझी दया येते आहे. ती तिथे येते आहे. ती चांगली बाई आहे. आणि तो आनंदाने वेडा झाला. दोन दिवसांनी तो त्याच्या बायकोला घेऊन आला. टोपी घातलेली, तरुण, हातात बाळ मुलगी असलेली, सुंदर बाई आणि सर्व प्रकारचे खूपसे सामान. माझा व्हॅसिली सरगीच, सारखा तिच्या भोवतीभोवती फिरत, तिची स्तुती करून तिच्याकडे बघत बसे. आणि मला म्हणे, "अरे भावा, लोक सैबेरियात देखील चांगले राहू शकतात." मी म्हटले, "अती आनंद दाखवू नकोस." त्यानंतर तो प्रत्येक आठवड्याला रशियाहून पैसे आले का, ते बघायला, गायरीनो येथे जाऊ लागला. त्याला पैशांची खूप गरज

भासे. तो म्हणे, “माझ्यासाठी, माझा कटूपणा वाटून घेण्यासाठी, ती इथे सैबेरियामध्ये तिचे तारुण्य व सौदर्य झिजवते आहे. त्यामुळे, मला तिला सर्व प्रकारचे सुख दिले पाहिजे --- त्या स्त्रीला आनंदी बनवण्यासाठी, तो सर्व ऑफिसर लोकांच्या व खालच्या दर्जाच्या लोकांच्या संगतीत राहू लागला. हे नक्की होते, की अशा सर्व लोकांना जेवण व दारू द्यावी लागते. पियांनो लागतो. सोफ्यावर छोटा, केसाळ कुत्रा लागतो --- तो त्याच्या सुबत्तेचे व चैनीचे प्रदर्शन करु लागला. पण ती स्त्री त्याच्याबरोबर फार काळ राहिली नाही. कशी रहाणार? सगळीकडे माती, पाणी व थंडी! भाज्या व फळे नाहीत. भोवताली दारुडे, अशिक्षित लोक, सुसंस्कृतता काहीच नाही. ती राजधानीतील सुबत्तेत राहीलेली बाई --- नक्कीच ती कंटाळली होती --- आणि तिचा नवरा, तुम्ही काही म्हणा, आता काही सभ्य माणूस नाही. त्याला हद्दपार केलेले आहे --- आता त्याला काही मान नाही. तीन वर्षात, मला आठवते, देवांच्या आईच्या झोपेच्या सणाच्या संध्याकाळी पलीकडील तीरावरून आरडाओरडा ऐकू आला. मी बोटीतून गेलो. मी पाहिले --- एक पूर्णपणे गुंडाळलेली बाई व तिच्याबरोबर एक तरुण सभ्य ऑफिसर मनुष्य, अशा दोघांना मी पाहिले. तीन घोड्यांची गाडीतून --- मी त्यांना या किनाऱ्यावर आणले. ते बोटीत आले आणि तेव्हाच मी त्यांना शेवटचे पाहिले.

ते माझ्या मनातील चित्रातून निघून गेले. आणि सकाळी व्हॅसिली सरगीच दोन घोड्यांची गाडी घेऊन आला. “सेमयॉन, माझी बायको एका चष्मेवाल्या माणसाबरोबर इथून गेली का?” मी म्हणालो, “हो ती गेली. जा शेतातील वाऱ्याचा पाठलाग कर. तो त्यांच्यामागे वेगाने गेला. पाच दिवस त्यांना शोधले. नंतर मी जेव्हा त्याला या बाजूला परत आणले, तेव्हा तो खाली पडून जोराने ओरडू लागला व त्याचे डोके जमिनीवर आपटू लागला. मी म्हणालो, “बघ, असे होते.” मी हसलो आणि त्याला आठवण केली, ‘सैबेरियात पण लोक चांगले राहू शकतात.’ ते ऐकून त्याने त्याचे डोके अजून जोरात आपटून घेतले --- नंतर त्याला त्याचे स्वातंत्र्य हवे होते. त्याची बायको रशियाला गेली. तिला भेटायला आणि तिला तिच्या प्रियकरापासून दूर खेचायला त्यालाही तिथे जायचे होते. आणि त्यामुळे, प्रिय भाऊ, रोज घोड्यावर बसून, पोस्टात किंवा वरिष्ठांना भेटायला जाऊ लागला. तो त्याला घरी पाठवण्यासाठी सतत अर्ज व विनवण्या करू लागला. त्याने मला सांगितले, की नुसत्या तारांवर त्याने दोनशे रुबल्स खर्च केले. त्याने जमीन विकली. ज्यूंकडे घर गहाण ठेवले. तो करडा, वाकलेला दिसू लागला. त्याचा चेहरा क्षय झाल्यासारखा, पिवळा दिसू लागला. तो तुमच्याशी बोले आणि बोलतच, बोलतच, बोलतच राही --- आणि त्याचे डोळे अश्रूंनी भरत. आठ वर्षे तो

अर्ज व विनवण्या करण्याचा त्रास काढत होता. मग सुधारला आणि आनंदी झाला. त्याला नवीन आनंदनिधान मिळाले. त्याची मुलगी मोठी झाली होती. तिच्याकडे कितीही वेळ बघितले, तरी त्याचे समाधान होत नसे. खरे सांगायचे तर ती तशी वाईट नव्हती. काळ्या ठळक भुवया असलेली, चैतन्यपूर्ण व सुंदर होती. प्रत्येक रविवारी तो तिला, गायरीनो येथील चर्चमध्ये नेई. दोघे बोटीत एकमेकांजवळ उभे रहात. ती हसत राही आणि त्याची दृष्टी तिच्यावर खिळून राही. तो म्हणे. "बरका सेमयॉन, 'सैबेरियात पण लोक चांगले राहू शकतात. सैबेरियात पण सुख आहे, बघ." तो म्हणे, "काय माझी मुलगी आहे! आजूबाजूच्या हजार मैलांमध्ये तुला अशी मुलगी सापडणार नाही." मी म्हणे, "खरे आहे --- " मग मी विचार करू लागे, 'जरा थांब --- ती तरूण, उच्च रक्ताची आहे. तिला जगायचे आहे. आणि इथे कसल्या प्रकारचे आयुष्य आहे? अरे भावा, ती कृश होऊ लागली आहे --- ती उंच उंच होत चालली आहे. पण सर्व फुकट चालले आहे. ती आजारी पडून अंथरुणाला खिळेल. झिजत जाईल. तुझ्यासाठी ती सैबेरियातील आनंद आहे --- तो डॉकटरांकडे जाऊन त्याना तिला बघायला आणू लागला. नजीकच्या शंभर, दोनशे मैलांच्या परिसरात डॉक्टर असल्याचे समजले, की तो त्याला आणायला जाऊ लागला. त्याने बराच पैसा यात घालवला. माझ्या मते,

यापेक्षा ते पैसे पिण्यात घालवणे बरे ठरले असते --- काही झाले, तरी ती मरणारच आहे. नक्कीच मरणार आहे. आणि मग तो पार कोलमडून जाईल. दुःखाने तो स्वतःला टांगून घेईल. किंवा रशियाला पळून जाईल --- ही वस्तुस्थिती आहे. तो पळेल. पकडला जाईल. कोर्टात खटला होईल. सक्तमजुरी, चाबकाचे फटकारे --- "

टार्टार बारीक किंचाळीवजा, पुटपुटला, "छान, छान."

स्पष्टोक्ता विचारता झाला, "काय छान?"

"बायको, मुलगी --- सक्तमजुरी, हो, दुःख! हो, पण त्याला बायको व मुलगी निदान दिसल्या तरी --- तू म्हणतोस त्यांची गरज नाही. पण काहीच नाही --- हे वाईट आहे. त्याची बायको त्याच्याबरोबर तीन वर्षे राहिली. ती देवाची देणगी होती. काही वाईट नाही. तीन वर्षे चांगली गेली. तुला कळत कसे नाही?"

त्याला फारसे माहिती नसलेले, रशियन शब्द शोधत, थरथरत, चाचरत, टार्टारने सुरवात केली, की परदेशात देव त्याला आजारी पडण्यास मनाई करतो. मेल्यावर थंड, गंजक्या मातीत पुरले जायचे आहे. त्याची बायको एखाद्या दिवसासाठी किंवा एखाद्या तासासाठी जरी आली, तरी त्या आनंदासाठी, तो काही

छळ सहन करायला तयार आहे. कधीच नाहीपेक्षा, आनंदाचा एक दिवस चांगला!

त्याने किती हुशार व सुंदर बायको घरी ठेवली आहे, हे त्याने परत सांगितले. नंतर दोन्ही हातात डोके धरून, तो शोक करू लागला आणि सेमयॉनला खात्रीपूर्वक म्हणाला, त्याने काही गुन्हा केलेला नाही. आणि त्याच्यावर खोटा आरोप केला गेला आहे. त्याच्या दोन भावांनी व काकांनी एका शेतकऱ्याचे घोडे चोरले आणि त्याला मरेमरेतो मारले. पण गावकीने खोटी केस उभी करून, तिन्ही भावांना सैबेरियाला पाठवले. त्याचा श्रीमंत काका मात्र सुटला.

सेमयॉन बोलला, "तुला त्याची सवय होईल."

टार्टार गप्प झाला. त्याने त्याचे पाण्याने भरलेले डोळे आगीकडे रोखले. त्याच्या चेहऱ्यावर भीती होती. जणू काही त्याला समजत नव्हते, की तो परक्या लोकांमध्ये, दमट व अंधारी जागी का आहे, आणि सिंबीरस्क राज्यामध्ये का नाही आहे. स्पष्टोक्ता आगीजवळ झोपला. कशाला तरी तोंडभरून हसला आणि हलक्या आवाजात गुणगुणू लागला.

जरा वेळाने तो परत व्हॅसिली सरगीचबद्दल म्हणाला, "तिला वडीलांबरोबर राहून काय मजा आहे? तो तिच्यावर प्रेम करतो.

तिच्यात आनंद शोधतो, हे खरे आहे. पण भावा, बोट तोंडात घालू नकोस. मी त्याला म्हटले, तू कडक म्हातारा मनुष्य आहेस. आणि तरुण मुलींना कडकपणा आवडत नाही --- त्याना कोवळीक, हा हा ही ही, सुगंध आणि सौंदर्य प्रसाधने आवडतात. हो --- तर असे आहे.” एक सुस्कारा टाकून सेमयॉन जडपणे उठला. व्होडका संपली म्हणजे आता झोपायची वेळ झाली. भावा, मी चाललो --- “

एकटाच राहिल्यावर टार्टारने आगीत अजून काड्या टाकल्या आणि तिथे लवंडला. आगीकडे बघत, त्याचे गाव व बायकोचा विचार करू लागला. ‘ती एका महिन्यासाठी, निदान एका दिवसासाठी येऊ दे. आणि मग हवे असेल तर, तिला परत जाऊ दे. ती कधीच न येण्यापेक्षा एखादा महिना वा दिवस आलेली चांगली! पण ती वचन पाळून आली, तर तो तिला खायला काय देणार? ती इथे कुठे रहाणार?’

तो मोठ्याने म्हणाला, “खायला नसेल, तर रहायचे कसे?”

आता त्याला दिवसरात्र काम करून, फक्त दहा कोपेक मिळत. चांगले प्रवासी चहा आणि व्होडकासाठी त्याला वर पैसे देत. पण इतरजण सर्व पैसे आपापसात वाटून घेत आणि टार्टारला काही देत नसत. फक्त त्याला हसत असत. प्रत्येकाला थंडीपासून

बचाव करायची आणि पोटाला अन्नाची गरज असते --- त्याचे शरीर भीतीमुळे थरथरत होते व दुखतही होते. झोपडीत जाऊन झोपणे श्रेयस्कर ठरले असते. पण तिथे त्याला पांघरायला काही नव्हते. पण तो निदान शेकोटी पेटवू शकत होता ---

आठवड्याभरात जेव्हा पाणी शांत होऊन, बोटीच्या फेऱ्या परत सुरु झाल्या. सेमयॉन सोडून इतर नावाड्यांची गरज नव्हती. टार्टारने गावागावात जाऊन काम मागायला सुरवात केली. त्याची बायको, फक्त सतरा वर्षांची होती. ती सुंदर, लाजाळू व आनंद घेणारी होती. 'गावागावातून तिचा सुंदर चेहरा दाखवत ती भीक मागत असेल का? नाही.' असा विचार करणेदेखील भयंकर होते ---

पहाट होत होती. त्या उजेडात, बोटीच्या कडा व खळाळत्या पाण्यामधील झुडुपे, स्पष्ट दिसत होती. मागे वाळूमिश्रीत मातीचा उभा कडा होता. त्याखाली तपकिरी पोकळ दांड्यांचे व वरून गावच्या कापडाचे छत असलेली झोपडी होती. कोंबडे आरवत होते.

उभा लाल कडा, बोट, नदी, दुष्ट परके लोक, भूक, थंडी, आजारपण --- कदाचित यापैकी काहीच खरे अस्तित्वात नसेल. टार्टारने विचार केला, बहुतेक माझे स्वप्नरंजन चालू असावे.

त्याला वाटले, तो झोपलेला आहे व त्याला स्वतःचे घोरणे ऐकू आले. अर्थात तो सिंबीरस्क राज्यामध्ये घरी आहे. त्याने बायकोच्या नावाने हाक मारल्याबरोबर, ती प्रतिसाद देते. पुढील खोलीत आई आहे --- कधीकधी एखाद्याला अशी घाबरवणारी स्वप्ने पडतात. कशासाठी? . टार्टारने हसून, डोळे उघडले. ही कुठली नदी आहे? व्होल्गा?

बर्फ पडत होता.

पलीकडील किनाऱ्यावरून कुणीतरी ओरडत होते. "हॅलो --- बो --- ट"

टार्टार भानावर आला. तो त्याच्या सहकाऱ्याना उठवायला गेला. जेणेकरून ते बोट घेऊन, पलीकडील किनाऱ्याला जातील. त्यांनी मेंढीच्या कातडीचे फाटके कोट घातले व नुकत्यातच उठल्यामुळे असलेल्या घोगऱ्या आवाजात शिव्या देत, कुडकुडत ते गेले. नदीवर प्रचंड थंडी होती. झोपेनंतर हाडापर्यंत खिळणारी थंडी त्याना घाबरवत होती. ते सावकाशीने बोटीत चढले --- टार्टार आणि इतर तिघांनी अंधारात माशांसारखी दिसणारी, लांबरुंद वल्ही हातात घेतली. सेमयॉनने त्याच्या पोटाचे वजन सुकाणूच्या खांबावर टाकले. पलीकडील किनाऱ्यावरून ओरडणे चालू होते. पिस्तुलाचे दोन बार उडालेले ऐकू आले. बहुधा

बोटवाल्यांना उठवण्यासाठी ते होते. या जगात, घाई करायची काही गरज नसते, त्यातून काही चांगले होईल, अशी खात्री नसते हे पटलेल्या स्पष्टोक्त्याने म्हटले “ठीक आहे, तुम्ही तिथे पोचाल.”

विचित्र जड बोटीने किनारा सोडला आणि पाण्यातील झुडुपांमधून मार्ग कापू लागली. पाण्यातील झुडुपे हळूहळू मागे जात असल्यानेच केवळ समजत होते की बोट एका जागी उभी नाही. नावाडी आवाज करत, वल्ही मारत होते. स्पष्टोक्ता त्याच्या पोटाचे वजन सुकाणूच्या खांबावर टाकून उभा होता व बोटीच्या वरच्या कडांपासून हवेत वक्राकार रेषा काढत होता. अंधारात असे वाटत होते, की लोक जणू कुठल्या तरी पुरातन काळातील प्राण्याच्या लांब पायावर बसले आहेत व त्याच्याबरोबर कुठल्यातरी स्वप्नात पाहिलेल्या थंड, अंधारी जमिनीवर जाण्यासाठी तरंगत आहेत. त्यांनी झुडुपे पार केली व मोकळयावर आले. दुसऱ्या तीरावरून, वल्ही मारल्याचे आवाज आधीच ऐकले गेले होते. तेथून आरडाओरडा ऐकू आला, “हुर्ये! हुर्ये!” अजून दहा मिनिटे गेली आणि बोट धाडकन जाऊन जेट्टीवर आपटली.

त्याच्या चेहऱ्यावरील बर्फ झटकत, सेमयॉन पुटपुटला, ”ती कुठून आली, देव जाणे!”

दुसऱ्या बाजूला एक कोल्ह्याच्या कातडीचे जाकीट घातलेला, मेंढीच्या कातडीची टोपी घातलेला, फार उंच नसलेला, पण वाकलेला म्हातारा, थांबला होता. तो घोड्यांपासून दूर, स्थिर उभा होता. त्याला काही आठवायला त्रास पडत असल्यासारखा व त्याची अवज्ञा करणाऱ्या स्मरणशक्तीवर रागावल्यासारखा, तो फार गंभीर दिसत होता.

जेव्हा सेमयॉन टोपी काढत, हसत, त्याच्याजवळ आला, तेव्हा तो म्हणाला,

“मी माझ्या मुलीकडे, ॲनास्टासव्हेयकाकडे निघालो आहे. तिचे जास्त झाले आहे. तिच्यासाठी नवीन डॉक्टर नेमल्याचे मी ऐकले आहे.”

त्यांनी टांगा बोटीत ओढला आणि ते परत गेले. सेमयॉन ज्याला व्हॅसिली सरगीच म्हणतो, तो नदी ओलांडेपर्यंत स्थिर उभा आहे. त्याचे ओठ घट्ट बंद आहेत आणि डोळे एका जागी स्थिर आहेत. जेव्हा टांगेवाला त्याच्याकडे सिगरेट ओढायची परवानगी मागतो, तेव्हा तो काही ऐकू न आल्यासारखे, उत्तर देत नाही.

सेमयॉन त्याच्या पोटाचे वजन सुकाणूच्या खांबावर टाकून त्याच्याकडे चिडवल्यासारखे बघत उभा राहतो व म्हणतो,

“सैबेरियात पण लोक राहू शकतात. रा --- हू --- !“

स्पष्टोक्त्याने काही सिद्ध केल्यासारखी, त्याच्या चेहऱ्यावर, विजयाची भावना उमटली. त्याने अपेक्षा केली होती, तसेच घडून आल्याने, तो आनंदी होता. कोल्ह्याच्या कातडीच्या जाकीटातील माणसाच्या चेहऱ्यावरील गरीब बिचारे भाव, बघून त्याला आनंद होत होता.

नदीच्या तीरावर घोड्यांना मोकळे सोडून, व्हॅसिली सरगीचला सेमयॉन म्हणाला, “आता प्रवास करणे, जिकीरीचे आहे. अजून थोडे कोरडे होईपर्यंत, तुम्ही तुमचे जाणे काही आठवडे लांबवले पाहिजे. नाहीतर अजिबात जाऊच नये --- तुम्हाला माहिती आहे, की लोक कसे दिवसरात्र शेवटपर्यंत जात रहातात, पण अजून तरी तुमच्या जाण्याचा खरेच, काही उपयोग नाही.”

व्हॅसिली सरगीचने शांतपणे त्याला पैसे दिले. मग तो टांग्यात बसून दिसेनासा झाला.

थंडीने शहारत, “सेमयॉन म्हणाला, “तो डॉक्टरसाठी शेतांमधून वाऱ्याच्या वेगाने दौडत आहे. सैतानाच्या शेपटीला

पकडत आहे. तुमच्या आत्म्याचा धिःकार असो. इतके विचित्र पक्षी! देवा मला पापी माणसाला क्षमा कर!"

टार्टार स्पष्टोक्त्याकडे आला. त्याच्याकडे द्वेषाने व घृणेने बघत, थरथरत, त्याच्या तुटक भाषेत, शब्दांची जुळवाजुळव करत म्हणाला,

"तो चांगला --- चांगला, तू वाईट --- वाईट! सभ्य माणसे चांगली --- उत्तम आहेत आणि तू वाईट पशू!

सभ्य माणसे जगणार. तू मरणार --- देवाने माणसे जगण्याकरता, आनंदाकरता, दुःखाकरता आणि दुःखी होण्याकरता निर्माण केली. पण तुला काहीच नको. म्हणजे तू जिवंत नाहीस --- दगडा, --- देव तुझ्यावर प्रेम करत नाही. सभ्य माणसांवर करतो."

सगळे हसले. टार्टारने मळमळल्यासारखे शरीर हलवले. हात हलवला आणि स्वतःला चिंध्यांमध्ये गुंडाळत, आगीकडे गेला. सेमयॉन व बोट चालवणारे, सावकाशीने मोठ्या ढांगा टाकत झोपडीकडे गेले.

गार जमिनीवरील गवत पसरवत, एकजण ओरडला, 'फार थंडी आहे."

दुसऱ्याने कबूल केले, “हो, अजिबात उबदार नाही. गुन्हेगाराचे आयुष्य! --- “

ते सगळे पसरले. वाऱ्यामुळे दार उघडत होते आणि बर्फ आत येत होता. कोणालाच उठून दार लावायची इच्छा नव्हती. खूप थंडी होती व त्यांच्यात आळस भरला होता.

सेमयॉनला झोप लागता लागता, तो म्हणाला, “मी ठीक आहे. देवाने सर्वांना असे आयुष्य द्यावे.”

“आम्हाला माहिती आहे. तू सात वेळा गुन्हेगार होऊन चुकला आहेस. सैतानही तुला आता काही करू शकणार नाही.”

लांबून कुत्र्यासारखे ओरडणे ऐकू आले.

“ते काय आहे? कोण आहे?”

“टार्टार रडतो आहे.”

“तो पहा --- वेगळाच पक्षी!”

“त्याला याची स --- व --- य होईल.” एवढे बोलून सेमयॉन लगेच झोपला.

लवकरच सर्वजण झोपले आणि दार उघडेच राहिले.

# Sleepy

# झोपाळू



रात्र आहे. तेरा वर्षांची दाई वर्का, बाळ असलेला पाळणा झुलवते आहे. ऐकू येईल इतपत आवाजात गाते आहे,

बाळा जो जो रे

तुजसाठी, मी अंगाई गाते ---

तेलाचा हिरवा दिवा येशूसमोर जळतो आहे. या कोपऱ्यापासून, त्या कोपऱ्यापर्यंत खोलीत दोरी बांधली आहे. त्यावर कपडे वाळत घातले आहेत. एक मोठी काळी पँट लटकते आहे. येशूसमोरील दिव्यातून एक मोठा हिरवा ठिपका छतावर पडला आहे. त्या दिव्याची ज्योत फडफडल्यावर --- कपड्यांच्या लांब सावल्या स्टोव्ह, पाळणा व वर्कावर पडत आहेत. ती जागा आणि सावल्या जिवंत झाल्यासारख्या व वाऱ्याने हेलकावत असल्यासारख्या वाटत आहेत. वातावरण भारून टाकणारे आहे. कोबीचे सूप आणि चांभाराची आयुधे, यांचा वास दरवळतो आहे.

बाळ बराच वेळ रडून रडून दमले आहे. त्याचा आवाज घोगरा येतो आहे. ते किंचाळते आहे आणि कुणालाच माहिती नाही, ते कधी गप्प होईल. वर्काला झोप येते आहे. तिचे डोळे मिटत आहेत आणि मान लवंडून दुखते आहे. तिच्या पापण्या किंवा ओठ ती हलवू शकत नाही. तिचा चेहरा कोरडा आणि कडक झाल्याचे व डोके एखाद्या पिनेच्या डोक्याइतके लहान झाल्याचे, तिला जाणवते आहे.

बाळा जो जो रे

तुजसाठी, मी अंगाई गाते ---

स्टोव्हवर पाखरे भिरभिरत आहेत. पुढच्या खोलीत दारामागे मालक आणि त्याची मदतनीस मुलगी अफान्से घोरत आहेत --- दयाद्रपणे पाळणा करकरतो. वर्का स्वतः गुणगुणते आहे. सर्व वातावरण अंगाईगीताने भारून गेले आहे. तुम्ही झोपायला जातांना, हे सगळे इतके गोड वाटत आहे. पण काही क्षुल्लक कारणाने आता हे सर्व बिघडले आहे. तिला झोप येत असल्याने, पण ती झोपू शकत नसल्याने, ते छळवादी वाटत आहे. देव वर्काला झोपेपासून वाचवो. नाहीतर मालक तिला झोडपून काढेल.

येशूसमोरील दिव्याची ज्योत फडफडते. हिरवा ठिपका आणि सावल्या पुन्हा हलायला सुरवात होते. वर्काच्या अर्धोन्मीलित डोळयात व अर्धवट जाग्या मेंदूत या सर्वांची पुसटशी स्वप्नमालिका होते आहे. तिला आकाशात एकमेकांचा पाठलाग करणारे काळे ढग, बाळासारखे रडतांना दिसत आहेत. पण आता वाऱ्याने पळवून लावल्याने ढग नाहीसे झाले आहेत. आता वर्काला चिखलाने बरटलेला मोठा रस्ता दिसतो आहे. रस्त्यावरून सावकाशीने चालणाऱ्या गाड्या व माणसे दिसत आहेत. माणसांच्या खांद्यावर ओझे आहे व सावल्या मागेपुढे हलत आहेत. थंडगार, कडक धुक्यामधून, दोन्ही बाजूला जंगल दिसते आहे. अचानक ओझे घेतलेले लोक आणि सावल्या

चिखलात पडल्या. वर्काने विचारले, “असे का झाले?” आणि उत्तर आले, “झोपण्यासाठी. झोपण्यासाठी.” आणि ते गाढ झोपले. गोड झोप! कावळे आणि इतर छोटे पक्षी तारांवर बसून, बाळासारखे रडत, त्यांना जागे करू लागले.

वर्का गुणगुणली,

बाळा जो जो रे

तुजसाठी, मी अंगाई गाते ---

ती स्वतःला एका अंधारी, कोंदट झोपडीत बघते.

तिचे वडील, येफेम स्टेपानोव्ह जमिनीवर तळमळत पडले आहेत. तिला ते दिसत नाहीत. पण जमिनीवरील त्यांचे वेदनेने तळमळणे तिला ऐकू येते आहे. ते म्हणतात, त्यांची जखम ठणकते आहे. ती इतकी असहनीय आहे, की ते एकही शब्द बोलू शकत नाहीत. ते जेमतेम श्वास घेत आहेत त्यांचे दात ताशासारखे वाजत आहेत.

“ओहो, अयाई ग --- “

बाळा जो जो रे

तुजसाठी, मी अंगाई गाते ---

येफेम मरायला टेकल्याचे सांगण्यासाठी तिची आई, पेलागेया मोठ्या बंगल्यात तिच्या मालकाकडे धावते. तिला जाऊन बराच वेळ झाला आहे. एव्हाना ती परत यायला पाहिजे. वर्का स्टोव्हवर ओणवी होऊन तिच्या वडिलांचे 'ओहो, अयाई ग' ऐकते आहे. पण आता तिला झोपडीपर्यंत कोणीतरी गाडी चालवत आल्याचे जाणवते. मालकाने शहरातून डॉक्टरला पाठवले आहे. डॉक्टर झोपडीत येतात. काळोखात ते दिसत नाहीत. पण तिला चाहूल लागते. ती त्याना खोकताना व दार वाजवतांना ऐकते.

ते म्हणतात, "दिवा लावा."

येफिम उत्तरतो, "ओहो, अयाई ग"

पेलागेया स्टोव्हकडे धावते आणि काडेपेटी शोधू लागते. एक मिनिट शांततेत जाते.

डॉक्टर स्वतःच्या खिशातील काडेपेटी काढून, काडी ओढतात."एक मिनिट थांबा, डॉक्टर, एक मिनिट!" पेलागेया झोपडीबाहेर धावून मेणबत्तीचा तुकडा घेऊन येते.

येफिमचे गाल गुलाबी झाले आहेत. डोळे चमकत आहेत. त्याची नजर तीक्ष्ण आहे, जसे काही त्याला झोपडी आणि डॉक्टरच्या आरपार दिसते आहे.

डॉक्टर म्हणतात, “बोला, काय होते आहे? ओहो, असे तुम्हाला बराच वेळ होते आहे का?”

“काय सर? तुम्ही कसे काय आलात? महाशय, माझे जगून झाले.”

“काहीही बरळू नकोस. आम्ही तुला बरे करू.”

“तुमची मर्जी, महाशय. मी नम्रपणे तुमचे आभार मानतो. पण आम्हाला कळते आहे, की मरण जवळ आले आहे. आता कसला उपयोग नाही.”

डॉक्टर अर्धा पाऊण तास प्रयत्न करत रहातात. मग उठून म्हणतात,

“मला अजून काही करणे शक्य नाही --- तुम्हाला हॉस्पीटलमध्ये जायला हवे. लगेच जा. नक्की जा. थोडा उशीरच झाला आहे तिथे सर्वजण झोपले असतील. पण काही काळजी करू नका. मी तुम्हाला चिठ्ठी देतो. तुम्ही ऐकता आहात का?”

पेलागेया म्हणाली, “पण डॉक्टर, आम्ही त्यांना कसे काय नेणार? आमच्याकडे घोडाही नाही.”

“असू दे. मी तुमच्या मालकांशी बोलतो. ते घोडा देतील.”

डॉक्टर जातात. मेणबत्ती विझते. परत तिला ऐकू येते, ‘ओहो, अयाई ग’ अर्ध्या तासाने कोणीतरी झोपडीपाशी येते.

मालक एका घोड्याची गाडी पाठवतात. येफिम तयार होऊन जातो ---

बाळा जो जो रे

तुजसाठी, मी अंगाई गाते ---

पेलागेया परत येते. छातीवर हाताने क्रूस काढून कुजबुजते,

"त्यांनी रात्री त्याच्यावर उपचार केले. पण सकाळी त्याचा आत्मा देवाकडे गेला. स्वर्गामध्ये त्याच्या आत्म्याला शांती मिळो --- ते म्हणाले की तुम्ही त्यांना इथे आणायला उशीर केला. लवकर आणायला हवे होते --- "

वर्का जंगलात जाऊन रडते. पण अचानक कोणीतरी तिच्या डोक्यावर मागून इतके जोरात मारते, की तिचे डोके फांदीवर आदळते. ती वर बघते, तर तिला तिचा मालक चांभार दिसतो.

तो ओरडतो, "अग अवदसे, हे काय चालले आहे? बाळ रडते आहे आणि तू झोपतेस?"

तो तिचा कान पिरगळतो. ती डोके हलवते. पाळण्याला झोका देते आणि गाणे गुणगुणते. हिरवा ठिपका आणि दोरीवरचे कपडे हेलकावून, तिला डोळे मिचकावून दाखवतात आणि लगेच तिच्या डोक्यात शिरतात. पुन्हा तिला चिखलाने बरबटलेला मोठा रस्ता दिसतो. तिथे पाठीवर ओझे घेतलेली माणसे व सावल्या

मागेपुढे हलत असतात. वर्काला अनावर झोप येते आहे. लवंडणे किती छान असेल! पण तिची आई पेलागेया तिच्या शेजारून चालून, तिला घाई करते. त्या काम शोधायला घाईघाईने शहराकडे निघाल्या आहेत.

तिची आई येणाऱ्या जाणाऱ्यांना विचारते, "येशूसाठी, भीक घाला. दयाळू लोकांनो, माझ्यावर दया करा."

कुणी ओळखीचा आवाज तिला उत्तर देतो, "मला मूल दे! मला मूल दे! अग वेश्ये, माझ्याबरोबर झोपशील का?"

वर्का उडी मारून आजूबाजूला बघते. तिच्या लक्षात येते, की तिथे रस्ता नाही, पेलागेया नाही, येणारे जाणारे कुणी लोक नाहीत. फक्त तिची मालकीण बाळाकडे बघण्यासाठी आली आहे आणि खोलीच्या मध्यभागी उभी आहे. जाडी रुंद खांद्याची मालकीण बाळाला आंजारून गोंजारून शांत करते. वर्का उभी राहून मालकिणीचे बाळाला घेणे कधी संपते, याची वाट बघते आहे. खिडकीबाहेर हवा निळी होते आहे. सावल्या आणि छतावरील हिरवा ठिपका पुसट होतो आहे. लवकरच सकाळ होईल.

छातीवरील गाउनची बटणे लावत मालकीण म्हणते, "त्याला घे. ते रडते आहे. कुणाची तरी दृष्ट लागली असणार."

वर्का बाळाला घेते. त्याला पाळण्यात ठेवून झोके देऊ लागते. सावल्या व हिरवा ठिपका हळूहळू नाहीसा होतो. तिच्या डोक्यातील सर्व विचारही नाहीसे झाले आहेत. तिला पूर्वीइतकीच झोप येते आहे. मरणाची झोप! झोपेवर मात करण्यासाठी ती पाळण्याच्या कडेवर तिचे डोके ठेवते व सर्वांग झुलवते. पण तिचे डोके जड होऊन, डोळे मिटायला बघतात.

दारामागून मालकाचा आवाज येतो, "वर्का, स्टोव्ह पेटव.

उठून कामाची वेळ झालेली दिसते. वर्का पाळणा सोडून, बाहेर लाकडे आणायला धावते. ती आनंदी आहे. जेव्हा तुम्ही धावता आणि पळता, तेव्हा बसलेल्या अवस्थेसारखी तुम्हाला झोप येत नाही. ती जळण आणून स्टोव्ह पेटवते. तिचा कडक झालेला चेहरा हळूहळू सैलावतो. तिचे विचार स्पष्ट होतात.

मालक ओरडतो, "वर्का, चहा तयार कर."

लाकडाचे छोटे तुकडे चहाच्या किटलीखाली ठेवायला वर्काला काही वेळ न देता, लगेच पुढची मागणी करण्यात येते,

"वर्का, मालकांचे गमबूट स्वच्छ कर."

ती जमिनीवर बसते व गमबूट स्वच्छ करते. ती विचार करते, 'या मोठ्या व खोल गमबूटात डोके घालून एक डुलकी काढावी. अचानक गमबूट मोठा होऊन, फुगून, खोलीभर होतो. वर्का ब्रश

खाली टाकून, लगेच तिचे डोके हलवते. डोळे गरागरा फिरवते आणि गोष्टींकडे अशा तऱ्हेने बघायचा प्रयत्न करते, की त्या वाढणार नाहीत व हलणार नाहीत.

“वर्का, पुढच्या पायऱ्या धू. कोणी लोक येतील, तर त्या फार वाईट दिसत आहेत.”

वर्का पायऱ्या धुते. खोली आवरते. मग दुसरा स्टोव्ह पेटवून वाण्याकडे धावते. इतके काम आहे, की क्षणाचीही उसंत मिळत नाही.

पण स्वयंपाकघरात टेबलाशी एका जागी उभे राहून बटाटे सोलण्याइतके अवघड काहीच नाही. तिचे डोके टेबलावर पडायला लागते. बटाटे डोळ्यात जातात आणि हातातील सुरी खाली पडता पडता वाचते. तिच्याभोवती जाडी रागावलेली मालकीण हाताच्या बाह्या वर करून हिंडते आहे व इतक्या जोरात ओरडते आहे, की वर्काच्या कानांवर अत्याचार होतो आहे. टेबलावर काम करणेदेखील छळ आहे. कपडे धुवायचे आहेत. शिवणकाम आहे. सर्व काही विसरून, जमिनीवर पडून झोपावे, यासाठी ती तरसली आहे.

दिवस जातो. अंधाऱ्या खिडक्यांकडे बघत, वर्का तिची कानशीले दाबून हसते. ती का हसते आहे, ते तिचे तिलाही

माहिती नाही. संध्याकाळचा काळोख तिच्या मिटू पहाणाऱ्या डोळ्यांवर प्रेमाने हात फिरवतो व तिला असे सांगून आश्वस्त करतो, की लवकरच तिला झोप मिळेल. संध्याकाळी तिच्या मालकांकडे पाहुणे येणार असतात.

मालकीण ओरडते, "वर्का, चहा कर."

त्यांची किटली लहान आहे. पाहुण्यांना पुरेसा चहा मिळावा, म्हणून तिला तो पाच वेळा करावा लागतो. चहानंतर एका जागी तासभर उभी राहून पाहुण्यांकडे बघत, आता मालकांकडून कसली आज्ञा झेलायची आहे, याचा वर्का विचार करते आहे.

"वर्का, पळ आणि बिअरच्या तीन बाटल्या घेऊन ये."

झोप पळवून लावण्यासाठी ती झटका आल्यासारखी, धावते.

"वर्का, पळ. व्होडका घेऊन ये. वर्का, बाटलीचे बूच उघडायचे यंत्र कुठे आहे? वर्का, हेरिंग मासा स्वच्छ कर."

शेवटी पाहुणे जातात. दिवे मालवून मालक झोपायला जातात.

शेवटची आज्ञा सोडली जाते, "वर्का, बाळाला झोका दे."

स्टोव्हवर पाखरे भिरभिरत असतात. छतावरील हिरवा ठिपका, कपड्यांच्या सावल्या आणि दोरीवरील कपडे परत

वर्काच्या अर्धोन्मीलित डोळयात व अर्धवट जाग्या मेंदूत फिरत रहातात. ती गुणगुणते,

बाळा जो जो रे

तुजसाठी, मी अंगाई गाते ---

बाळ रडत रहाते. रडून रडून दमते. आता वर्काला चिखलाने बरटलेला मोठा रस्ता दिसतो आहे. रस्त्यावरून सावकाशीने चालणाऱ्या गाड्या व माणसे दिसत आहेत. माणसांच्या खांद्यावर ओझे आहे. पेलागेया, तिचे वडील, येफेम. तिला सर्व समजते आहे. तिने सर्वांना ओळखते आहे. पण अर्धवट झोपेत तिला हे कळत नाही, की कुठल्या शक्तीने तिचे हात पाय असे बांधल्यासारखे झाले आहेत आणि ते तिला जगू देत नाही आहेत.

त्या शक्तीच्या तावडीतून सुटण्यासाठी, ती आजूबाजूला बघते. पण तिला ते जमत नाही. शेवटी ती तिची सर्व शक्ती व दृष्टी, हलणारा हिरवा ठिपका आणि रडणे यांच्याकडे वळवून, तिला जगू न देणाऱ्या शत्रूचा शोध घेते.

तो शत्रू म्हणजे बाळ आहे.

ती हसते. त्यामुळे तिला थोडे हलके वाटते. इतकी साधी गोष्ट तिला यापूर्वी कशी समजली नाही? हिरवा ठिपका, सावल्या व पाखरेही आश्चर्याने हसत आहेत, असे वाटते.

वर्काच्या मनावर चुकीच्या समजुतीचा पगडा बसतो. ती स्टुलावरून उठून, डोळे न मिचकावता, खोलीत येरझऱ्या घालते. बाळापासून सुटकेचा आनंददायी विचार तिच्या हातापायांवर काबू करतो --- बाळाला ठार करायचा विचार --- आणि मग झोपायचा विचार --- झोप, झोप, झोप ---

हसत, डोळे उघडमिट करत, हिरव्या ठिपक्याबरोबर तिची बोटे नाचवत, वर्का हळूहळू पाळण्याकडे जाऊन त्यावर वाकते. बाळाचा गळा आवळते. आणि तत्क्षणी आनंदाने हसत जमिनीवर अंग लोटून देते. आता ती झोपू शकते. क्षणार्धात ती मेल्यासारखी गाढ झोपते.

The Darling

# आवडती



कॉलेजमधून मूल्यांकन करणारा म्हणून निवृत्त झालेल्या प्लेम्यानीकोव्हची मुलगी ओलेन्का, तिच्या घराच्या अंगणाच्या मागच्या पडवीत बसलेली होती. तो गरम दिवस होता. माशा घोंघावून सतत त्रास देत होत्या. आता लवकरच संध्याकाळ

होणार आहे, हा विचार सुखद होता. पूर्वेकडून पावसाचे काळे ढग जमा होत होते. तिथून ओलसर झुळूक येत होती.

'टीवोली मनोरंजन बाग' या कंपनीचा मालक असलेला व ओलेन्काच्या अंगणातील घरात रहाणारा कुकीन अंगणाच्या मध्यभागी उभा राहून, आकाशाकडे बघत होता.

तो दुःखाने म्हणाला, "परत पाऊस येणार आहे. रोज पाऊस पडतो. रोज --- अगदी मुद्दाम पडल्यासारखा! हा एक प्रकारचा फास आहे. हे बँकेत एकही पैसा नसल्यासारखे आहे! रोज भयानक नुकसान!"

त्याने त्याचे हात गुंफले व ओलेन्काला हाका मारू लागला.

"ओलेन्का सेमयोनोव्हना, आपले आयुष्य तुझ्यासाठी आहे. ते तुला शोक करायला लावू शकेल! तू काम करायचा आटोकाट प्रयत्न कर --- आणि मग काय? लोक तर दुर्लक्ष करणारे व रानटी असतात. मी त्याना सर्वात उत्तम लहानसे नृत्यनाटय देतो. त्यात पऱ्यांची रंगीबेरंगी मिरवणूक असते, छानसा हॉल व गायक असतात. पण त्यांना तेवढेच हवे असते का? लोकांना त्यातले काही समजते का?

त्याना कशीही वागणूक असलेली करमणूक हवी असते. त्यांना सगळे खोटे व नाटकी हवे असते. तर दुसऱ्या बाजूला हवा

कशी आहे बघ. बहुतेक रोज संध्याकाळी पाऊस पडतो. १० मेला तो सुरु झाला आणि मे व जून दोन्ही महिने पूर्णपणे सतत पडत राहिला --- फारच आश्चर्यकारक! त्यामुळे लोक थिएटरमध्ये येत नाहीत. पण मी भाडे तर देतो ना? आणि मी नटांना पगार देत नाही का?"

दुसऱ्या दिवशी संध्याकाळच्या सुमारास परत ढग जमले. वेड्यासारखा हसत कुकीन बोलला,

"ठीक आहे. पाऊस पडू दे! सगळी बाग पाण्याने भरून जाऊ दे व त्याच्या बरोबर मीही! मला या जगात किंवा पुढच्या जगात आनंदापासून वंचित राहू दे. नट मंडळींना माझ्यावर केस करू दे. काय? केस करू दे. सैबेरीयाची हाल करणारी शिक्षा मला होऊ दे. फाशीचे तख्त! हाः हाः हाः!"

तिसऱ्या दिवशी देखील तसाच पाऊस होता.

ओलेन्का शांतपणे व गंभीरपणे कुकीनचे वक्तव्य ऐकत होती. तिच्या डोळयातून कधीकधी पाणी येत होते. शेवटी कुकीनच्या वाईट नशीबामुळे, ती हेलावून गेली व त्याच्या प्रेमात पडली. तो छोटासा, हडकुळा व पिवळया चेहऱ्याचा होता. तो थोड्या किनऱ्या आवाजात बोले व तेव्हा त्याचे तोंड थोडे वाकडे होई. त्याचा चेहरा नेहमी दुःखी असे. पण तरीही तो तिच्यात खोलवर,

खऱ्या भावना जागवे. ती नेहमीच कुणावर तरी प्रेम करे. त्याशिवाय ती जगू शकत नसे. पूर्वी तिचे वडिलांवर प्रेम होते. आता ते आजारी होते. अंधारी खोलीत बसून, ते जोरात श्वास घेत असत. ब्रियान्स्कहून वर्षातून एकदोनदा येणाऱ्या आत्यावर तिचे प्रेम होते आणि त्याआधी शाळेत असतांना ती तिच्या फ्रेंच शिक्षिकेवर प्रेम करत असे. ती शांत, चांगल्या स्वभावाची, दया येईल अशी, शरणार्थी, मलूल डोळ्यांची सुदृढ तरूणी होती. तिच्या गुलाबी फुगीर गालांकडे, जन्मखुणेसकट असलेल्या गोऱ्यापान मऊ मानेकडे व चेहऱ्यावरील निरागस, दयाळू हास्याकडे बघतांना, ती छानसे काही ऐके, तेव्हा तिच्या प्रसन्न चेहऱ्याकडे बघून, लोकांना वाटे, 'हं, काही वाईट नाही.' आणि ते हसत. भेटायला येणाऱ्या बायकानाही संभाषणामध्ये, आनंदाने हसून तिचा हात धरल्याशवाय रहावत नसे. त्या म्हणत,

"तू आमची आवडती!"

जन्मल्यापासून ती ज्या घरात रहात होती, ते घर वडीलांनी इच्छापत्रात तिच्या नावावर करून ठेवले होते, ते गावाच्या कडेला होते. तिथे जिप्सी लोकांचा डेरा होता. टीवोली मनोरंजन बागेपासून देखील ते फार लांब नव्हते. संध्याकाळी व रात्री, तिला तेथील संगीत ऐकू येत असे. तिथे फटाके वाजवले जात. तिला

असे वाटे, की तिथे कुकीन त्याच्या नशीबाशी झुंजतो आहे. त्याचा मुख्य शत्रू असलेल्या वादळाबरोबर झुंजत, बेदरकार लोकांचे मनोरंजन करतो आहे. त्या गोडपणाने तिचे हृदय भरून येई. तिला मुळीच झोप येत नसे. आणि सकाळी जेव्हा तो घरी येई, तेव्हा ती तिच्या झोपायच्या खोलीच्या खिडकीवर हळूवारपणे टकटक करून, पडद्याआडून त्याला तिचा चेहरा व एक खांदा दाखवत असे व नाजूकपणे हसत असे ---

त्याने तिला मागणी घातली व त्यांचे लग्न झाले. जेव्हा त्याने नीटपणे तिच्या मानेकडे, गोबऱ्या गालांकडे व सुदृढ खांद्यांकडे पाहिले, तेव्हा त्याने हात गुंफून म्हटले,

“तू माझी आवडती!”

तो आनंदी होता. पण लग्नाच्या दिवशी व रात्री उशीराही पाऊस पडल्याने, त्याच्या चेहऱ्यावरची दुःखी छटा कधीच गेली नाही.

लग्नानंतर त्यांचे आयुष्य चांगले चालले होते. ती त्याच्या लहानशा कार्यालयात बसे. बागेतल्या गोष्टींकडे बघे. खर्चाचा हिशेब ठेवे. पगारवाटप करे. तिचे गुलाबी गाल व गोड अननुभवी झगमगाटी हास्य, कार्यालयात, जेवणात व प्रत्येक कामामध्ये पसरे. तिने तिच्या ओळखीच्या लोकांना सांगितले होते, की

सर्वात महत्वाची, उल्लेखनीय व गरजेची गोष्ट कुठली असेल, तर ती म्हणजे थिएटर ही आहे. फक्त थिएटरमध्येच खरा आनंद मिळतो, शिक्षण मिळते आणि संस्कृतीची ओळख होते.

ती म्हणाली, “पण लोकांना हे कळते का? त्यांना विचित्रता हवी असते. काल आम्ही ‘फॉस्ट इनसाइड आऊट’ दाखवला आणि बॉक्सच्या जागा रिकाम्या होत्या. पण कुकीन आणि मी काही भंपक प्रकारचा सिनेमा दाखवला, तर नक्की थिएटर पूर्ण भरेल. उद्या कुकीन आणि मी ‘गुन्हाजगतातील ऑरफेअस’ दाखवणार आहोत. तेव्हा जरूर या.”

कुकीन नट आणि थिएटरबद्दल जे बोलला, ते तिने परत सांगितले. तिनेही कलेच्या अज्ञानाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्याच्यासारख्याच, लोकांना शिव्या दिल्या. नटांना सुधारले. वाद्यवृंदाच्या तालमीकडे बघितले. आणि जेव्हा स्थानिक वर्तमानपत्रांनी थिएटरबद्दल नापसंतीचा सूर लावला, तेव्हा ती नाराज झाली आणि स्पष्टीकरण मिळवण्यासाठी संपादकाच्या कार्यालयात गेली.

नट तिच्यावर प्रेम करत ते तिला ‘कुकीन आणि मी’ आणि ‘आवडती’ म्हणत. तिला त्यांची दया येई आणि ती त्याना

किरकोळ पैसे उसने देई. त्यांनी जर फसवले, तर गुपचूप दुःख करे. पण नवऱ्याकडे तक्रार करत नसे.

हिवाळ्यातही त्यांचे आयुष्य चांगले गेले. हिवाळाभर त्यांनी गावातील थिएटर थोडक्या काळासाठी, कधी उक्रेनियन गटाला, कधी जादुगाराला तर कधी स्थानिक प्रायोगिक नाटके करणाऱ्या गटांना भाड्याने दिले. कुकीन अजूनच पिवळा पडत चालला व हडकुळा झाला. जरी हिवाळाभर धंदा चांगला चालला होता, तरी तो तोटा होत असल्याच्या तक्रारी करू लागला. ओलेन्काचे वजन वाढून, ती समाधानी व चमकदार दिसू लागली. रात्री तो खोकू लागला. तिने त्याला रास्पबेरी दिले. अजून काही किरकोळ औषधे दिली. त्याला यू- डी-कोलनने चोळले. तिच्या मऊ शालींमध्ये गुंडाळले.

त्याच्या केसांमधून हात फिरवत, ती मनापासून त्याला म्हणाली, "तू माझा गोडुला नाहीस का? तू माझा छानसा नवरा नाहीस का?"

इस्टरच्या आधी तो एका कंपनीत काम करण्यासाठी मॉस्कोला गेला. त्याच्याशिवाय तिला झोप येईना. रात्रभर खिडकीशी बसून, ती तारे मोजत राही. त्यावेळी ती तिची तुलना कोंबड्यांबरोबर करे. कोंबडा जेव्हा खुराड्यात नसे, तेव्हा त्या

सुद्धा काळजीने जाग्या रहात. कुकेन मॉस्कोला अडकला. त्याने इस्टरमध्ये येत नसल्याचे कळवले. त्या पत्रात त्याने टीवोलीसंबंधी सूचना दिल्या. पण पवित्र सोमवारी, रात्री उशीरा काही वाईट घडल्यासारखे गेट वाजवले जाऊ लागले. खडखड आवाज ऐकून, स्वयंपाकी पायात काही न घालता, ते उघडण्यासाठी धावला. गेटबाहेरील कोणी माणूस खर्जातील आवाजात म्हणाला, “तुमच्यासाठी तार आहे.”

ओलेन्काला पूर्वीही तिच्या नवऱ्याकडून तार आली होती. पण आता का कुणास ठाऊक, ती एकदम मूक झाली. थरथरत्या हाताने तिने ती फोडली व वाचली.

‘कुकीन इव्हान पेट्रोविच आज अचानक मृत्यू पावला. अंत्यविधी मंगळवारी आहे.’

तर तारेत असे लिहिलेले होते. त्यावर तेथील अधिकाऱ्याची सही होती.

ओलेन्का शोक करू लागली. “माझे पाखरु! माझा प्राणप्रिय कुकीन! मी तुला का भेटले? मी का तुला ओळखू लागले व प्रेम करू लागले? तू तुझ्या गरीब बिचाऱ्या ओलेन्काला एकटीला सोडून, कसा काय जाऊ शकतोस? --- “

मंगळवारी मॉस्कोमध्ये व्हॅगॅन्कोव्हो स्मशानात कुकीनला पुरण्यात आले. ओलेन्का बुधवारी परत आली. घरात शिरल्याबरोबर ती कोसळून पडली. ती इतक्या जोरजोरात शोक करू लागली की सर्व शेजारीपाजारी दिग्मूढ झाले.

छातीवर क्रूस काढत शेजारची बाई म्हणाली, "अग आवडती, आवडती ओल्गा, माझ्या हृदयाजवळची! किती शोक करशील?"

तीन महीन्यांनंतर एक दिवस ओलेन्का उदासीनतेने चर्चमधून परत येत होती. बाबाकेव्हच्या लाकडाच्या वखारीचा व्यवस्थापक व तिचा एक शेजारी, वासिली अँड्रेइच पुस्टोव्हॅलाव्ह तिच्याबरोबर शेजारून चालत होता. तो देखील चर्चमधून परतत होता. त्याने टोपी, पांढरा कोट व सोन्याची चेन घातली होती. तो व्यापाऱ्यापेक्षा, जमीनदारासारखा दिसत होता.

तो थंडपणे सहानुभूतीपूर्वक म्हणाला, "ओल्गा, प्रत्येक गोष्ट घडण्यामागे दैव असते. आपले एखादे नाते संपले, तर समजावे, की देवाची तशी इच्छा होती. अशा वेळी आपण स्वतःला सावरून, त्याच्याप्रती शरणार्थी भाव ठेवावा."

ओलेन्काबरोबर गेटपर्यंत येऊन, त्याने तिचा निरोप घेतला. त्यानंतर त्याचा थंड आवाज तिला दिवसभर ऐकू येत राहिला.

डोळे मिटल्यावर तिला त्याची काळी दाढी दिसू लागली. तिला तो खूप आवडला. ओलेन्कानेही त्याच्या मनावर परिणाम केला असावा. कारण थोडेच दिवसात, ओलेन्काच्या थोडीशी ओळखीची असलेली एक बाई तिच्याकडे कॉफी प्यायला आली. ती टेबलाशी बसल्या बसल्या लगेच पुस्टोव्हॅलोव्ह किती चांगला धष्टपुष्ट माणूस असून, कुणीही बाई त्याच्याशी लग्न करायला कशी आनंदाने तयार होईल, ते सांगू लागली. तीन दिवसांनी पुस्टोव्हॅलोव्ह स्वतः आला, दहा मिनिटे बसला व थोडे बोलला. ओलेन्का त्याच्या प्रेमात पडली. तिला रात्रभर झोप आली नाही. ताप चढला. सकाळी तिने त्या मध्यस्थ बाईला निरोप पाठवला. थोडेच दिवसात जोडी जुळली व मग त्यांचे लग्न झाले.

ओलेन्का व पुस्टोव्हॅलोव्ह यांचा संसार चांगला चालला होता. तो लाकडाच्या वखारीत दुपारपर्यंत बसे. मग ओलेन्का येई व तो त्याची कामे करायला जाई. ओलेन्का मिळालेल्या नवीन कामांची नोंद घेई. हिशेब ठेवे व संध्याकाळपर्यंत तिथे बसे.

ती ओळखीच्या लोकांना व गिऱ्हाईकांना सांगे, “हल्ली लाकडाचे भाव दर वर्षी वीस टक्क्यांनी वाढतात. पूर्वी आम्ही जवळपासच्या ठिकाणांहून ती आणायचो पण आता माझ्या

नवऱ्याला त्यासाठी, मोगीलेव्ह राज्यात जावे लागते. आणि कर?" दोन्ही हात गालांवर ठेवून ती शहारत म्हणे, "केवढे कर?"

तिला वाटले की ती या लाकडांच्या व्यवसायात खूप काळ काम करत आहे. ती एक जीवनावश्यक वस्तू होती आणि तुळई, खांब, फळा, तक्तपोशी, लाकडाचा पातळसा तुकडा इत्यादी शब्द, आता तिच्या अगदी जवळचे व प्रिय झाले होते --- रात्री ती जेव्हा झोपे, तेव्हा तिला स्वप्नात लाकडाच्या फळ्यांचे डोंगर दिसत. दहा यार्ड लांब व दहा इंच जाडीचे लाकडाचे ओंडके वाहून नेणाऱ्या गाड्यांची लांबलचक रांग दिसे. तिच्या वखारीत हा सगळा ढीग येऊन पडत असे. मग ती झोपेत ओरडे आणि पुस्टोव्हॅलोव्ह तिला तरलपणे म्हणे,

"ओलेन्का, प्रिये, काय झाले? छातीवर क्रॉस काढ."

तिचा नवरा जसा विचार करे, तसाच ती करे. जर त्याला वाटले की खोली गरम झाली आहे किंवा व्यवसाय फारसा तेजीत नाही, तर तिलाही तसेच वाटे. तिच्या नवऱ्याला कुठल्याही प्रकारची करमणूक आवडत नसे व तो रविवारभर घरी बसे, तर मग ती देखील तसेच करे.

तिच्या ओळखीचे लोक म्हणत, “तू कार्यालयात अगदी घरच्यासारखी असतेस. आवडत्या मुली, पण तू थिएटरमध्ये किंवा सर्कसला जायला पाहिजेस.”

ती थंडपणे उत्तर देई, “पुस्टोव्हॅलाव्ह व मला थिएटरमध्ये जायला वेळ नसतो. आम्ही कामाची माणसे आहोत. क्षुल्लक गोष्टींकडे आम्ही लक्ष देत नाही. या थिएटरमध्ये काय चांगले असते?”

ती व पुस्टोव्हॅलाव्ह शनिवारी संध्याकाळी रात्री उशिरापर्यंत व रविवारी सकाळी चर्चमध्ये प्रार्थनेसाठी गेले. चर्चमधून जोडीने परततांना ते गहिवरून गेल्यासारखे दिसत होते. छान वास येत होता. तिचे रेशमी कपडे आनंदाने सळसळत होते.

घरी आल्यावर त्यांनी चहाबरोबर नवीन प्रकारचा पाव व इतर साठवलेले पदार्थ खाल्ले. मग केक खाल्ला. रोज दुपारी अंगणात व गेटबाहेर रस्त्यावर, रशियन सूपचा आणि भाजलेल्या बकरी वा बदकाचा रानटी वास येत असे. त्यामुळे गेटवरून जाणाऱ्यांची भूक खवळत असे. कार्यालयात चहा नेहमी उकळत असे. गिऱ्हाईकांना चहा आणि बेगल्स दिले जात. आठवड्यातून एकदा ते त्यांच्या बायकांबरोबर सार्वजनिक स्नानगृहात जात व जोडीने येतांना, उजळून तुकतुकीत लालसर झालेले असत.

ओळखीच्या लोकांना ओलेन्का सांगे, "देवाच्या कृपेने आमचे आयुष्य चांगले चालले आहे. देवाने सगळ्यांना आमच्यासारखे आयुष्य द्यावे."

जेव्हा पुस्टोव्हॅलाव्ह लाकडे आणण्यासाठी मोगीलेव्हला गेला, तेव्हा तिला त्याचा फार विरह होऊन ती रात्रभर न झोपता रडत बसली. कधीकधी संध्याकाळी तिच्या अंगणातील घरात भाड्याने रहाणारा, सैन्यातील तरुण पशुवैद्यक अधिकारी, स्मिरनीन तिला भेटायला येत असे. तो तिला काही गोष्टी सांगे किंवा तिच्याबरोबर पत्ते खेळे. त्यामुळे तिचे दुःख कमी होई. त्याच्या स्वतःच्या घरगुती बाबतीतील गोष्टी रुचीपूर्ण असत. तो विवाहित असून, त्याला एक मुलगा होता. पण आता त्याची बायकोपासून फारकत झालेली होती. कारण ती त्याच्याशी एकनिष्ठ नसून, अविश्वासू होती. तो तिचा द्वेष करे पण मुलासाठी तिला महिना चाळीस रुबल्स पाठवे. हे ऐकून ओलेन्काने एक उसासा टाकत मान हलवली व तिला त्याच्याबद्दल सहानुभूती वाटली.

हातात मेणबत्ती घेऊन, तो जिन्यातून निघाला, तेव्हा ती बोलली, "देव तुझे रक्षण करो. माझा कंटाळा घालवल्याबद्दल, चांगले आरोग्य देवो. स्वर्गातील देव -- "

ती नेहमीप्रमाणे तिच्या नवऱ्यासारखे, इतक्या थंडपणे व हुशारीने बोलली, की तोपर्यंत स्मिरनीन खालच्या दारातून नाहीसा झाला. तिने त्याला हाक मारली व म्हणाली,

“अरे, तुला तुझ्या बायकोबरोबर समझोता करायला पाहिजे. तुझ्या मुलासाठी, तिला क्षमा कर --- मुलाला सर्व काही समजले पाहिजे.”

जेव्हा तिचा नवरा परत आला, तेव्हा तिने खालच्या आवाजात त्याला स्मिरनीनबद्दल व त्याच्या दुःखी आयुष्याबद्दल सांगितले. त्या दोघांनीही सुस्कारा टाकून डोके हलवले व ते वडीलांच्या सहवासाला मुकलेल्या मुलाबद्दल बोलले. मग काही विचित्र विचारांनी, ते देवासमोर उभे राहून वाकले व देवाजवळ त्यांना मुले होण्यासाठी प्रार्थना केली.

अशा तऱ्हेने पुस्टोव्हॅलाव्ह प्रेमाने व समाधानाने सहा वर्षे राहिला. नंतर हिवाळ्यातील एका दिवशी, वखारीत चहा प्यायल्यावर, गिऱ्हाईकाला लाकडे पोचवायला गेला. तेव्हा त्याला सर्दी झाली व आजारी पडला. उत्तम डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार केले पण आजार वाढला व चार महिन्यांनी, तो वारला. ओलेन्का परत एकदा विधवा झाली.

तिच्या नवऱ्याला पुरल्यावर तिने शोक केला, “माझ्या प्रिय कबुतरा, तू मला सोडून का गेलास? तुझ्याशिवाय गरीब व त्रासलेली अशी मी कशी जगू? चांगल्या लोकांनो, माझ्यावर दया करा. एखादा अनाथ --- “

ती काळा ड्रेस घालून हिंडू लागली तिने मोजे व टोपी घालायचे कायमचे सोडून दिले. ती क्वचितच घराबाहेर पडे. फक्त तिच्या नवऱ्याच्या थडग्याला भेट देण्यासाठी चर्चमध्ये जाई. एखाद्या जोगिणीसारखी घरात बसे. सहा महिने झाल्यावर तिने शोक करणे सोडून, घराच्या खिडक्या उघडल्या. प्रसंगापरत्वे सकाळी ती स्वयंपाकाचे सामान आणण्यासाठी बाजारात जातांना दिसू लागली. पण आता ती कशी रहात होती व घरात काय चालू होते, याबद्दल फक्त तर्क लढवले जात होते. उदाहरणार्थ ती बागेत पशुवैद्याबरोबर चहा घेतांना दिसली व तो तिला मोठ्याने वर्तमानपत्र वाचून दाखवत असला, किंवा पोस्ट कार्यालयातील तिच्या ओळखीची बाई तिला भेटली तर ती सांगे,

“आपल्या गावातील प्राण्यांकडे नीट बघितले जात नाही. त्यामुळे रोगराई पसरते. दुधामुळे लोक आजारी पडलेले तुम्ही ऐकले असेल. घोडे व गाईंमुळेही रोग पसरू शकतात. खरे तर

आपण माणसांची जितकी काळजी घेतो, तितकीच प्राण्यांची देखील घेतली पाहिजे.”

ती त्या पशुवैद्याचे विचार परत परत सांगत राहिली. तिची सर्व मते त्याच्यासारखीच झाली. कोणाशी तरी घट्ट नाते जोडल्याशिवाय ती वर्षभरदेखील राहू शकत नाही, हे नक्की झाले आणि तिच्या अंगणातच तिला तिचा आनंद सापडला. दुसऱ्या स्त्रीवर त्यामुळे अन्याय झाला पण कुणीच ओलेन्काला दोष दिला नाही. तिच्या आयुष्यातील प्रत्येक गोष्ट स्पष्ट होती. तिने व त्या पशुवैद्याने त्यांच्या नातेसंबंधात काय बदल झाले, ते कुणालाच सांगितले नाहीत. ते झाकून ठेवण्याचा प्रयत्न केला. पण ते त्यात यशस्वी झाले नाहीत. कारण ओलेन्काला काहीही गुप्त ठेवता येत नसे. जेव्हा त्याच्याकडे कुणी सैन्यातील पाहुणे येत, तेव्हा ती त्यांना चहा वा जेवण देतांना, गुरांमधील प्लेग आणि इतर रोगांबद्दल किंवा गावातील खाटिकखान्याबद्दल सांगे. तेव्हा तो भयानकपणे शरमिंदा होई व पाहुणे गेल्यावर तिच्या दंडाला धरून, तिच्यावर ओरडे,

“तुला कळत नाही, त्याविषयावर बोलत जाऊ नकोस. आम्ही लोक एकमेकांशी बोलत असतांना, मध्ये बोलू नकोस. शेवटी ते कंटाळवाणे ठरते.”

पण ती त्याच्याकडे धोका असल्यासारखे आश्चर्याने पाहे व विचारे,

“मग मी कशावर बोलू?”

मग ती अश्रुभरल्या डोळ्यांनी त्याला मिठी मारून, न रागावण्याबद्दल विनंती करे. मग ते दोघेही आनंदी होत.

पण हा आनंद फार काळ टिकत नसे. त्याच्या सैन्याच्या तुकडीची कुठेतरी लांब, सैबेरियाजवळ बदली झाल्याने तो तिथे निघून गेला. ओलेन्का परत एकटी पडली.

आता ती पूर्णपणे एकटी होती. तिचे वजन कमी झाले. ती वेगळीच दिसू लागली. जे तिला ओळखत असत, ते लोक रस्त्यात भेटले, तर तिच्याकडे बघून तिला न ओळखल्यामुळे, हसेनासे झाले. अर्थात तिची चांगली वर्षे संपून गेली. आता उरलेले, माहिती नसलेले नवीन आयुष्य सुरु झाले. त्याविषयी विचार न केलेला बरा, असे होते. संध्याकाळी ओलेन्का मागील अंगणात टीवोलीतून ऐकू येणारे संगीत व तिथे वाजवले जाणारे फटाक्यांचे आवाज ऐकत बसे. पण त्यामुळे तिच्या मनात काही विचार जागृत होत नसत. तिला काही नको असे. नंतर रात्र झाल्यावर ती झोपायला जाई व रिकाम्या अंगणाचा विचार करत बसे. ती जणू तिच्या इच्छेविरुद्ध खाणेपिणे करे.

पण मुख्यत्वे, सर्वात वाईट काय होते, तर तिला काही मार्गच उरले नव्हते. ती तिच्या भोवतालच्या वस्तू बघे. तिच्याभोवती काय चालले आहे, हे तिला समजे. पण तिला कशाबद्दल मत बनवणे, शक्य होत नसे व काय बोलायचे हे देखील समजत नसे. तिच्यापुढे काही मार्गच नव्हते, हे खरोखर किती भयानक होते! उदाहरणार्थ, असे बघा, ती बाटली तिथे आहे. पाउस पडतो आहे किंवा शेतकरी गाडी चालवतो आहे. पण बाटली, पाऊस किंवा शेतकरी तिथे का आहेत, त्यांच्यापासून काय बोध होतो, हे हजार रुबल्स दिले, तरीही तिला समजत नसे. कुकीन, पुस्टोव्हॅलोव्ह व नंतर त्या पशुवैद्याबरोबर असतांना ओलेन्का सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण देऊ शके. तिचे मत देऊ शके. पण आता तिचे हृदय व विचार मागील अंगणासारखेच सुने सुने, रिकामे झाले होते. पण आता जणू तिने झाडाची कडू पाने खाल्ल्यासारखे तिला काही विचित्र व भीतीदायक वाटू लागले.

गाव हळूहळू चहू दिशांनी वाढत होते. जिप्सींची वस्ती रस्त्यात बदलली होती. टीवोलीबाग व लाकडाच्या वखारीच्या जागी नवीन गल्ल्या उदयाला आल्या होत्या. काळ किती भराभरा उडतो! ओलेन्काचे घर अंधारून गेले. छत गंजले. गॅरेजची किंमत कमी झाली. अंगणभर गवत व काटेरी झुडुपे माजली. ओलेन्का म्हातारी झाली व तिचे दिसणे बदलले. उन्हाळ्यात ती भकास

चेहऱ्याने अंगणात बसे. कडू चवीच्या झाडांचा वास तिथे पसरे. हिवाळ्यात ती खिडकीशी बसे व बर्फाकडे बघत राही. वसंताच्या चाहूलीबरोबर, वाऱ्याने चर्चच्या घंटा वाजू लागत. अचानक भूतकाळातील आठवणी दाटून येत. तिच्या हृदयात मधुकूजन सुरु होई. तिच्या डोळ्यातून मिनिटभर अश्रुधारा वहात. नंतर परत भास होत व रिकामपणा येई. तिला कळत नसे, की ती का जिवंत आहे. छोटे काळे मांजर तिच्या अंगाला चाटून मऊ स्पर्श करे. पण त्या कोवळ्या स्पर्शानेही ओलेन्का शहारून येत नसे. त्याची तिला गरज होती का? तिचे सर्वस्व, आत्मा आणि मन ओढून घेईल, अशा प्रेमाची तिला गरज होती, त्यामुळे तिच्या विचारांना, जीवनाला दिशा मिळाली असती. तिच्या वयस्क होत जाणाऱ्या रक्ताला त्याने थोपवून धरले असते. ती तिच्या मांडीवरील काळ्या मांजराला हाकलून देत, रागावून म्हणे, "जा. जा --- इथे तुझे काही काम नाही."

असे दिवसामागून दिवस व वर्षांमागून वर्षे चालू होते --- काही आनंद नाही, कुठल्याही प्रकारची काही मते नाहीत. स्वयंपाकी, जे काही बोले तेवढेच!

जुलैमधील एका गरम दिवशी, जेव्हा शहरातील रस्त्यांवरून गर्दी वहात होती आणि सर्व अंगण धुळीने भरून गेले होते, तेव्हा

कुणीतरी कुंपण खडखड वाजवत होते. ओलेन्का स्वतःच ते उघडायला गेली. आणि अवाक् झाली. गेटबाहेर सैन्यातील तरुण पशुवैद्यक अधिकारी, स्मिरनीन उभा होता. साध्या नागरीकासारखे कपडे घातलेला व केस करडे झालेला! तिला अचानक सर्व काही आठवले. तिला भावनावेग आवरेना. तिला रडू फुटले. तिने त्याच्या छातीवर तिचे मस्तक ठेवले. ती इतकी हलून गेली की दोघे घरात कधी गेले व कधी चहा प्यायला लागले, ते तिला समजलेच नाही.

आनंदाने थरथरत ती पुटपुटली, "माझ्या छोट्या कबुतरा, स्मिरनीन, तुला देवाने कसे काय पाठवले?"

तो तिला म्हणाला, "मला इथे रहायचे आहे. मी आता सैन्यातून निवृत्त झालो. इथे आता निवांत आयुष्य जगत, मला माझे नशीब आजमावयाचे आहे. माझा मुलगा आता शाळेत जातो. तो मोठा झाला आहे. तुला माहिती आहे का, की मी माझ्या बायकोशी भांडण मिटवून टाकले."

ओलेन्काने विचारले, "ती कुठे आहे?"

"ती माझ्या मुलाबरोबर हॉटेलमध्ये आहे. मी जागा शोधत फिरतो आहे."

“अरे देवा, माझ्या आवडत्या, माझे घर घे. घर कुठे शोधत बसला आहेस? मी तुझ्याकडून काहीही घेणार नाही. ओलेन्का भावविवश होऊन रडू लागली. इथे माझ्या अंगणातील घरात रहा. अरे देवा, मला तू किती आनंदी व समाधानी केलेस!

दुसऱ्या दिवशी घर रंगवले गेले. आणि ओलेन्का अंगणभर कामगारांना आज्ञा देत सुटली. चेहऱ्यावर पुन्हा पहिले हसू आले. मोठ्या झोपेतून उठल्यासारखी, ती जिवंत, ताजीतवानी झाली. लहान केसांची, बारीकशी, साधी, चकित झालेली, स्मिरनीनची बायको आली. तिच्याबरोबर दहा वर्षांचा, गोबरा, निळ्या डोळ्यांचा व गालाला खळ्या पडणारा साशाही आला. ओलेन्काचा चेहरा हास्याने उजळला. तो मुलगा अंगणात आल्याबरोबर मांजराच्या मागे धावला. आणि लगेच त्याच्या ओठांवर सुखकारक आनंदी हसू उमटले.

त्याने ओलेन्काला विचारले, “काकू, हे तुझे मांजर आहे का? तिला पिल्ले झाली की एक आम्हाला देशील? ममाला उंदरांची फार भीती वाटते.”

ओलेन्का त्याच्याशी बोलली. त्याला चहा दिला. तिची छाती भरून आली व काही गोड वाजले. जसे काही तो तिचा स्वतःचा मुलगा होता. जेव्हा तो संध्याकाळी जेवायच्या खोलीत

त्याचा अभ्यास करत बसला, तेव्हा ती त्याच्याकडे कोवळेपणे व दयार्द दृष्टीने बघत कुजबुजली,

“अरे माझ्या छोट्या, देखण्या कबुतरा, तू इतका चटपटीत व छान आहेस!”

तो मुलगा वाचत होता, “बेट हे चारी बाजूंनी वेढल्या गेलेल्या जमिनीचा तुकडा असते.”

ती परत तेच म्हणाली, “बेट हे कोरड्या जमिनीचा तुकडा असते --- “

तिच्या इतक्या वर्षांच्या विचारांच्या शून्यतेनंतर व शांततेनंतर तिने ठामपणे उच्चारलेले हे पहिले वाक्य होते.

आता तिला स्वतःचे मत होते. जेवतांना ती साशाच्या पालकांना म्हणाली, की अलीकडे मुलांना शाळेतील अभ्यास किती अवघड असतो! आतापेक्षा पूर्वीचे शिक्षण चांगले होते. कारण शाळेनंतर सर्व मार्ग उपलब्ध होते. जर तुमची इच्छा असेल, तर तुम्ही डॉक्टर किंवा इंजिनिअर होऊ शकत होतात.”

साशा शाळेत जाऊ लागला. त्याची आई तिच्या बहिणीला भेटायला खार्कोव्हला गेली आणि परत आलीच नाही. त्याचे वडील रोज गुरांच्या मागे जात. आणि कधीकधी तीन तीन दिवस घरापासून दूर असत. ओलेन्काला वाटले की साशाकडे फार

दुर्लक्ष केले जाते आहे. घरी तो नकोसा झाल्यासारखे वातावरण आहे. तो अनेक वेळा उपाशी असतो. मग तिने त्याला स्वतःच्या घरी आणून, त्याला एक लहानशी खोली दिली.

गेले सहा महिने साशा तिच्याबरोबर रहात होता. रोज सकाळी ती त्याच्या खोलीत जाई. तो गालाखाली हात ठेवून, मंदपणे श्वास घेत, गाढ झोपलेला असे.

ती दुःखाने म्हणे, "साशेंका, लाडक्या उठ. शाळेची वेळ झाली." तो उठून, कपडे करून, प्रार्थना म्हणे. मग चहा प्यायला बसे. तीन कप चहा पिऊन दोन मोठे बेगल्स खात असे. त्याची झोप पुरी न झाल्याने तो रुसलेला असे.

तो कुठेतरी दूरच्या प्रवासाला निघाल्यासारखी, ती त्याला म्हणे, "साशेंका, तू तुझ्या नीतिकथेचा नीट अभ्यास केला नाहीस. तू मला काळजी करायला लावतोस. अरे लाडक्या, तू मनापासून अभ्यास केला पाहिजेस --- तुझ्या शिक्षिकेचे ऐकले पाहिजेस."

साशा म्हणे, "जाऊ दे. मला एकट्याला सोड." मग तो छोटा मुलगा, पाठीवर दप्तर घेऊन, टोपी घालून, रस्त्याने चालत शाळेला निघे. ओलेन्का गुपचूप त्याच्यामागे जात राही.

ती हाक मारे, "साशेंका- का"

तो मागे वळून बघे. ती त्याच्या हातावर खजूर किंवा बिस्कीट ठेवे. जेव्हा ते शाळेजवळ येत, तेव्हा अशी उंच, मजबूत बाई आपल्यामागून येते आहे, याची त्याला लाज वाटे. मग तो मागे बघून बोले, “काकू, तू घरी जा. माझा मी आता जातो.”

तो शाळेच्या आत शिरेपर्यंत, ती पापणी न ढळता, त्याच्याकडे बघत राही. ओहो, ती त्याच्यावर किती प्रेम करे! तिच्या आधीच्या सर्व प्रेमांपेक्षा हे सर्वात खोलवर रुजलेले असे होते. इतका निःस्वार्थीपणे तिचा आत्मा कधी संतुष्ट झाला नव्हता. तिचे मातृप्रेम जसे अधिकाधिक फुलू लागले, तसे तिला जाणवू लागले की पूर्वी ती इतकी आनंदी कधीच नव्हती. तिचा स्वतःचा नसलेला हा, गालाला खळ्या पडणारा, टोपी घातलेला मुलगा, तिला जीवाहून अधिक प्यारा झाला. ती आनंदाने अश्रूभरल्या कोवळीकेने त्याला सांभाळू लागली. का? कोणाला माहित का?

साशाला शाळेत सोडल्यावर, ती सावकाशीने, शांतपणे, समाधानाने घरी आली. गेल्या सहा महिन्यात तिचा चेहरा, तरुण व तेजस्वी झाला होता. भेटणाऱ्या लोकांना तिच्याकडे बघून, प्रसन्नता वाटे, आणि ते म्हणत, “शुभ संध्याकाळ, आवडत्या ओल्गा!, आवडत्या मुली, तू कशी आहेस?”

बाजारात ती म्हणे, “आताशा शाळेचा अभ्यास अवघड झाला आहे. काल त्यांनी पहिलीतील मुलांना एक गोष्ट पाठ करायला दिली होती. शिवाय लॅटीनचे भाषांतर आणि एक गणितातील उदाहरण --- लहान मुलासाठी हे कठीण आहे.”

मग ती साशा बोले तेच सगळे, शिक्षकांबद्दल, क्रमिक पुस्तकांबद्दल व धड्यांबद्दल बोलू लागे.

दुपारी दोन ते तीनच्या दरम्यान ते दोघे एकत्र जेवत. संध्याकाळी ते घरचा अभ्यास एकत्र करत. त्याला झोपवताना, ती खूप वेळ त्याच्यावर क्रॉस काढत व प्रार्थना म्हणत बसे. मग झोपल्यावर ती साशाचा अभ्यास संपून, तो डॉक्टर किंवा इंजिनिअर झाल्याचे, त्याचे मोठे घर असल्याचे, घोडागाडी असल्याचे, लग्न होऊन, मुले झाल्याचे, धुरकट स्वप्न बघे --- ती झोपेतही तोच विचार करत राही. डोळयांमधून तिच्या गालावर अश्रू ओघळत. छोटे काळे मांजर तिच्या शेजारी झोपून गुरगुरत राही.

अचानक गेट ठोठावल्याचा आवाज आल्याने, ती दचकून जागी होत घाबरून गेली. तिचे हृदय धडधडू लागले. अर्धे मिनिट गेल्यावर आवाज वाढला. ती थरथरू लागली.

खार्कोव्हहून तार आहे. ती विचार करून अर्धमेली झाली आहे.

“साशाच्या आईला तो तिथे हवा आहे --- अरे देवा!”

ती कोलमडून पडते. तिचे डोके, हात, पाय बधीर होतात. जगात सर्वात जास्त दुःखी तीच असते. अजून एक मिनिट जाते. तिला आवाज ऐकू येतात, तरुण पशुवैद्यक अधिकारी, स्मिरनीन क्लबमधून घरी येतो आहे.

ती विचार करते, “ठीक आहे. देवाचे आभार!”

तिच्या छातीवरचे ओझे उतरते. तिला हलके वाटते. ती पडते व साशाबद्दल विचार करू लागते. पुढच्या खोलीत तो गाढ झोपलेला आहे व मधून मधून अस्वस्थतेने पुटपुटतो आहे,

“मी तुला दाखवतोच --- चालता हो! भांडण नको!”

Fiancee

# वाग्दत्त वधू



रात्रीचे दहा वाजले होते. बागेमध्ये वरती पूर्ण चंद्र दिसत होता. शुमिन्सच्या घरात आजीने, मार्फा मिखाईलोव्हनाने सगळ्यांना जेवणासाठी जमण्याची आज्ञा देऊन झाली होती. आणि आता नाद्या --- ती क्षणभर बागेत गेली होती --- छोट्याशा जेवणासाठी स्वागत कक्षात टेबल मांडले होते. तिची आजी मोठ्या रेशमी ड्रेसमध्ये लगबग करत होती. चर्चचे धर्मगुरू

वडील अँड्रेई, नाद्याच्या आईबरोबर, नीना इव्हानोव्हनाबरोबर काही बोलत होते. आता खिडकीतून संध्याकाळच्या उजेडात, काही कारणाने खूप तरुण दिसणारी तिची आईपुढे धर्मगुरू वडील अँड्रेईचा मुलगा, अँड्रेई अँड्रेईच लक्षपूर्वक ऐकत उभा होता.

बाग शांत व गार होती. जमिनीवर शांत गडद सावल्या पडल्या होत्या. कुठून तरी खूप लांबून, बहुतेक गावाबाहेरून, बेडकांचे डराव डराव ऐकू येत होते. सुंदर मे महिना चालू होता. नाद्याने खोलवर श्वास घेतला. तिला असा विचार करायचा होता, इथे नाही पण आकाशाखाली कुठेतरी, झाडांवर, गावापासून दूर, जंगलात व शेतात, गूढ, सुंदर, पवित्र आणि श्रीमंत वसंत ऋतु फुलत होता. अशक्त, पापी माणसाना समजण्यापासून तो दूर होता. काही कारणाने तिला रडायचे होते.

नाद्या आधीच तेवीस वर्षांची झाली होती. सोळाव्या वर्षापासून, ती लग्नाबद्दल प्रेमळ स्वप्ने बघत होती आणि आता शेवटी ती खिडकीमागे उभ्या असलेल्या अँड्रेई अँड्रेईचची वाग्दत्त वधू झाली होती. तिला तो आवडत होता. लग्नाची तारीख सतरा जुलै आधीच ठरली होती. तरीही तिथे आनंद नव्हता. ती रात्री नीट झोपली नव्हती. तिचा डौल गेला होता. उघड्या खिडकीपासून जिथे स्वयंपाकघर होते, त्या तळघरापर्यंत,

लोकांची घाई गडबड, सुरीने काही कापल्याचे आवाज, दार जोरात लावल्याचे आवाज, ऐकू येत होते. भाजलेल्या टर्कीचा व तोडलेल्या चेरींचा वास येत होता. काही कारणाने असे वाटत होते, की असे तिच्या आयुष्यभर असेल. त्यात काही बदल होणार नाही व ते संपणारही नाही.

कोणीतरी घरातून बाहेर आले व उभे राहिले. तो अलेक्झांडर टीमोफेईच होता किंवा नुसता साशा, मॉस्कोहून दहा दिवसांपूर्वी आलेला पाहुणा. फार वर्षांपूर्वी एक लांबची नातेवाईक, गरीब विधवा, बारीक, छोटीशी, आजारी सभ्य बाई, आजीकडे पैसे मागायला येत असे. तिचा मुलगा म्हणजे साशा. काही कारणाने तो सुंदर चित्रकार बनला होता. आणि जेव्हा त्याची आई वारली, तेव्हा आजीने त्याच्यावर दया दाखवून, त्याला मॉस्कोच्या कोमिसारोव्ह शाळेत पाठवले. दोन वर्षांनी तो ललित कलेच्या शाळेला गेला व तिथे जवळजवळ पंधरा वर्षे राहिला. त्याने वास्तुशास्त्राचा अभ्यास फार चांगल्या तऱ्हेने नव्हे, पण पूर्ण केला. पण वास्तुशास्त्रातील काम न करता, तो मॉस्कोच्या छापखान्यात काम करे व दर उन्हाळ्यात आजीकडे येई. बहुधा आजारी असे आणि मग बरा होई.

त्याने आता कोट आणि मागील बाजूस झिजलेली, गबाळी पँट घातली होती. त्याचा शर्ट चुरगळलेला होता. त्याचा एकंदरीत नूर शिळापाका दिसत होता. तो खूप बारीक होता. मोठे डोळे, लांबसडक बोटे, काळी दाढी होती पण तरीही देखणा दिसत होता. त्याचे स्वतःचे कुटुंब असल्यासारखा तो शुमिन्सच्या घराला सरावलेला होता. त्याला तेथील लोकांबरोबर घरच्यासारखे वाटे. तेथील त्याची खोली खूप वर्षे साशाची खोली म्हणून ओळखली जाई.

घराबाहेर उभा राहून, त्याने नाद्याला पाहिले व तिच्याजवळ गेला.

तो बोलला, “इथे छान आहे.”

“अर्थात, इथे छान आहे. तू इथे हिवाळ्यापर्यंत राहिले पाहिजेस.”

“हो. मी बहुतेक राहेन. कदाचित सप्टेंबरर्यंत मी तुझ्याबरोबर राहेन.”

काही कारणाशिवाय तो हसला आणि तिच्याशेजारी बसला.

नाद्या म्हणाली, “मी इथे बसून ममाला बघते आहे. ती इथून इतकी तरुण दिसते. थोडे थांबून ती बोलली, “अर्थात माझ्या ममाला काही आजार आहेत. पण तरी ती असाधारण बाई आहे.”

साशाने कबूल केले, “हो, तुझी ममा अर्थात फार दयाळू व चांगली बाई आहे. पण --- मी हे कसे बरे सांगू? आज सकाळी लवकर मी तुमच्या स्वयंपाकघरात गेलो होतो. तिथे फरशीवर चार नोकर झोपले होते. अंथरूण नाही, चादरींऐवजी चिंध्या, वाईट वास, ढेकूण, झुरळे --- वीस वर्षांपूर्वी होते, तसेच. काही फरक नाही. पण तुझी आजी, देव तिचे भले करो, आजा अशा असतात. पण तुझी ममा फ्रेंच बोलते. नाटकांमधून कामे करते. मला वाटते, तिला समजेल.

साशा बोलत असतांना, त्याने त्याची दोन सडपातळ बोटे तिच्यापुढे ठेवली होती.

त्याने पुढे चालू ठेवले, “मला इथले सर्व रानटी वाटते. कारण मला त्याची सवय नाही. सैतानाला माहिती आहे, कोणी काही करत नाही. तुझी आई दिवसभर महाराणी असल्यासारखी फिरत असते. तुझी आजी पण काही करत नाही. आणि तूही! आणि तुझा वाग्दत्त वर, अँड्रेई अँड्रेईचदेखील काही करत नाही.”

नाद्याने हे सर्व मागील वर्षी ऐकले होते. किंवा त्याच्या पलीकडील वर्षी असेल. तिला माहिती होते की साशा काही वेगळा विचार करू शकत नाही. त्यामुळे तिला हसू येई. पण आता काही कारणाने तिला राग आला.

“हे सगळे तेच जुने, कंटाळवाणे आहे.” असे बोलून ती उठली. “काही नवीन शोध लाव.”

तो हसला आणि उठला. दोघेही घराकडे जाऊ लागले. उंच सुंदर, बारीक अशी ती त्याच्या शेजारी खूप सशक्त आणि छान ड्रेस घातलेली दिसत होती. तिला ते जाणवून त्याच्याबद्दल नाराजी वाटली व काहीसे लाजिरवाणे वाटले.

ती बोलली, “तू गरज नसलेले खूप बोलतोस. आताच तू माझ्या अँड्रेई अँड्रेईचबद्दल बोललास, पण तुला तो माहिती नाही आहे.”

“माझा अँड्रेई --- देव त्याचे भले करो. मला वाटते, तुझ्या तारुण्याला ते आवडले नाही.”

जेव्हा ते हॉलमध्ये आले, तेव्हा प्रत्येकजण जेवणासाठी बसत होता. खूप बळकट, घरगुती, जाड भुवया असलेली, लहानशा मिशा असलेली व जोरात बोलणारी आजी! तिच्या आवाजावरून व हावभावांवरून, हे स्पष्ट होते, की ती कुटुंबप्रमुख होती. बाजारात तिचे एक दुकान होते. खांब व बाग असलेले जुने घर होते. रोज सकाळी ती डोळ्यात पाणी आणून, प्रार्थना करे, की तिचा विनाशापासून बचाव कर. तिची सून, नाद्याची आई, नीना इव्हानोव्हना, सोनेरी केसांची, घट्ट अंतर्वस्त्रे घातलेली, नाकाला

चिमटा असलेला चष्मा लावणारी, प्रत्येक बोटात हिऱ्याची अंगठी घालणारी, अशी होती, तर वडील अँड्रेई, वाकलेले, दातरहित व आता ते काही विनोदी बोलणार आहेत, असे वाटणारे, एक म्हातारे गृहस्थ होते. आणि त्यांचा मुलगा, अँड्रेई अँड्रेईच, बळकट, देखणा, नटासारखा व कलाकारासारखा दिसणारा असा, नाद्याचा वाग्दत्त वर होता. ते तिघेही संमोहनाबद्दल बोलत होते.

आजी साशाला बोलली, "माझ्याबरोबर राहून एका आठवड्यात तू बरा होशील. फक्त तू जास्त खायला पाहिजेस. जरा स्वतःकडे बघ. हे भयानक आहे." नंतर स्वतःच्या मुलाकडे वळून आजी बोलली, "खरेच असा उधळ्या मुलगा, मी अजून पाहिला नव्हता."

वडील अँड्रेई हसत सावकाशीने बोलले, "तू दिलेले पैसे मी वाटून टाकले. शापित अशा बधीर डुकरांना मी पोसले."

अँड्रेई अँड्रेईच त्याच्या वडीलांच्या खांद्याला स्पर्श करत बोलला, "मी माझ्या पपांवर प्रेम करतो. चांगला, दयाळू माणूस."

ते सगळे शांत झाले. साशा अचानक हसत सुटला. आणि त्याने तोंडाला रुमाल लावला.

वडील अँड्रेईने नीना इव्हानोव्हनाला विचारले, “म्हणजे तुझा संमोहनावर विश्वास आहे तर?”

तिचा चेहरा गंभीर व कडक ठेवत, नीना इव्हानोव्हना उत्तरली, “मी अर्थात असे म्हणू शकत नाही. पण मला हे कबूल केले पाहिजे की निसर्गात खूप आश्चर्यकारक आणि न समजणाऱ्या गोष्टी आहेत.”

“जरी मला असे वाटते की विश्वास ठेवल्यामुळे, आपल्याला वाटणारे आश्चर्य कमी होत जाते, तरी मी तुझ्याशी पूर्णपणे सहमत आहे.”

मोठा, जाड टर्की खायला आणला गेला. वडील अँड्रेई व नीना इव्हानोव्हना यांचे संभाषण चालू राहिले. नीनाच्या हातातील हिरे चमकत होते. नंतर तिच्या डोळ्यात अश्रू चमकू लागले. ती उदास झाली.

ती म्हणाली, “मी तुझ्याबरोबर वाद घालू शकत नाही. तरी तुला हे मान्य केले पाहिजे, की आयुष्यात न सुटलेली अनेक कोडी असतात.”

“त्यातले एकही मी तुला सोडवून दाखवू शकत नाही.”

जेवणानंतर अँड्रेई अँड्रेईचने व्हायोलीन वाजवले आणि नीनाने त्याला पियानोवर साथ दिली. दहा वर्षांपूर्वी त्याने

विद्यापीठातून भाषाशास्त्रात पदवी मिळवली पण तो कुठे काम करत नव्हता. नक्की स्वरूपाचा व्यवसाय असा नव्हता. कधीकधी तो मैफिलीत भाग घेई व कलाकार म्हणून ओळखला जात असे.

अँड्रेई अँड्रेईचने वाजवलेले सर्वांनी शांतपणे ऐकले. टेबलावर चहा होता. तो फक्त सशाने प्यायला. मग बारा वाजल्यावर व्हायोलिनची एक तार अचानक तुटली. सगळे हसले आणि घाईघाईने एकमेकांचा निरोप घेऊ लागले.

तिचा वाग्दत्त वर निघून गेलेला पाहिल्यावर, नाद्या वरती तिच्या खोलीत गेली. तिथे ती तिच्या आईबरोबर रहायची. [ आजी तळमजल्यावर रहायची. ] खाली हॉलमधले दिवे मालवले गेले. पण साशा अजून तिथे बसून चहा पीत होता. तो नेहमी खूप वेळ चहा पीत बसे. मॉस्कोच्या पद्धतीप्रमाणे, एका वेळी सात पेले. नंतर बऱ्याच वेळाने नाद्या कपडे काढून झोपायला गेली, तेव्हा तिला खाली नोकर काही आवराआवरी करतानाचा व आजी रागावलेली असल्याचा आवाज येत होता. शेवटी सर्व काही शांत झाले. फक्त त्याच्या खोलीतून साशाचा मधूनमधून खोकण्याचा आवाज येत राहिला.

## II

जेव्हा नाद्या उठली, तेव्हा रात्रीचे दोन वाजले असावे. पहाट फुटत होती. लांबवर कुठेतरी पहारेकरी मोठ्याने आवाज काढत होता. तिला झोपायचे नव्हते. तिचा बिछाना फार मऊ असून, आरामशीर नव्हता.

त्या मे महिन्यातील आधीच्या सर्व रात्रींसारखी ती अंथरुणावर उठून बसली व विचार करू लागली. काल रात्रीसारखेच ते विचार त्रासदायक, एकसुरी व वरवरचे होते. अँड्रेई अँड्रेईचने तिचा कसा अनुयय सुरु केला व लग्नाची मागणी घातली, तिने ती मान्य केली आणि हळूहळू या दयाळू, बुद्धिमान माणसाला ती नावाजू लागली. पण आता काही कारणाने, लग्नाला एक महिन्यापेक्षा कमी दिवस राहिलेले असतांना, तिला अचानक काहीतरी वाईट होण्याची भीती व काळजी वाटू लागली.

“टिक टॉक टिक टॉक --- “ असा आवाज काढत पहारेकरी सावकाशीने चालला होता.

मोठ्या, जुन्या खिडकीतून तिला बाग दिसत होती. पुढे गच्च फुललेली लिलीची फुले होती. थंडीने ती मलूल झाली होती. त्यावर पांढरे धुके पसरुन त्याना झाकून टाकत होते. लांबवरच्या झाडांमध्ये, झोपेचा अंमल चढल्यासारखे वाटत होते.

“अरे बापरे, हे मला इतके का छळते आहे?”

कदाचित प्रत्येक वधूला लग्नापूर्वी असेच वाटत असावे. कुणाला माहित! की हा साशाचा परिणाम आहे? पण साशा तर अनेक वर्षे तेच तेच सांगतो आहे आणि तो जेव्हा ते सांगतो, तेव्हा ते विचित्र व मूर्खपणाचे वाटते. पण ती साशाला तिच्या डोक्याबाहेर का घालवू शकत नाही? का?

खूप वेळापूर्वी पहारेकऱ्याने आवाज करणे थांबवले. खिडकीखाली व बागेत पक्षी किलबिल करू लागले. धुके निघून गेले. हसरी सकाळ छान उजाडली. वसंत ऋतुच्या आगमनाने व सूर्याच्या किरणांनी बागेला नवचैतन्य मिळाले. पानांवर दवबिंदू हिऱ्यासारखे चमकू लागले. ती जुनी, दुर्लक्षित बाग छानपैकी तरुण आणि सजवलेली दिसू लागली.

आजी आधीच जागी झाली होती. साशाने कफ थुकला. खाली चहा टेबलावर ठेवल्याचा व खुर्च्या हलवल्याचा आवाज आला.

वेळ फार हळू जात होता. नाद्या केव्हाच उठली होती व बागेत फिरत होती. पण सकाळ अजून लांबत चालली होती.

मग नीना ओल्या डोळयांनी पाण्याचा पेला घेऊन आली. आली. ती होमिओपॅथी, भुताटकी याबद्दल बरेच वाचत होती.

तिला असलेल्या शंकांबद्दल ती बोलत असे. नाद्याला या सर्वामागे खोल, गूढ अर्थ आहे, असे वाटे. आता नाद्याने तिच्या आईचे चुंबन घेतले व तिच्याशेजारी चालत गेली.

तिने विचारले, ”आई, तू का ओरडत होतीस?”

नीना पेय पीत म्हणाली, “काल रात्री मी एका म्हाताऱ्याचे व त्याच्या मुलीचे वर्णन करणारी गोष्ट वाचायला सुरवात केली. तो म्हातारा कुठल्यातरी कार्यालयात काम करत असतो. त्याचा वरिष्ठ म्हाताऱ्याच्या मुलीच्या प्रेमात पडतो. मी ती संपवली नाही. पण त्यातील एक परिच्छेद वाचल्यावर मला रडल्यावाचून रहावेना. आज सकाळी ते आठवून, मला अजून थोडे रडू आले.”

काही वेळाच्या शांततेनंतर, नाद्या बोलली, “मला अलीकडे फार उदास वाटते आहे. मला रात्री झोप का येत नाही?”

प्रिय मुली, मला माहित नाही. मला जेव्हा झोप येत नाही, तेव्हा मी माझे डोळे असे घट्ट मिटून घेते. आणि मी ॲना कॅरेनिना असल्याचे चित्र रंगवते. ती कशी चालते व बोलते. किंवा मी जुन्या जगातील काही ऐतिहासिक चित्र रंगवते.”

नाद्याला वाटले की तिची आई तिला समजू शकत नाही. हे तिला आयुष्यात पहिल्यांदा वाटले व त्यामुळे ती घाबरली. तिला स्वतःला लपवावेसे वाटत होते. ती तिच्या खोलीत गेली.

दोन वाजता, ते जेवायला बसले. तो बुधवार होता. उपासाचा दिवस होता. त्यामुळे आजीला मास नसलेले बीटचे सूप, ब्रीम मासा व पुडिंग दिले गेले.

आजीला चिडवण्यासाठी साशाने त्याचे मास असलेले सूप व आजीसाठी केलेले बीटचे सूप असे दोन्ही प्यायले. ते जेवत असतांना तो सतत विनोद करत होता. पण ते विचित्र होते. ते काही बोध घेण्यासाठी तयार केले असावेत, त्यामुळे ते तितकेसे विनोदी वाटत नव्हते. चटपटीतपणा दाखवण्यापूर्वी त्याने त्याची लांब, निर्जीव वाटणारी, बारीक बोटे उंचावली. कुणाला असे वाटले असते की तो फार जगणार नाही आणि त्यामुळे त्या कुण्या एखाद्याला रडूही आले असते.

जेवणानंतर आजी तिच्या खोलीत विश्रांतीसाठी गेली. नीनाने थोडा वेळ पियानो वाजवला आणि मग तीही गेली.

साशाने त्याचे जेवणानंतरचे नेहमीचे संभाषण सुरु केले. “अग प्रिय नाद्या, जर तू माझे ऐकलेस तर! जर तू माझे --- “

ती डोळे मिटून एका जुन्या खुर्चीत खोल बसली होती. तर तो खोलीत फेऱ्या मारत होता.

तो म्हणाला, “जर तू कुठे जाऊन थोडा वेळ अभ्यास केलास, तर तुला कळेल की फक्त साक्षात्कार झालेले पवित्र

लोकच रुचीपूर्ण असतात. त्यांचीच फक्त गरज असते. असे जास्त लोक असतील, तर पृथ्वीवर देवाचे राज्य येईल. तुमच्या गावात मग दगडावर दगड रहाणार नाही --- सर्व काही उलटेपालटे होऊन जाईल. सर्व काही जादूसारखे बदलेल. तिथे भव्य, प्रशस्त घरे असतील. नवलपूर्ण बागा असतील. असामान्य कारंजी असतील. उल्लेखनीय लोक असतील --- पण त्याचे एवढे काही नाही. मुख्य म्हणजे आता आहे तशी वाईट गर्दी नसेल. कारण प्रत्येक मनुष्याला विश्वास असेल. प्रत्येकाला तो कशासाठी जगतो, ते माहिती असेल. कोणालाच गर्दीकडून काही आधाराची गरज नसेल. माझ्या प्रिय, माझ्या आवडत्या मुली, जा. त्यांना दाखव की हे शिळे, करडे, पापी आयुष्य तुम्हाला चिकटले आहे. हे तू निदान स्वतःला तरी दाखव."

"हे अशक्य आहे, साशा मी लग्न करते आहे."

"ओहो, बास झाले. कोणाला त्याची गरज आहे?"

ते बाहेर बागेत जाऊन थोडे फिरले.

"आणि तसेही माझ्या लाडके, तू हे समजून घेतले पाहिजेस, की हे तुझे आळशी आयुष्य किती अतात्विक आहे उदाहरणार्थ, तुला हे कळले पाहिजे की जर तू, तुझी आई आणि तुझी प्रिय आजी, यांनी काही केले नाही, तर त्याचा अर्थ कोणीतरी दुसरे

तुमच्यासाठी काम करते आहे. म्हणजे तुमचे आयुष्य त्यांच्यावर अवलंबून आहे. हे स्वच्छ आहे की घाणेरडे?”

नाद्याला बोलायचे होते, “हो, ते खरे आहे. तिला ते समजले आहे. पण तिच्या डोळयातून अश्रू येऊ लागले. ती अचानक गप्प झाली. स्वतःत बुडाली आणि तिच्या खोलीत निघून गेली.

संध्याकाळी अँड्रेई अँड्रेईच आला व नेहमीप्रमाणे, त्याने खूप वेळ व्हायोलीन वाजवले. सहसा तो फार बोलत नसे. त्याला व्हायोलीन आवडत असे. कदाचित ते वाजवतांना शांत रहाता येते, म्हणून असेल. सहानंतर घरी जातांना त्याने नाद्याला मिठी मारून, तिचे हात, खांदे व चेहरा चुंबायला सुरवात केली.

तो पुटपुटु लागला, “माझी आवडती, माझी गोड, माझी सुंदर --- ओहो, मी किती आनंदी आहे. मी आनंदाने वेडा झालो आहे.”

तिला वाटले की तिने हे फार पूर्वीच ऐकले आहे, फार पूर्वी, किंवा कुठेतरी वाचले आहे --- कदाचित जुन्या, फेकून दिलेल्या कादंबरीत.

हॉलमध्ये साशा टेबलावर बसून चहा पीत होता. त्याच्या पाच लांब बोटात त्याने बशी धरली होती. आजी पेशन्स खेळत होती. नीना वाचत होती. दिव्यातील वात फडफडत होती. .सर्व

काही शांत व आनंदी दिसत होते. नाद्याने शुभरात्री म्हटले व वर तिच्या खोलीत गेली, पडली आणि लगेच तिला झोप लागली. पण आधीच्या रात्रीसारखी ती पहाटेच्या पहिल्या किरणाबरोबर उठली. तिला झोपायचे नव्हते. तिचे मन जड झाले होते. ती गुडघ्यांवर डोके ठेवून बसली आणि अँड्रेई अँड्रेईचबद्दल व लग्नाबद्दल विचार करू लागली --- तिला काही कारणाने असे वाटले, की तिच्या आईला तिचा रोगी नवरा आवडत नव्हता आणि ती असा विचार करत असेल, की आता तिच्या मालकीचे काही नाही आणि ती पूर्णपणे तिच्या सासूवर, आजीवर अवलंबून आहे,. नाद्याला कळेना की आजपर्यंत तिला आईत काही विशेष असे असामान्य दिसत होते आणि ती तिच्यातील साधी, सामान्य, दुःखी बाई बघू शकली नाही.

साशाला खाली झोप लागलेली नव्हती --- तिला त्याचा खोकण्याचा आवाज येत होता. नाद्याला वाटले की तो एक विचित्र, गरीब बिचारा माणूस आहे. त्याच्या स्वप्नात, नवलपूर्ण बागा व असामान्य कारंजी आहेत, पण ती काहीशी वेडीवाकडी आहेत. पण काही कारणाने, त्याच्या अंगी, त्याच्या वेड्यावाकड्या विचारातही काहीतरी सुंदर आहे. त्या क्षणी तिला कळेना की अभ्यासिकेत जावे की नाही. तिचे हृदयभरून एक थंड

लहर दौडत गेली. तिला असे जाणवले, तिचा आनंद आणि उत्साह दुथडी भरून वाहतो आहे.

ती कुजबुजली, “असा विचार करणे बरे नाही. असा विचार करणे बरे नाही. मी असा विचार करणे योग्य नाही,”

लांब कुठेतरी पहारेकरी मोठ्याने आवाज काढत होता. “टिक टॉक --- टिक टॉक --- टिक टॉक – “

## III

जूनच्या मध्यावर अचानक साशाला कंटाळा आला आणि तो मॉस्कोला जाण्याची तयारी करू लागला. तो उदासीनतेने बोलला, “मी या गावात राहू शकत नाही. इथे वाहते पाणी नाही, गटारे नाहीत! मला इथे जेवतांना आजारल्यासारखे वाटते --- स्वयंपाकघरात अशक्य घाण आहे --- “

आजी त्याचे मन वळवायचा प्रयत्न करत होती. काही कारणाने ती कुजबुजत्या स्वरात बोलली, “उधळया मुला, थोडा थांब, अजून सात दिवसांनी लग्न आहे.”

“मला नाही थांबायचे.”

“तू आमच्याबरोबर सप्टेंबरपर्यंत रहाणार आहेस.”

“पण आता मला नाही रहायचे. मला काम करायला गेले पाहिजे.”

उन्हाळा दमट आणि थंड बनला होता. झाडे ओली होती. बागेमधील सर्व काही उदास, न खुणावणारे, झाले होते. एखाद्याला खरेच काम न करावेसे वाटले असते. खालील व वरील खोल्यांमध्ये अनोळखी बायकांचे आवाज ऐकू येत होते. आजीचे शिवणयंत्र खटखटत असे. लग्नाच्या कपड्यांची घाई चालली होती. एकट्या नाद्याचे सहा फर कोट होते. आजीच्या मते त्यातील सर्वात स्वस्त तीनशे रुबल्सचा होता. स्वयंपाकघरात अशक्य घाण असल्यामुळे साशा रागावला होता. त्याच्या खोलीत बसून होता. पण ते रहाण्यासाठी अजून त्याचे मन वळवत होते. त्याने शेवटी एक जुलैच्या आत न निघण्याचे कबूल केले.

वेळ भरभर गेला. सेंट पीटरच्या दिवशी जेवणानंतर नाद्या आणि अँड्रेई अँड्रेईच मॉस्कोव्हस्काया रस्त्यावर नवीन जोडीकरता भाड्याने घेतलेले घर बघायला गेले. ते दुमजली घर होते. पण अजून फक्त वरच्या मजल्यावरचे फर्निचर झाले होते. हॉलमध्ये, लाकडांची नक्षीदार चकचकीत फरशी रंगवली होती. लाकडी खुर्च्या, मोठा पियानो, आणि व्हायोलीनसाठी स्टँड होता. भिंतीवर

मोठे तैलरंगातील चित्र चौकटीत बसवले होते, नग्न बाई आणि तिच्याशेजारी धरायचा भाग तुटलेली जांभळी फुलदाणी!

अँड्रेई अँड्रेईच कौतुकाने उसासा टाकत म्हणाला, ‘‘कलाकार शिष्माचेव्हस्कीने काढलेले हे नवलपूर्ण चित्र आहे.’’

नंतर सजवलेली खोली होती. त्यात गोल टेबल, सोफा आणि वडील अँड्रेईचे पायघोळ झगा व पदके घातलेले चित्र होते. मग ते जेवायच्या खोलीत गेले. तिथे कपाटे होती. मग झोपायच्या खोलीत गेले. तिथे अर्धवट अंधार असून एकमेकांना लागून दोन पलंग होते आणि जेव्हा ती सजवली जाईल, तेव्हा तिथे फक्त छानच वाटावे, अशी अपेक्षा होती. अँड्रेई अँड्रेईच नाद्याला खोल्यांमधून फिरवत होता. त्याचा हात सतत तिच्या कंबरेभोवती होता. तिला अशक्त, अपराधी वाटत होते. तिला या सर्व खोल्यांचा, पलंगांचा, खुर्च्यांचा हेवा वाटत होता. नग्न बाई बघून तिला ओकारी आल्यासारखे वाटत होते. आता तिला हे स्पष्ट झाले होते, की ती अँड्रेई अँड्रेईचवर प्रेम करत नाही आहे किंवा कधीच करत नव्हती. जरी ती रात्रंदिवस त्याचा विचार करत होती --- पण हे कसे सांगावे, कुणाला सांगावे, आणि का सांगावे हे तिला समजत नव्हते. तो तिच्या कंबरेला धरत होता, कोवळीकेने, नम्रतेने बोलत होता. या त्याच्या घरात इतका सुखाने फिरत होता,

पण या सर्वात ती कुठे सामावलेली वाटत नव्हती. शोभेची बाहुली व मूर्ख वाटत होती आणि तिच्या कंबरेभोवतीचा त्याचा हात, तिला गार व कडक लोखंडी कडे वाटत होते. ती पळून जायला, रडू फुटायला आणि कुठल्याही क्षणी खिडकीतून उडी मारायला तयार होती. अँड्रेई अँड्रेईचने तिला बाथरुममध्ये आणले आणि भिंतीतील नळाला हात लावला. एकदम पाणी वाहू लागले.

तो हसून बोलला, "कसे वाटते आहे? मी शंभर बादल्या पाणी या टाकीत भरले आहे. आता तुला आणि मला भरपूर पाणी मिळेल."

ते अंगणात फिरले. मग रस्त्यावर गेले व गाडीत बसले. धुळीचे ढग उठले. पाऊस येणार, असे वाटत होते.

अँड्रेई अँड्रेईचने धुळीमुळे डोळे अर्धवट मिटत विचारले, "तुला थंडी वाजत नाही का?"

तिने काही उत्तर दिले नाही.

थोडा वेळ थांबून, तो बोलला, "तुला आठवते, काल साशा मला काही न करण्यावरून टोमणे मारत होता. ठीक आहे. त्याचे बरोबर आहे. मी काही करत नाही व काही करू शकत नाही. प्रिये, असे का? मी टोपीवर बो बांधून, सरकारी नोकरी करेन, या विचारानेही माझ्या अंगावर शहारा येतो. एखादा वकील किंवा

लॅटीन शिकवणारा अध्यापक किंवा गावातील विधानसभेचा सदस्य बघतो, तेव्हा मी इतका मजेत का असतो? ओहो, माझी रशिया आई, तू अजून किती बेकार, आळशी लोकांना तुझ्या पाठीवर वहाणार आहेस? अनेक वर्षे कष्ट काढणाऱ्या आई, माझ्यासारखे तुझ्याकडे किती आहेत?"

त्याने तो काही करत नसल्याचे सामान्यीकरण केले. आणि ती काळाची खूण असल्यासारखे बघितले.

त्याने पुढे चालू ठेवले, "आपण लग्न करू, तेव्हा आपण एकदम गावाला जाऊ. प्रिये, आपण तिकडे काम करू. आपण बागेसकट, नदीजवळ, जमिनीचा एक तुकडा विकत घेऊ. तिथे काम करून छान आयुष्य व्यतीत करू --- ओहो, ते किती छान ठरेल!"

त्याने डोक्यावरून टोपी काढली. त्याचे केस वाऱ्याने उडू लागले. ती विचार करत त्याचे ऐकत राहिली. "देवा, मला घरी जायचे आहे. जवळजवळ घरासमोर त्यांनी वडील अँड्रेईना मागे टाकले.

अँड्रेई अँड्रेईचने आनंदाने टोपी हलवत म्हटले, "ते बघ. माझे वडील चालले आहेत. मी खरेच माझ्या पपांवर प्रेम करतो." त्याने टांग्याचे पैसे देत म्हटले, "चांगला दयाळू माणूस!"

बरे वाटत नसलेली नाद्या रागाने घरात शिरली. तिला वाटत होते आता रात्रभर पाहुणे असतील. तिला त्यांचे मनोरंजन करावे लागेल. हसून व्हायोलीन ऐकावे लागेल. सगळ्या बेकार गोष्टी ऐकाव्या लागतील. आणि त्या फक्त लग्नाच्या गोष्टी असतील. घरात पाहुणे असतांना, नेहमीप्रमाणे ठसक्याने चढेलपणा दाखवत, तिची आजी तिच्या भल्या मोठ्या रेशमी ड्रेसमध्ये मिरवत असेल. वडील अँड्रेई त्यांचे लबाड हसू दाखवत येत असतील.

ते आजीला म्हणाले, “तुझी चांगली तब्येत बघून, मला आनंद झाला व छान आशीर्वाद मिळाले.”

## IV

वारा खिडकीवर, छतावर आदळत होता. त्याचा सूं सूं आवाज येत होता. घरकाम करणाऱ्याचा छोटेसे पारंपारिक गाणे म्हणण्याचा हळू आवाज येत होता. मध्यरात्र उलटून गेली होती. सगळेजण अंथरुणात होते पण कुणाला झोप लागली नव्हती. नाद्याला वाटत होते, की खाली कुणी व्हायोलीन वाजवत आहे. दारावर जोरात ठकठक झाली. बहुधा खिडकीचा पडदा फाडला

गेला. मिनिटाभराने गाऊन घातलेली नीना हातात मेणबत्ती घेऊन खाली आली.

“नाद्या, कसला आवाज होता?”

अशा वादळी रात्री रिबिनीत बांधलेल्या केसांसकट, थोडी वयस्क दिसणारी, तिची छोटीशी आई घाबरून हसत आली. नाद्याला आठवले की आतापर्यंत ती तिच्या आईला कशी असामान्य समजत होती आणि कशी अभिमानाने तिचा प्रत्येक शब्द झेलत होती आता तिला ते शब्द आठवत नव्हते. तिच्या मनात येणारी प्रत्येक गोष्ट कमकुवत व निरुपयोगी होती.

स्टोव्हमधून खर्जातील काही आवाज येत होते. ‘ओ --- ओहो --- अरे देवा --- ‘ असे ते वाटत होते. नाद्या अंथरुणावर बसून म्हणाली, “माझी आवडती ममा, मला काय होते आहे, हे फक्त तुला कळले असते तर! मी तुझी विनवणी करते. मला दूर निघून जाऊ दे. मी तुला विनवणी करते.”

नीनाला काही न समजल्याने, ती अंथरुणावर बसली व तिने विचारले, “कुठे? तुला कुठे जायचे आहे?”

नाद्या खूप वेळ शोक करत राहिली. पण काही बोलू शकत नव्हती.

शेवटी बोलली, ”या गावापासून दूर! तिथे लग्न वगैरे काही नसेल, समजले का? मी या माणसावर प्रेम करत नाही --- मी त्याच्याशी बोलूदेखील शकत नाही.”

नीना फार घाबरून, भरभर बोलू लागली, “नाही, अग माझ्या लाडके, शांत हो --- तुझी मनस्थिती चांगली नाही, त्यामुळे असे होते आहे. हे जाईल. असे होते. कदाचित तुला अँड्रेई आवडेनासा झाला आहे, पण शेवटी प्रेमिकांचे मिलन होतेच.”

नाद्या हुंदके देत बोलली, “मला एकटीला राहू दे. ममा, मला सोड.”

थोड्या शांततेनंतर नीना म्हणाली, “बर. थोडेच दिवसांपूर्वी तू लहानशी मुलगी होतीस. आणि आता तू आधीच वाग्दत्त वधू आहेस. निसर्गात नेहमी उलथापालथ चालू असते. तुला स्वतःलाच कळणार नाही, तू कधी आई होशील व कधी म्हातारी होशील, आणि तुझी मुलगी माझ्या मुलीसारखीच बंडखोर होईल.”

“माझ्या प्रिय दयाळू आई, तू शहाणी आहेस. पण तू आनंदी दिसत नाहीस. माझ्या वक्तव्याने तू खूपच दुःखी झाली आहेस --- तू असे काहीच्या बाही का बोलते आहेस? कृपा करून सांग.”

नीनाला अजून काही बोलायचे होते. पण ती बोलू शकली नाही. ती रडत तिच्या खोलीत गेली. पुन्हा स्टोव्हमधून आवाज येऊ लागले. आणि एकदम काही भीतीदायक झाले. नाद्याने अंथरुणाबाहेर उडी मारली आणि घाईने तिच्या आईकडे गेली. नीनाचा चेहरा रडवेला झालेला होता. ती निळा रग घेऊन एक पुस्तक वाचत पडली होती.

नाद्या बोलली, "ममा, माझे ऐक. मी तुला मला समजून घेण्याची विनंती करते. आपले आयुष्य किती उथळ आणि लाजिरवाणे आहे, हे तुला जाणवते आहे का? आता माझे डोळे उघडले आहेत. मला आता सर्व काही स्पष्ट दिसते आहे. अँड्रेई अँड्रेईच कसा आहे? तो बुद्धिमान नाही, ममा, अरे देवा, तो मूर्ख आहे!"

नीना एकदम उठून बसली.

नाद्या हुंदके देत, छाती पिटत बोलली, "तू आणि आजी मला छळत आहात. मला जगायचे आहे. जगायचे आहे. मला स्वातंत्र्य द्या. मी अजून तरुण आहे. मला जगायचे आहे. तुम्ही तर मला म्हातारी करून टाकलेत!"

ती अती शोक करू लागली. तिने झोपून स्वतःला रगात गुंडाळून घेतले. ती इतकी लहानशी दिसत होती. तिची दया येत

होती. ती वेडी झाली होती. ती तिच्या खोलीत गेली. कपडे करून खिडकीशी बसली. सकाळ होईपर्यंत थांबली. रात्रभर विचार करत राहिली. कोणीतरी खिडक्यांच्या पडद्यावर आघात करत होते व शिट्टी वाजवत दूर जात होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी आजी तक्रार करत होती, की रात्री वाऱ्यामुळे सगळी सफरचंदे तुटून खाली पडली व प्लमचे झाड मोडले. तो करडा, उदास, दुःखी दिवस होता. अंधारामुळे दिवे लावावे लागत होते. सगळे थंडीबद्दल तक्रार करत होते. खिडकीला पाऊस झोडपत होता. चहानंतर नाद्या साशाच्या खोलीत गेली. एकही शब्द न बोलता, कोपऱ्यातील खुर्चीशी गुडघे वाकवून बसून राहिली आणि तिचा चेहरा हाताने झाकून घेतला.

साशाने विचारले, “हे काय आहे?”

ती म्हणाली, “मी नाही सांगू शकत --- मी इथे यापूर्वी कशी राहिले, मला समजत नाही. मला काही उमगत नाही. मला अँड्रेई अँड्रेईच चांगला वाटत नाही. मला हे आळशी, अर्थशून्य आयुष्य बेकार वाटते.“

अजून नक्की काय झाले, हे कळत नसलेला साशा बोलला, “छान! छान! हे काही नाही. हे ठीक आहे.”

नाद्या बोलत राहिली, “मला आयुष्य द्वेषपूर्ण वाटते आहे. मी आता इथे अजून एकही दिवस राहू शकत नाही. उद्या मी निघून जाणार. कृपा करून, मला तुझ्याबरोबर ने.”

क्षणभर साशा तिच्याकडे आश्चर्याने बघत राहिला.

मग त्याच्या लक्षात आल्यावर त्याला एखाद्या मुलासारखा आनंद झाला. तो त्याचे हात हलवून, पाय उचलून आनंदाने नाचू लागला.

त्याचे हात चोळत तो म्हणाला, “मस्त, देवा रे, किती मस्त!”

ती भारून गेल्यासारखी, त्याच्याकडे मोठ्या, प्रेमळ डोळ्यांनी एकटक पहात राहिली. तो लगेच विशेष असे, असीम महत्वाचे काही बोलेल, अशी अपेक्षा करत राहिली. अजून तो काही बोलला नसला, तरी तिला असे वाटत राहिले, की नवे, विशाल व तिला यापूर्वी माहिती नसलेले असे काही, तिच्यासमोर उलगडते आहे. ती आता त्याच्याकडे काही अपेक्षेने पाहू लागली. ती काहीही करायला तयार होती, अगदी मरायलाही.

थोडा विचार करून तो बोलला, “मी उद्या निघतो आहे. आणि तू मला पोचवायला स्टेशनवर येणार आहेस --- मी तुझे सामान माझ्या बॅगेत ठेवेन व तुझे तिकीट काढेन. तिसऱ्या घंटेला तू गाडीत चढशील आणि --- आपण दूर जाऊ. तू मॉस्कोपर्यंत

माझ्याबरोबर रहाशील मग तुझी तू पिट्सबर्गला जाशील. तुझ्याकडे पासपोर्ट आहे का?"

"हो."

साशा उत्साहाने बोलला, "मी शपथेवर सांगतो, तू याचा पश्चात्ताप करणार नाहीस. नक्की करणार नाहीस. तू जाशील. तू अभ्यास करशील. मग तू तुझे नशीब तू ठरव. एकदा तू तुझे आयुष्य फिरवलेस, की मग बाकीचे सर्व बदलेल. तर मग आपण उद्या निघतो आहोत?"

"हो, देवदयेने तसेच होवो."

नाद्याला वाटले, की ती खूप उदास झाली आहे. कधी नाही असे तिचे हृदय जड झाले आहे. आता अगदी त्यांच्या जायच्या दिवसापर्यंत, तिला त्रास होणार व वाईटसाईट विचार मनात येत रहाणार. पण ती वरती तिच्या खोलीत गेल्याबरोबर, अंथरुणावर पडली आणि लगेच तिला गाढ झोप लागली. तिच्या चेहऱ्यावर आसू होते पण हसूही होते.

## V

नाद्याने कोट व टोपी घातली होती. गाडी आली. ती परत एकदा वरती आईला बघायला व तिचे जे जे काही होते, ते

बघायला गेली. तिच्या उबदार बिछान्याशेजारी उभी राहिली. सभोवताली पाहिले. मग शांतपणे आईकडे गेली. नीना झोपलेली होती.

खोलीत शांतता होती. नाद्याने आईचे चुंबन घेतले. तिचे केस सरळ केले. तिथे मिनिटभर उभी राहिली --- आणि मग ती सावकाशीने खाली गेली.

बाहेर जोरात पाऊस पडत होता. टप भिजलेली गाडी उभी होती.

नोकर सामान गाडीत ठेऊ लागल्यावर आजी म्हणाली, “नाद्या, गाडीत तुला पुरेशी जागा नाही. अशा हवेत त्याला निरोप द्यायला कशाला जाते आहेस? घरीच थांब. बघ, कसा पाऊस पडतो आहे.”

नाद्याला काही बोलायचे होते, पण ती बोलू शकली नाही. साशाने तिला गाडीत चढायला मदत केली. तिचे पाय उबदार शालीने झाकले. मग तिच्याशेजारी बसला.

आजीने ओरडून म्हटले, “प्रवासासाठी शुभेच्छा! देव तुमचे भले करो --- आणि साशा, मॉस्कोहून आम्हाला लिही.”

“ठीक आहे, आजी, अच्छा.”

“देव तुमचे रक्षण करो.”

साशा म्हणाला, “हवा ठीक आहे.”

आता नाद्याला रडू फुटले. आता तिची खात्री झाली, की आता तिने घर सोडले. आईकडे बघताना, आजीचा निरोप घेताना, अजून तिचा विश्वास बसत नव्हता. माझ्या प्रिय गावा, अच्छा.” अचानक तिला सर्व काही आठवले. अँड्रेई, त्याचे वडील, नवीन घर, फुलदाणीशेजारील नग्न बाई! पण आता त्याची भीती वाटत नव्हती, दबाव येत नव्हता. ते किरकोळ, मूर्खपणाचे वाटत होते आणि मागे मागे पडत चालले होते. ते गाडीच्या डब्यात बसून, ती सुरु झाली, तेव्हा हा सर्व मोठा भूतकाळ लहानसा झाला व आतापर्यंत फार लक्ष देण्यासारखा न वाटलेला भविष्याचा मोठा पट तिच्यासमोर उलगडू लागला. खिडक्यांवर पाऊस आदळत होता. फक्त हिरवी शेते, तारेचे खांब व पक्षी दिसत होते. अचानक तिच्या श्वासात आनंद भरून राहिला. तिला जाणवले की ती स्वातंत्र्याच्या वाटेवर आहे. अभ्यासाच्या वाटेवर आहे. फार पूर्वी याला दक्षिण रशियात घोडेस्वारी शिकणे व सैन्यात जाणे, म्हणत असत. ती हसली. रडली. तिने प्रार्थना केली.

मोठ्याने हसत साशा म्हणाला, “हे ठी --- क आहे. हे ठी --- क आहे.”

## VI

पानगळीचा ऋतु गेला. हिवाळा गेला. नाद्याला घराची फार आठवण येत होती. रोज ती आईचा, आजीचा व साशाचा विचार करे. घरून येणारी पत्रे शांत, दयाळू असत. सर्व काही विसरले गेले होते. माफ केले गेले होते. परीक्षेनंतर, मेमध्ये, ती घरी गेली. ती छान सशक्त व आनंदी होती. वाटेत ती मॉस्कोला थांबून, साशाला भेटली. तो मागील उन्हाळ्यासारखाच होता.

दाढी वाढलेला, केस विस्कटलेला, तोच कोट घातलेला, तीच पँट घातलेला, तेच मोठे ,सुंदर डोळे, पण अशक्त दिसणारा, खंगलेला, वय वाढलेला पण वजन कमी झालेला, असा तो खोकत होता. काही कारणाने नाद्याला तो करडा व गबाळा वाटला.

तो आनंदाने हसत बोलला, “अरे देवा, नाद्या आली. माझी आवडती, माझी प्रिय!”

थोडा वेळ ते छापखान्यात बसले. तिथे धुरकट होते व बहुतेक भारतीय रंग आणि शाईचा उग्र वास येत होता. मग ते त्याच्या खोलीवर गेले. तिथेही धुरकट व फार पसरलेले होते. टेबलावरील चहाच्या गार किटली शेजारी, एक मोडकी बशी व कागदाचा गडद तुकडा होता. फरशीवर मेलेल्या अनेक माशा

होत्या. साशाचे खासगी जीवन घाणेरडे व गबाळे होते. तो आरामशीर न राहता, कसाही रहात होता. कोणी जर त्याच्या व्यक्तिगत सुखाबद्दल, त्याच्याबद्दल कुणाला वाटणाऱ्या प्रेमाबद्दल, बोलायला सुरवात केली असती, तर त्याला काहीच समजले नसते. तो फक्त हसला असता.

नाद्याने त्याला घाईने सांगितले, की सर्व काही ठरवल्याप्रमाणे नीट झाले. ममा पानगळीच्या दिवसात पिट्सबर्गमध्ये मला भेटायला आली. तिने सांगितले, की आजी रागावली नाही आहे. पण तुझ्या खोलीत जाऊन, भिंतीवर खुणा करत होती."

साशा आनंदी दिसत होता. पण खोकत होता व घोगऱ्या, फुटलेल्या आवाजात बोलत होता. नाद्या त्याच्याकडे निरखून बघत होती. पण तो खरेच गंभीर आजारी होता, की तिला तसे का वाटत होते, ते समजत नव्हते.

ती बोलली, "साशा, लाडक्या, तू फार आजारी आहेस."

"नाही. काही नाही. मी आजारी आहे. पण इतका नाही --- "

नाद्या काळजीने म्हणाली, "ओहो, अरे बापरे! तू डॉक्टरकडे का जात नाहीस? तू स्वतःच्या तब्येतीकडे लक्ष का देत नाहीस? अरे, गोडुल्या साशा," आणि तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू

लागले. काही कारणाने तिच्या कल्पनेत अँड्रेई अँड्रेईच आला आणि तिच्या बालपणाइतकेच दूर भासणारा, फुलदाणीसकट नग्न बाई असलेला, तिला दुःखी करणारा तिचा सगळा भूतकाळ आला. कारण तिला साशा मागच्या वर्षीइतका, नवीन, बुद्धिमान, रुचीपूर्ण वाटत नव्हता. ती म्हणाली, "प्रिय साशा, तू फार फार आजारी आहेस. तुला एवढे क्षीण व चेहरा उतरलेला बघून, मी काय करावे, ते मला कळत नाही. माझ्यावर तुझे खूप उपकार आहेत. तुला कल्पना नाही, की तू माझ्यासाठी काय केले आहेस? माझ्या चांगल्या साशा, तू माझी सर्वात जवळची व आवडती व्यक्ती आहेस."

ते थोडा वेळ एकत्र बसून बोलले. आता नाद्याने पिट्सबर्गमध्ये उन्हाळा घालवल्यावर, साशामध्ये त्याच्या शब्दांमध्ये, हसण्यामध्ये, पूर्ण आकृतीमध्ये, फार वेगळे काही परिवर्तन घडून आले होते. जुन्या वळणाचा, लांब गाणी म्हणणारा साशा कदाचित लयास गेला होता.

साशा म्हणाला, 'मी परवा व्होल्गाला चाललो आहे. आणि मग क्युमीस एक प्रकारचे उत्तेजित पेय पिण्यासाठी, जाणार आहे. माझा एक मित्र व त्याची बायको, माझ्याबरोबर आहेत. त्याची बायको नवलपूर्ण बाई आहे. मी तिला सारखे शिकायला जा

म्हणून कानीकपाळी ओरडत असतो. मला तिने तिचे आयुष्य बदलायला हवे आहे.”

बोलून मग नंतर ते स्टेशनकडे गेले. साशाने तिला चहा व सफरचंदे दिली. जेव्हा गाडी निघाली, तेव्हा त्याने हसून रुमाल हलवला. तिला त्याच्या पायांवरून कळले, की तो फार आजारी आहे आणि जास्त जगणार नाही.

दुपारी नाद्या तिच्या गावात आली. स्टेशनपासून घरी आली. तिला रस्ते मोठे व घरे छोटी, बसकी व लोकांशिवाय असलेली वाटत होती. तिला फक्त पियानो शिकवणारा, विटलेल्या कोटातील जर्मन शिक्षक भेटला. सगळी घरे धुळीने माखलेली होती. खूप म्हातारी झालेली तिची आजी, पूर्वीसारखीच, घरगुती व बळकट होती. ती नाद्याच्या गळयात हात टाकून, खूप वेळ रडली. नाद्याच्या खांद्यांवर तिने तिचा चेहरा घुसळला. ती स्वतःला बाजूला करू शकत नव्हती. नीना पण बऱ्यापैकी वयातीत झाली होती. आणि चांगली दिसत नव्हती. सर्व बाजूंनी खंगली होती. पण तशीच घट्ट कपडे घालणारी व बोटांमध्ये हिऱ्याच्या अंगठ्या चमकवणारी होती.

ती थरथरत म्हणाली, “माझ्या प्रिय मुली!”

मग ते मूकपणे शोक करत बसले. तिची आजी आणि आई दोघींनाही वाटत होते, आता भूतकाळ कायमचा हरवला आहे व तो आता परत येणार नाही. त्यांची समाजातील पतही कमी झाली होती. पहिला मान राहिला नव्हता. आणि त्यांचा लोकांना बोलावण्याचा हक्कही गेला होता. असे तेव्हा होते जेव्हा निष्काळजी रात्री, संथ आयुष्यात मध्यरात्री अचानक पोलीस येतात आणि झडती घेतात. आणि असे शोधून काढतात की घराचा मालक चोर व फसव्या आहे --- आणि मग साधे निष्काळजी आयुष्य संपलेच.

नाद्या वर गेली. तोच पलंग पाहिला. पांढरा पडदा लावलेली, गजबज असलेली, आनंदी, भरपूर प्रकाश असलेली तीच खिडकी पाहिली. तिने टेबलाला स्पर्श केला. थोडा वेळ विचार करत बसली. छान खाल्ले, प्यायले. पण काहीतरी न्यूनत्व जाणवत होते. खोल्यांमध्ये रिकामपणा भरून राहिला होता. छत खाली आल्यासारखे वाटत होते. रात्री ती झोपायला गेली. पांघरूण घेतले. काही कारणाने तिला त्या मऊ, उबदार बिछान्यावर झोपणे मजेशीर वाटत होते.

थोड्या वेळासाठी एखाद्या अपराध्यासारखी घाबरत, नीना येऊन बसली.

थोड्या शांततेनंतर तिने विचारले, “मग कसे काय, नाद्या? तू समाधानी आहेस का?”

“हो, ममा.”

नीना उठली. तिने नाद्यावर व खिडकीवर क्रॉस केला.

ती म्हणाली, “तू बघते आहेस, त्याप्रमाणे मी धर्मवेडी झाले आहे. तुला माहिती आहे का, मी अलीकडे तत्वज्ञानाबद्दल सारखा खूप विचार करत असते --- त्यामुळे मला खूप गोष्टी स्पष्ट होत चालल्या आहेत. मला पहिल्याप्रथम असे वाटते, की सबंध आयुष्य लोलकामधून गेल्यासारखे हवे.”

“ममा, मला सांग, आजी कशी आहे?”

“ती ठीक वाटते. तू जेव्हा साशाबरोबर गेलीस आणि तुझी तार आली, तेव्हा ती तार वाचून तुझी आजी कोलमडली. तीन दिवस ती काही हालचाल न करता, झोपून होती. नंतर ती देवाजवळ प्रार्थना करत रडत राहिली. पण आता ती ठीक आहे.” ती उठून खोलीत फेऱ्या मारू लागली.

पहारेकरी मोठ्याने आवाज काढत होता. टिक टॉक --- टिक टॉक --- टिक टॉक --- “

“मला पहिल्याप्रथम असे वाटते, की सबंध आयुष्य लोलकामधून गेल्यासारखे हवे. दुसऱ्या शब्दात, आयुष्य सात

प्राथमिक रंगांसारखे, सोप्या भागात विभागले जायला हवे आणि प्रत्येक भाग वेगळा वेगळा अभ्यासला जायला हवा.”

नीना अजून काय म्हणत होती, ते नाद्याने ऐकले नाही. ती गेलेली पण तिला समजले नाही कारण ती झोपून गेली.

मे संपला. जून आला. नाद्याला आता घराची सवय झाली होती. तिच्या आजीने मोठ्या उत्साहाने चहा आणून एक लांब सुस्कारा टाकला. संध्याकाळी नीना पूर्वीसारखेच तत्वज्ञानाबद्दल बोलत राहिली. ती घरात उपऱ्यासारखी रहायची आणि पै पै साठी तिला आजीवर अवलंबून रहावे लागायचे. घरात खूप माशा झाल्या होत्या. घराचे छत खाली खाली येऊ लागले होते. वडील अँड्रेई व अँड्रेई अँड्रेईच भेटतील, या भीतीने आजी व आई बाहेर जात नसत. नाद्या बागेत व रस्त्यावर फिरत असे. ती करडे झालेले कुंपण व घर पहात असे. तिला असे वाटे की गावातील प्रत्येक गोष्ट जुनाट झाली असून, मोडकळीस आली आहे आणि नष्ट होण्याच्या प्रतिक्षेत उभी आहे. काही नवीन, ताजे उदयाला येण्याची वेळ झाली आहे. ओहो, हे तेजस्वी, नवीन आयुष्य लवकर यावे. त्यामध्ये कुणालाही धीटपणे आपल्या नशीबाच्या डोळ्यात डोळे घालून पहाता येईल आणि प्रत्येकाला आनंदी, स्वतंत्र रहाण्याचा हक्क असेल. मग ते आयुष्य उशीरा येवो वा

लवकर! त्यावेळी आजीचे हे घर रहाणार नाही, जिथे चार चार नोकरांना तळघरातील घाणीत रहावे लागते, ते घर विसरले जाईल. कुणालाच त्याची आठवण रहाणार नाही. शेजारील घरातील मुले अंगणात खेळत. तेवढीच करमणूक नाद्याला उरली होती. ती बागेत फिरे, तेव्हा हसत हसत ते तिला चिडवत आणि कुंपणावर धक्के मारत. ते म्हणत,

"वाग्दत्त वधू! वाग्दत्त वधू!"

साराटोव्हहून साशाचे पत्र आले. त्याची व्होल्गाची सहल यशस्वी झाल्याचे त्याने नाचऱ्या, आनंदी हातांने लिहिले होते. पण तिथे तो थोडा आजारी पडला. तिथे त्याचा आवाज गेला आणि आता दोन आठवडे तो दवाखान्यात पडून आहे. याचा अर्थ काय हे तिला समजले आणि तिला जे वाटत होते, ते खात्रीत बदलले. पण साशाशी असलेल्या वैचारिक जवळीकेला, ही वाईट बातमी ऐकूनही पूर्वीइतका त्रास झाला नाही. तिला समरसून जगायचे होते. तिला पिट्सबर्गला रहायचे होते. तिची साशाशी असलेली ओळख तिला आता प्रिय वाटू लागली होती. पण ती फार फार वर्षांपूर्वीची वाटत होती. तिला रात्रभर झोप आली नाही. सकाळी ती खिडकीशी बसली. खालून आवाज येत होते. तिची आजी उत्सुकतेने, भरभर कशाबद्दल तरी विचारत होती. मग

कोणी विलाप करू लागले --- जेव्हा नाद्या खाली आली, तेव्हा तिची आजी प्रार्थना करत खोलीच्या कोपऱ्यात उभी होती. तिचा चेहरा अश्रूंनी ओला झाला होता. टेबलावर तार पडली होती.

नाद्या खूप वेळ खोलीत फेऱ्या मारत, आजीचा विलाप ऐकत राहिली. मग उचलून तार वाचली. त्यात लिहिले होते, की आदल्या दिवशी सकाळी, साराटोव्हमध्ये अलेक्झांडर टीमोफेईच उर्फ साशा मृत्यू पावला होता.

आजी आणि नीना धार्मिक विधींसाठी चर्चमध्ये गेल्या. पण नाद्या खूप वेळ खोलीत विचार करत फेऱ्या मारत होती. तिच्या लक्षात आले की साशाला हवे होते, तसे तिचे आयुष्य पूर्णपणे बदलले आहे. इथे ती अगदी एकटी, परग्रहावर असल्यासारखी, तिला इथली काही गरज नसलेली होती. आधीच्या सगळ्या गोष्टी तिच्यापासून दूर निघून, जळून गेल्या होत्या आणि त्याची राख वाऱ्यावर विखुरली होती. ती साशाच्या खोलीत जाऊन काही वेळ उभी राहिली.

तिने विचार केला, "प्रिय साशा, तुला निरोप देते." तिच्या अजून पुसट भासणाऱ्या, गूढ असणाऱ्या, नवीन, विशाल मोठ्या आयुष्याचे चित्र तिला भुरळ घालून साद देत होते.

ती वर सामानाची बांधाबांध करायला गेली. दुसऱ्या दिवशी सकाळी तिने कुटुंबाचा निरोप घेतला. ती नेहमी जसा विचार करे, तसा आनंदी, उत्साही रसरशीत जिवंत असल्यासारखा विचार करत --- तिने गाव सोडले.

# The Lady With The Little Dog

# छोटा कुत्रा बरोबर असलेली बाई



समुद्रकिनारी एक नवीन चेहरा अवतीर्ण झाल्याचे बोलले जात होते. ती छोटा कुत्रा बरोबर असलेली बाई होती. दमित्री दमित्रीच गुरोव्ह याने याल्टामध्ये आधीच दोन आठवडे घालवले होते. तो आता तिथे सरावला होता आणि नवीन चेहऱ्यांमध्ये रस घेऊ लागला होता. व्हर्नेटच्या पडवीमध्ये बसून त्याने, फार उंच नसलेली, सोनेरी केसांची, गोल बसकी टोपी घातलेली एक बाई

समुद्राच्या कडेने चालत असलेली पाहिली. तिच्यामागून, छोटा पॉमेरियन कुत्रा धावत होता.

त्यानंतर शहरातील बागेत, किंवा चौकात, त्याला ती दिवसातून अनेक वेळा दिसली. त्याच टोपीमध्ये, पांढऱ्या कुत्र्याबरोबर ती रमतगमत एकटीच चालत असे. ती कोण आहे, हे कुणालाच माहिती नव्हते. ते तिला छोटा कुत्रा बरोबर असलेली बाई म्हणत.

दमित्रीने विचार केला, ‘तिचा नवरा किंवा मित्र कुणीच इथे नसेल, तर तिची ओळख करून घ्यायची कल्पना काही वाईट नाही.’

तो अजून चाळीशीचा नव्हता. पण त्याला बारा वर्षांची मुलगी व दोन शाळकरी मुले होती. तो कॉलेजच्या दुसऱ्या वर्षात असतांनाच, त्याचे लग्न झाले होते आणि त्याची बायको त्याच्या निम्म्या वयाची दिसे. ती उंच, काळ्याभोर भुवयांची, भारदस्त, सभ्य व विचारी बाई होती. तिचे वाचन खूप होते. नवीन उच्चारशास्त्राप्रमाणे ती तिच्या नवऱ्याला दमित्री नव्हे तर दिमित्री म्हणे. पण खरे तर त्याला ती फारशी हुशार वाटत नसे. त्याला ती संकुचित विचारांची, काही डौलदारपणा नसलेली वाटे. तो तिला घाबरत असे व त्यामुळे की काय, पण तो घरी असणे टाळे. फार

पूर्वीपासूनच तो तिच्याशी विश्वासू नव्हता. बहुधा त्याच कारणाने, तिच्याबद्दल नेहमी वाईट बोलत असे. तो तिला खालच्या जातीची समजे.

कटू अनुभवांमधून त्याला असे शिकवले गेले होते, की तिला वाटेल तसे बोलावे. पण खालच्या जातीच्या तिच्याशिवाय तो दोन दिवसदेखील जगू शकला नसता. पुरुषमंडळींमध्ये तो कंटाळे. सहजपणे भांडणास प्रवृत्त होई. थंड व गप्प असे. पण स्त्रियांमध्ये त्याला मोकळेपणा वाटे आणि काय बोलायचे व कसे वागायचे हेसुद्धा कळे. तो शांत असला, तरी मोकळाढाकळा असे. त्याचे दिसणे, चारित्र्य व त्याच्या पूर्ण स्वभावामध्ये काही आकर्षक असे होते, की ज्यामुळे स्त्रिया मोह पडून, त्याच्याकडे खेचल्या जात. त्याला ते माहिती होते. तो देखील त्यांच्याकडे कुठल्यातरी शक्तीने खेचला जाई.

खरोखर, तो वारंवार येणारा व बराच काळ चालणारा, कटू अनुभव होता. प्रत्येक जवळीक प्रथमतः वेगळ्या प्रकारची सुखदायक व हलकेसे साहस केल्यासारखी वाटे. अटळपणे त्या चांगल्या स्त्रिया असत. पण संभ्रमित गटातील असत --- अगदी हळूहळू सुरवात होत --- ते प्रकरण मोठे व गुंतागुंतीचे होत जाई. शेवटी त्याचे ओझे वाटू लागे. पण एखाद्या रुचीपूर्ण बाईच्या

भेटीतील अनुभव तो विसरून जाई आणि जगण्यासाठी त्याला सर्व काही साधे आणि करमणूक करणारे वाटे.

त्यामुळे, एक दिवस संध्याकाळी तो बागेत बसून रात्रीचे जेवण घेत असतांना, टोपी घातलेली ती बाई येऊन त्याच्या शेजारील टेबलावर बसली. तिचे हावभाव, चालणे, केस व कपडे, यावरून त्याला ती उच्चभ्रू वर्गातील असल्याचे कळले. ती विवाहित व एकटी असून याल्टामध्ये पहिल्यांदाच आलेली होती आणि कंटाळलेली दिसत होती --- स्थानिक मूल्ये बिघडवण्याच्या गोष्टी बऱ्याचशा खोट्या होत्या. त्याला त्याबद्दल चीड होती. त्याला माहिती होते की अशा गोष्टींचा शोध, बिनदिक्कतपणे जाणून बुजून पापे केलेल्या लोकांकडून लावला जातो. पण ती स्त्री जेव्हा त्याच्यापासून तीन पाऊले अंतरावर, त्याच्या शेजारील टेबलावर बसली, तेव्हा त्याला डोंगरदऱ्यातील सोप्या सहलींमार्फत, जिचे नाव सुद्धा तुम्हाला माहिती नाही अशा अनोळखी बाईबरोबर, प्रणयक्रीडा करायचे झटपट मिळालेले तात्पुरते परवानापत्र मिळाल्याच्या गोष्टी आठवल्या. त्या बाईने त्याच्या विचारांचा ताबा घेतला.

त्याने हळूवारपणे बोटे हलवून, कुत्र्याला साद घातली. कुत्रा गुरगुरला. दमित्रीने पुन्हा बोटे हलवली.

त्या स्त्रीने त्याच्याकडे बघितले आणि लगेच नजर खाली वळवली.

“तो चावत नाही.” ती म्हणाली व लाजली.

त्याने विचारले, “मी त्याला हाड देऊ शकतो का?” आणि जेव्हा तिने होकारार्थी मान हलवली, तेव्हा त्याने सहज विचारले, “तुम्ही याल्टामध्ये बराच काळ आहात का?”

“पाच दिवस.”

“माझा इथे फिरण्याचा दुसरा आठवडा आहे.”

थोडा वेळ दोघेही गप्प बसले.

ती त्याच्याकडे न बघता बोलली, “वेळ भरभर जातो. पण तरीही कंटाळा येतो.”

“कंटाळा येतो असे म्हणणे, ही सर्वमान्य गोष्ट आहे. सामान्य माणूस आपल्या कोशात राहून सहसा कंटाळत नाही व मग इथे येतो. ‘ओहो, किती कंटाळवाणे!’ ‘ओहो, किती धुळकट!’ ‘तुम्हाला वाटते, तो स्पेनहून आलेला आहे.’ असे बोलले जाते.”

ती हसते. मग ते शांतपणे परक्यासारखे खात रहातात. पण जेवण झाल्यावर एकत्र फिरतात --- समाधानी, मोकळ्या माणसांचे हलकेफुलके, खेळीमेळीचे संभाषण सुरु होते. ते कुठे जात आहेत किंवा काय बोलत आहेत, याची त्याना फारशी

फिकीर नाही. समुद्रावरील उजेड कसा विचित्र आहे, पाणी कसे किरमिजी, गुलाबी रंगाचे, मऊ आणि कोमट आहे, याबद्दल ते रमतगमत फिरतांना बोलत रहातात. वर चंद्रप्रकाशाचा सोनेरी पट्टा पडलेला आहे. हवा कशी दमट व गरम आहे, याबद्दल ते बोलत रहातात.

त्या गरम दिवसांनतर दमित्रीने सांगितले, की तो भाषातज्ञ आहे पण बँकेत काम करतो. कधीकाळी तो नृत्यनाटयात गायची तयारी करत होता. पण नंतर त्याने ते सोडून दिले. मॉस्कोमध्ये त्याची दोन घरे आहेत --- आणि तिच्याकडून त्याला समजले, की ती पिट्सबर्गमध्ये वाढली, पण लग्न जिथे झाले, तिथे ती दोन वर्षे रहात आहे. याल्टामध्ये ती महिनाभर रहाणार आहे आणि तिचा नवरा कदाचित तिला नेण्यासाठी येणार आहे. कारण त्याला पण थोडी विश्रांती हवी आहे. तिचा नवरा कुठे नोकरी करतो, ते ती नीटपणे सांगू शकली नाही --- पुरवठा आस्थापना कार्यालयात की झेमस्टव्हो परिषदेत --- आणि तिला स्वतःलाच ते विनोदी वाटले. तिचे नाव ॲना सर्गीव्हना असल्याचे दमित्रीला कळले.

नंतर त्याच्या हॉटेलच्या खोलीत तो तिच्याबद्दल विचार करत होता, की उद्या बहुतेक त्याला ती परत भेटेल. असेच होवो. झोपायला जातांना त्याला वाटले, की अगदी अलीकडे ती शाळेत

जाणारी मुलगी असणार आणि त्याची मुलगी आता शिकते आहे, तशीच शिकत असणार. तिच्या हास्यामध्ये व परक्या माणसाशी बोलण्यात, सौष्ठ्वता व आत्मविश्वासाचा किती अभाव होता! अशा परिस्थितीत एकटी असण्याचा, हा तिच्या आयुष्यातील पहिला प्रसंग असावा. तिचा पाठलाग करून, तिच्याकडे पाहिले गेले व एका गुप्त उद्देशाने बोलले गेले, तेव्हा तिच्या ते लक्षात आले असणारच. तिची निमुळती, नाजूक मान व सुंदर करडे डोळे त्याला आठवत होते.

तिच्यात काहीतरी दयनीय असावे, असा विचार करत, तो झोपायला गेला.

## II

त्यांची ओळख झाल्यापासून एक आठवडा गेला. तो रविवार असून, आतून ढगांनी भरलेला वाटत होता. पण बाहेर धुळीचे वादळ होते. टोप्या उडत होत्या. दिवसभर तहान लागत होती. दमित्री नेहमी उपहारगृहाशी थांबून, ॲना सर्गीव्हनाला थंड पेय किंवा आईस्क्रीम घ्यायची विनंती करत असे. त्याची त्यातून सुटका नव्हती.

संध्याकाळी थोडे उन्ह उतरल्यावर, ते बंधाऱ्यावर जाऊन, येणाऱ्या वाफेवरच्या बोटी बघत. तिथे फिरणारे बरेच लोक असत. त्यांच्या हातात पुष्पगुच्छ असे. झकपक कपडे केलेल्या याल्टाच्या गर्दीमध्ये दोन गोष्टी ठळकपणे नजरेस पडत. वयस्क स्त्रियांचे कपडे तरुणींसारखे असत आणि तिथे बरेच जनरल्स असत.

समुद्राच्या स्थितीप्रमाणे बोटी कधी उशीरा येत. सूर्य आधीच मावळला होता. सर्व गर्दी पांगायला अजून बराच वेळ होता. ॲना सर्गीव्हना तिचा एका काडीचा चष्मा डोळयासमोर ठेवून, बोटींकडे व कुणी ओळखीचे आहे का, अशा दृष्टीने त्यातील उतारूंकडे बघत होती. जेव्हा ती दमित्रीकडे वळली, तेव्हा तिचे डोळे चमकले. ती खूप बोलली. तिचे प्रश्न कसेही होते आणि तिने काय विचारले, ते ती नंतर स्वतःच विसरून गेली. मग गर्दीमध्ये तिचा चष्मा हरवला.

झकपक कपडे केलेली गर्दी पांगत होती. आता चेहरे दिसेनासे झाले. वारा पार पडला. दमित्री आणि ॲना कुणीतरी बोटीतून उतरून येणार असल्याची वाट बघत असल्यासारखे, उभे होते. ॲना शांतपणे फुलांचा वास घेत दमित्रीकडे न बघता, उभी होती.

तो बोलला, “आता संध्याकाळी हवा थोडी सुधारली आहे. आता आपण कुठे जाऊया? गाडीतून एखादी चक्कर मारायची आहे का?”

तिने काही उत्तर दिले नाही.

नंतर तो तिच्याकडे टक लावून बघत राहिला व तिला मिठी मारून ओठांचे चुंबन घेतले. त्याच्यावर फुलांचा सुगंध व ओलेपणा येऊन आदळला. त्याने घाबरुन आजूबाजूला बघितले, की आपल्याला कोणी बघितले का!

तो मृदुपणे बोलला, “आपण तुझ्या घरी जाऊ.”

लगेच ते दोघे चालू लागले.

तिची हॉटेलची खोली कोंदट आणि जपानहून आणलेल्या सुगंधी वासाने भरलेली होती. दमित्री तिच्याकडे बघत विचार करत होता, ‘आयुष्यात कोण कोण भेटते! भूतकाळातील निष्काळजी, चांगल्या स्वभावाच्या स्त्रिया, प्रेमाने आनंदी झालेल्या स्त्रिया, त्याना निदान काही काळासाठी आनंदित केल्याबद्दल त्याचे आभार मानणाऱ्या इतर स्त्रिया --- उदाहरणार्थ, गंभीरपणे त्याच्यावर प्रेम न करणारी त्याची बोलभांड बायको, अंगात आल्यासारख्या प्रेमाने, जसे काही प्रेम वा इच्छा नसावीच, पण त्यापेक्षा वेगळे असे काही असल्यासारखे दाखवणारी, त्याची

बायको! थंड पण सुंदर चेहऱ्याआडून, कधीकधी शिकारी पशूसारखे हावभाव दाखवणाऱ्या दोन तीन स्त्रिया, जीवन आपल्याला देते, त्याहून अधिक त्याच्याकडून हिसकावून घ्यायला बघणाऱ्या या स्त्रिया काही त्यांच्या उमलत्या तारुण्यात नव्हत्या. त्या अचानक वागणे बदलणाऱ्या, चढेल, बुद्दू, होत्या. जेव्हा दमित्री त्यांच्यापुढे थंड होई, तेव्हा त्यांचे सौदर्य त्याच्यात द्वेष उत्पन्न करे. आणि त्यांच्या अंतर्वस्त्रांची लेस त्याला मोजपट्टीसारखी भासे.

पण इथे तर एखाद्याने अचानक दार वाजवावे तशी, नवशिक्या तरुणीसारखी, आत्मविश्वासाच्या व सौष्ठ्वतेच्या अभावाची, लाजाळूपणाची व घाबरटपणाची चाहूल दिसून येत होती. छोटा कुत्रा बरोबर असलेली बाई ॲना सर्गीव्हनाने जे झाले, त्याबद्दल अगदी विशेष असा गंभीर दृष्टीकोन घेतला. जसे काही तिचे पतन झाले आहे --- ते विचित्र व अवेळी झालेले काहीतरी, असे तिला तरी वाटत होते. तिचा चेहरा कोमेजून, उतरला. तिचे लांब केस तिच्या चेहऱ्याच्या दोन्ही बाजूंना पडल्यासारखे लोंबू लागले. जुन्या चित्रातील पापी स्त्रीसारखी ती उदास झाल्यासारख्या अवस्थेत बसून राहिली.

ती बोलली, “हे चांगले झाले नाही. माझी बूज न ठेवणारा, तू पहिलाच असशील.”

हॉटेलच्या खोलीतील टेबलावर, कलिंगड पडले होते. दमित्रीने स्वतःसाठी एक फोड कापली व सावकाशीने ती खाऊ लागला. निदान अर्धा तास स्तब्धतेत गेला.

टेबलावरील एकाकी मेणबत्तीने ॲना सर्गीव्हनाचा लहानसा चेहरा उजळला होता. अननुभवीपणा व योग्य वागणुकीचा सच्चेपणा त्यात दृगोचर होत होता. पण तिचे मन अस्वस्थ असल्याचे जाणवत होते.

दमित्रीने विचारले, “मी तुला मान द्यायचा का थांबवेन? तू काय बोलते आहेस, ते तुझे तुलाच समजत नाही.”

अश्रूभरल्या डोळ्यांनी ती म्हणते, “देवा मला क्षमा कर. हे भयंकर आहे.”

“हे, तू तुला न्याय दिल्यासारखे, होते आहे.”

“मीच मला न्याय कसा देईन? .मी वाईट, नीच प्रकारची स्त्री आहे. माझे आयुष्य बेकार आहे, असे मला वाटते आहे. मी मला न्याय द्यायचा विचारही करू शकत नाही. मी माझ्या नवऱ्यालाच नव्हे तर स्वतःलाही फसवले आहे. आणि आताच असे नाही. मी खूप काळ स्वतःला फसवत आले आहे. माझा नवरा चांगला व

प्रामाणिक मनुष्य असेल, पण तो नोकर आहे. मी वीस वर्षांची असतांना त्याच्याशी लग्न केले. मी कुतुहलाने त्रासून गेले होते. मला चांगला बदल हवा होता. मी स्वतःला सांगितले, की लग्नानंतर मला वेगळे आयुष्य जगायला मिळेल. मला जगायचे होते. भरभरून, जगायचे होते. माझे कुतूहल मला जाळत होते --- तुम्हाला ते समजणार नाही. पण देवाशपथ सांगते, मी ते सहन करू शकत नव्हते. मला काहीतरी होत होते. मी मला आवर घालू शकत नव्हते. मी नवऱ्याला आजारी असल्याचे सांगून, इथे आले आहे --- आणि इथे मी मला हरवून बसले आहे. जसे काही मी माझ्यात नाहीच आहे. मला काही कळेनासे झाले आहे. कुणीही मला कसेही वागवावे, अशी फेकून देण्याच्या लायकीची बाई मी झाले आहे.”

दमित्रीला हे ऐकून कंटाळा आला. अशा भलत्याच ठिकाणी पश्चात्तापदग्धतेचे व वेडेपणाची झाक असलेले बोलणे ऐकून, तो रागावला. तिच्या डोळ्यात पाणी नसते, तर एखाद्याला वाटले असते, की ती नाटक किंवा विनोद करते आहे.

तो मृदुपणे म्हणाला, “मला समजत नाही, तुला काय हवे आहे?”

तिने त्याच्या छातीमध्ये चेहरा लपवला व त्याला चिकटली.

ती बोलली, “माझ्यावर विश्वास ठेव. मी तुझी विनवणी करते, माझ्यावर विश्वास ठेव. मला प्रामाणिक व पवित्र आयुष्य आवडते. पाप हे माझ्यासाठी टोकाचे वाईट आहे! मी काय करते आहे, हे मलाच कळत नाही. साधे लोक म्हणतात तसे, ‘वाईट असे काही, मला मोह पाडून फसवते आहे.’ आता मी मला म्हणू शकते, की माझ्या बाबतीत असे होते आहे.”

तो पुटपुटला, “बास. पुरे झाले.”

तो तिच्या घाबरलेल्या डोळ्यांकडे एकटक बघत राहिला. तिचे चुंबन घेतले आणि तिच्याशी हळूवारपणे बोलत राहिला. ती हळूहळू शांत झाली. तिचा पहिला आविर्भाव परत आला. दोघेही हसू लागले. मग ते बाहेर पडले तेव्हा समुद्रकिनारी कुणीही नव्हते. सायप्रसच्या झाडांसकट, गाव मृतवत दिसत होते. पण समुद्राच्या लाटा गर्जना करत किनाऱ्यावर आदळत होत्या. एक बोट लाटांवर हेंदकाळत होती. त्यावरील कंदील मंदपणे जळत होता.

त्याना टॅक्सी मिळून, ते ओरेंडाला गेले.

दमित्री बोलला, “खालील जिन्याजवळच्या जागेमधील फळ्यावर तुझे आडनाव लिहिलेले पाहिले --- व्हॉन --- तुझा नवरा जर्मन आहे का?”

“नाही. त्याचे आजोबा जर्मन होते. मला वाटते, पण तो स्वतः जुन्या विचारांचा पगडा असलेला आहे.”

ओरेंडाला ते चर्चपासून जवळील एका बाकावर समुद्राकडे शांतपणे बघत बसले. सकाळच्या धुक्यातून याल्टा जेमतेम दिसत होते. डोंगरशिखरांवर पांढरे ढग न हलणारे व स्थिर दिसत होते. झाडांची पानेही स्तब्ध होती. चतुर ओरडत होते. खालून शांततेची व चिरनिद्रेची आठवण करून देणारी सागराची एकसुरी गाज येत होती. त्या आवाजात याल्टा नव्हते व ओरेंडाही नव्हते. आपण या जगात नसू, तेव्हाही आवाज आता आहे, तसाच येत रहाणार आहे. या कायमपणात, या प्रत्येकाच्या जीवनमरणाच्या बेफिकीरीत, आपल्या अंतिम मोक्षाची, पृथ्वीवरील सतत चालणाऱ्या जीवनाच्या गतीची व अमर अशा पूर्णत्वाची शपथ दडलेली असेल. पहाटे इतक्या सुंदर बाईच्या शेजारी बसून, त्याला आजूबाजूच्या जादुई दृष्याची भूल पडल्यासारखे झाले होते --- समुद्र, डोंगर, ढग आणि मोकळे आकाश बघून, दमित्रीच्या मनात महत्वाचा असा विचार आला, की मानवी सभ्यपणाची उच्च मूल्ये विसरून, आपण जे काही वागतो, ते सोडून, तुम्ही तसे पाहिलेत तर, जगातील सर्व काही सुंदर आहे.

कोणी मनुष्य आला --- तो वॉचमन असावा --- तो त्यांच्याकडे पाहून, निघून गेला. हे इतके चमत्कारिक वाटले व चांगलेही वाटले. दूरवरून प्रकाशित दिसणारी फियोडोशियाहून येणारी वाफेची बोट, पहाटेच्या अंधुक उजेडात येतांना दिसत होती.

शांततेनंतर ॲना सर्गीव्हना म्हणाली, “गवतावर दंव पडले आहे.”

“चला, परत जायची वेळ झाली.”

ते परत शहरात आले.

त्यानंतर प्रत्येक दुपारी, ते समुद्रकिनाऱ्यावर भेटू लागले. बरोबर जेऊ लागले. बरोबर फिरू लागले. समुद्राला वाखाणू लागले. तिने तक्रार केली, की रात्री तिला झोप आली नाही व तिचे हृदय धडधडत होते. हेवा वाटून, त्रास होऊन, भीती वाटून, ती पुन्हा पुन्हा तेच प्रश्न विचारत राहिली, की तो तिला पुरेसा मान का देत नाही. एखाद्या चौकात, किंवा बागेत, जेव्हा त्यांच्याजवळ कोणी नसेल, तेव्हा तो तिला अचानक जवळ ओढून भावनातिरेकाने चुंबन घेई. त्यांचा आळशीपणा, दिवसाउजेडी आसपास कोणी नाही असे बघून चुंबने घेणे, कोणी बघेल म्हणून घाबरणे, चालू होते. उन्हाळा, समुद्राचा वास आणि सतत त्यांच्या

नजरेसमोर दिसणारे धष्टपुष्ट, सुखवस्तू, चांगल्या कपड्यांमधील लोक त्याला जणू बदलत असत. तो ॲना सर्गीव्हनाला परत परत सांगत राहिला, की ती किती सुंदर व मोहक आहे आणि तो कसा अधीरपणे तिच्या बाबतीत भावनाशील आहे आणि कसा कधीच तिला एकटे पडून देणार नाही. तर ती चिडून, त्याला सतत विचारत राहिली की, तो तिला मान देत नाही व तिच्यावर प्रेमही करत नाही. तिच्याकडे एक उदास वस्तू म्हणून बघतो, हे त्याने कबूल करावे. रात्री उशीरापर्यंत, ते शहराबाहेर ओरेंडाला, कॅसकेडला जात. हे फिरणे यशस्वी झाले. प्रत्येक वेळी त्यांची मते जादुई व देखणी बनत चालली.

ते तिचा नवरा येण्याची अपेक्षा करत होते. पण त्याच्याकडून पत्र आले, की त्याचे डोळे दुखावले आहेत आणि त्याने त्याच्या बायकोला लवकर घरी यायला सांगितले होते. ॲना सर्गीव्हना घाई करू लागली.

ती दमित्रीला बोलली, "मी जाते आहे, हे चांगले आहे. हेच नशीब आहे."

ती टॅक्सीने गेली. तोही तिच्याबरोबर गेला. दिवसभर प्रवास चालू होता. जेव्हा ती एक्सप्रेस गाडीत बसली व दुसरी घंटा झाली, तेव्हा ती बोलली,

“मला तुझ्याकडे परत एकदा पाहू दे. तिथे --- अजून एकदा!”

ती रडली नाही. पण उदास झाली होती. तिचा चेहरा थरथरत होता.

ती म्हणाली, “मी तुझा विचार करेन. तुझी आठवण काढेन. देव तुझे भले करो. माझ्याबद्दल वाईट विचार करू नको. आपण आता कायमचे दुरावत आहोत. हे असेच होणार होते. कारण आपण कधीच भेटायला नको होते. ठीक आहे. देव तुझ्याजवळ असो.”

गाडी लगेच सुटली. तिचे दिवे दिसेनासे झाले आणि काही वेळाने आवाजही ऐकू येईनासा झाला. जणू नकळत घडलेल्या या गोड बेकायदेशीर घटनेचा, वेडेपणाचा, मुद्दाम झटपट शेवट केला गेला. गाडीचा फलाट नुसता बघत राहीला.

दमित्रीला तो आताच जागा झाल्यासारखी, दूरवरून चतुराची गुणगुण व टेलेग्राफच्या तारांचा आवाज ऐकू येत होता. आता आयुष्यातील अजून एक साहस व प्रकरण संपले व फक्त आठवणी उरल्या, असा विचार तो करत होता --- तो हेलावला गेला, दुखावला गेला. त्याला थोडा पश्चात्ताप होत होता. त्याच्याबरोबर आनंदी नसलेल्या तिला आता तो कधीच पाहू

शकणार नव्हता. पण तो तिच्याबाबतीत प्रेमळ आणि प्रामाणिक होता. तिच्यापेक्षा जवळजवळ दुप्पट वयाच्या असलेल्या त्याने, जरी त्यात थोडी फसवणुकीची छटा असली व आनंदी माणसाचा उद्दामपणा असला, तरी हळूवारपणे बोलून व स्पर्श करून, तिला दिलासा दिला होता. तिला तो दयाळू, उंच, वेगळ्याच प्रकारचा, असा वाटला. खरा तो कसा होता, हे तिला समजलेच नाही. त्यामुळे नकळत त्याने तिला फसवले ---

इथे स्टेशनवर आधीच हिवाळा सुरु झाला होता. वारा गार होता. फलाट सोडतांना, दमित्री बोलला, “बराच वेळ झाला. मी उत्तरेला जायला निघावे, हे बरे.”

## III

मॉस्कोतील घरी सर्व गार झाले होते. स्टोव्ह तापवले जात होते आणि सकाळी मुले शाळेसाठी तयार होत असतांना, त्यांचा चहा पीत असतांना, अंधार असे. त्यामुळे थोडा वेळ दाई दिवा लावे. धुके पडायला आधीच सुरवात झाली होती. जेव्हा पहिला बर्फ पडे, तेव्हा ती बर्फातून गाडी चालवण्याची वेळ असे. पांढरी शुभ्र जमीन बघायला छान वाटे. त्याक्षणी कुणालाही स्वतःचे तारुण्यातील दिवस आठवत. बर्फ पडून जुनी लिंडेन व बर्चची

झाडे पांढरी शुभ्र होत. छतेही पांढरी होत. ते दृष्य छान दिसे. सायप्रस आणि पामची झाडे पण हृदयंगम दिसत. त्यावेळी कुणालाही डोंगर व समुद्राचा विचार करावासा वाटत नसे.

तो मस्त धुके पडलेल्या दिवशी मॉस्कोला परत आला. त्याने त्याचा फर कोट घातला, गरम मोजे घातले आणि पेट्रोव्ह्कामध्ये एक चक्कर मारली, तेव्हा रविवारी संध्याकाळी त्याला घंटा ऐकू आल्या. त्याने अलीकडे भेट दिलेल्या सहलींच्या ठिकाणातील गोडी निघून गेली होती. हळूहळू तो मॉस्कोतील आयुष्यात बुडून गेला. आता तो दर दिवशी अधाशीपणे तीन वर्तमानपत्रे वाचत असे. पण म्हणत असे की मी मॉस्कोची वर्तमानपत्रे तात्विक दृष्ट्या कधीच वाचत नाही. अलीकडे तो क्लब व हॉटेलांमधील जेवणाच्या मेजवान्यांना जाण्याकडे ओढला गेला होता. त्याचे अशील प्रसिद्ध वकील व नट असत. डॉक्टरांच्या क्लबमध्ये तो प्राध्यापकांबरोबर पत्ते खेळायला जाई. भांड्यामधील पूर्ण रशियन सूप तो पिऊ शके ---

एक महिना गेला आता ॲना सर्गीव्हनाच्या आठवणी धुक्याने झाकल्या गेल्यासारख्या त्याला वाटू लागल्या. इतर स्त्रियांप्रमाणे, तिच्या भिडणाऱ्या हास्यासकट ती त्याला स्वप्नात भेटू लागली. अजून एक महिना गेला. थंडीचा कडाका सुरु झाला.

परंतु तिच्या आठवणी, ती कालच गेल्यासारख्या स्पष्ट होत्या. त्या अधिकाधिक गडद होत जात. जेव्हा संध्याकाळच्या शांत वेळी घरचा अभ्यास करतांना मुलांचे आवाज येत किंवा रेडिओवर प्रणयचेष्टा ऐकताना, हॉटेलातील ऑर्गन ऐकताना, धुराड्यातून जोराच्या हिमवादळाचे आवाज ऐकताना, सर्व काही त्याच्या स्मृतीत तरळून जाई. जेट्टीवर, डोंगरावरील पहाटेच्या धुक्यात, फियोडोशियाहून येणाऱ्या बोटी बघतांना, चुंबने घेतानाचे सर्व काही त्याला आठवे. बराच वेळ तो खोलीत येरझऱ्या मारत बसे. तिचे हसणे आठवून दिवास्वप्नात रमून जाई. पूर्वी घडून गेलेले त्याला आताच घडते आहे, असे वाटे. ॲना काही स्वप्न नव्हती. ती सावलीसारखी सतत त्याच्या सोबत राहून त्याला बघत असे. डोळे मिटून ती त्याच्यासमोर जिवंत उभी ठाके. ती अधिक सुंदर, तरूण व नाजूक दिसे व तो स्वतःदेखील याल्टामध्ये तेव्हा होता, त्यापेक्षा तरूण भासे. संध्याकाळी ती पुस्तकाच्या कपाटाआडून, शेकोटीजवळून, कोपऱ्यातून, त्याच्याकडे नजर लावून बसे. त्याला तिचा धपापता श्वास व तिच्या वस्त्रांची सळसळ ऐकू येई. रस्त्याने चालतांना तिच्यासारख्या भासणाऱ्या स्त्रियांचा तो पाठलाग करे ---

कुणाजवळ तरी तिच्या आठवणी सांगण्यासाठी, तो तळमळत होता. पण घरी त्याच्या प्रेमाबद्दल बोलणे अवघड होते.

आणि घरापासून दूर असे कुणी नव्हतेच. त्याच्या भाडेकरूपैकी किंवा बँकेतील कुणीच नाही. आणि तो सांगणार तरी काय? तो प्रेमात पडला होता, असे? ॲना सर्गीव्हनाच्या बरोबरील संबंधात काही काव्यात्मक, सुंदर, सूचक किंवा फक्त रुचीपूर्ण असे काही होते का? तो उगीचच वरवरपणे स्त्रियांबद्दल, प्रेमाबद्दल बोलत राहिला आणि कुणालाही तो काय बोलतो आहे, ते समजले नाही. फक्त त्याच्या बायकोने तिच्या काळ्याभोर भुवया उंचावून म्हटले, “दिमित्री, तुला माहिती आहे का, की तुझा कपड्यांमधील चोखंदळपणा तुला मुळीच शोभत नाही.”

एका रात्री डॉक्टरांच्या क्लबमधून त्याच्या फारशा जवळच्या नसलेल्या भिडूबरोबर निघतांना, त्याला न राहवून तो म्हणाला,

“याल्टामध्ये मला भेटलेल्या मोहक स्त्रीबद्दल तुला कळले असते तर!”

तो भिडू गाडीत बसून निघून गेला. पण अचानक वळून ओरडला,

“दमित्री !”

“काय?”

“तुझे आधीचे बरोबर होते. तो मोठा मासा ---

ते अती सामान्य शब्द ऐकून काही कारणाने दमित्री अचानक, रागावला. ते शब्द त्याला लाजलावणे व अशुद्ध वाटले. इतक्या रानटी पद्धतीने, असे चेहरे! इतके अरुचीपूर्ण, अनुल्लेखनीय दिवस! अनावरपणे पत्ते खेळणे, खादाडपणा, अती पिणे, त्याच त्याच निरुपयोगी गोष्टी बोलत रहाणे ---यामध्ये एखाद्याच्या आयुष्याचा सर्वोत्तम, सर्वशक्तिमान काळ होता. शेवटी हातात काय उरले, तर संकुचित व पंखांशिवायचे आयुष्य, काहीसा वेडेपणा! त्यापासून पळून जाणेही शक्य नव्हते. ते जसे काही वेड्यांचे घर किंवा तुरुंग होता.

दमित्री पूर्ण रात्र झोपला नाही. त्याला वैताग आला होता. त्यामुळे दुसरा दिवसभर डोके दुखत होते. त्यापुढील रात्रीही त्याला नीट झोप आली नाही. तो अंथरुणावरून उठून, विचार करत बसे. खोलीत फेऱ्या मारे. त्याला मुलांचा, बँकेचा कंटाळा आला होता. त्याला कुठेही जायची इच्छा नव्हती व कशाबद्दल बोलायची देखील इच्छा नव्हती.

डिसेंबरच्या सुट्टीमध्ये तो प्रवासासाठी सज्ज झाला व बायकोला म्हणाला, की तो एका तरूण माणसाच्या कामासाठी पिट्सबर्गला जातो आहे. आणि ॲना सर्गीव्हनाच्या गावाला गेला. का, ते त्यालाही नीटसे माहिती नव्हते. त्याला ॲना

सर्गीव्हनाला भेटून तिच्याशी बोलायचे होते. शक्य झाल्यास, तिच्याबरोबर भेटीची वेळ ठरवायची होती.

तो तिथे पोचला. चांगल्या हॉटेलात खोली घेतली. तेथील फरशी करड्या फ्लॅनेलने आच्छादलेली होती. लिखाणसाहित्याने टेबल सुसज्ज होते. तेथील हमालाने त्याला जरुरीची सर्व माहिती दिली. व्हॉन डिडेरीट्झ, ॲनाचा नवरा, स्टॅरोगोन्चारन्या रस्त्यावरील त्याच्या स्वतःच्या घरात रहात असे. चांगले श्रीमंतीचे आयुष्य जगत असे. त्याच्याकडे घोडे होते. गावातील सगळेजण त्याला ओळखत. ते घर हॉटेलपासून फार लांब नव्हते.

स्टॅरोगोन्चारन्या रस्त्यावर दमित्रीने सावकाशीने फेरफटका मारला व ते घर शोधून ठेवले. घरासमोर एक लांबलचक, करडे, काटेरी, कुंपण होते. त्याने खिडकीकडे बघत विचार केला, ‘या कुंपणातून पळून जाणे सोपे आहे.’

तो मनाशी पुटपुटला, आज कामाचा दिवस नाही आणि आज तिचा नवरा बहुधा घरी असेल. सरळ घरात शिरून, अवघड परिस्थिती निर्माण करणे, हे काही युक्तीबाजपणाचे नव्हते. जर निरोपाची चिठ्ठी पाठवली, तर ती नवऱ्याच्या हातात पडून, सर्व ओम फस् होईल. पण संधी घेऊन बघायला काही हरकत नाही. तो तेथील रस्त्यावर, कुंपणापाशी फेऱ्या मारत वाट बघत राहिला.

त्याने एका भिकाऱ्याला गेटमधून आत जातांना व कुत्र्याने त्यावर हल्ला केलेले पाहिले. मग तासाभराने त्याला पियानोचे स्पष्ट पण हलके सूर ऐकू आले. नक्कीच ॲना सर्गीव्हना ते वाजवत असणार. पुढचे दार उघडून, एक म्हातारी बाई बाहेर आली. ओळखीचा छोटा कुत्रा तिच्यामागे धावत होता. दमित्रीला कुत्र्याला हाक मारायची होती. पण अचानक त्याचे हृदय धडधडू लागले. आणि त्या अवस्थेत त्याला कुत्र्याचे नाव आठवेना.

तो वरखाली चालत राहिला. करड्या कुंपणाचा जास्तजास्त दुस्वास करू लागला. निराश होऊन, विचार करू लागला, की ॲना सर्गीव्हना त्याला विसरली असणार. कदाचित कुणा दुसऱ्या माणसाच्या नादीही लागली असणार. सकाळपासून रात्रीपर्यंत, करड्या कुंपणाशेजारून एखाद्या तरूण स्त्रीची वाट बघत बसण्याच्या परिस्थितीत, असले विचार मनात येणे नैसर्गिक होते. तो त्याच्या हॉटेलच्या खोलीवर परत गेला आणि बराच वेळ सोफ्यावर बसून, काय करावे, याचा विचार करू लागला. मग जेवायला गेला. मग मोठी डुलकी काढली.

झोपून उठल्यावर, काळोखी खिडक्यांकडे बघत त्याने विचार केला, ‘हे सर्व किती मूर्खपणाचे आणि उदास करणारे आहे! आता माझी झोप तर झाली. आता मी रात्री काय करणार?’

तो स्वस्त करडा रग पसरलेल्या अंथरुणावर उठून बसला आणि स्वतःला कोसू लागला.

‘तुझ्यासाठी इथे छोटा कुत्रा बरोबर असलेली बाई आहे --- इथे तुझ्यासाठी साहस आहे --- हो. पण तू इथेच बसून आहेस!’

त्या सकाळी स्टेशनवर, त्याला एक मोठे चित्र दिसले. ते लोकांचे मन रिझवणाऱ्या जपानी गैशाच्या कार्यक्रमाचे आमंत्रण होते. त्या थिएटरमध्ये तो गेला.

त्याला वाटले की कदाचित त्या कार्यक्रमाला ती भेटेल.

थिएटर भरलेले होते. सर्व गावांमध्ये असतो, तसा प्रदूषणाचा थर झुंबरांवर चढलेला होता. गॅलरीमधील आवाज टीपेला पोचले होते. कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी काही स्थानिक भपकेबाज लोक रांगांपुढे उभे होते. त्यांचे हात पाठीमागे होते. सर्वात पुढे राज्यपालाच्या खुर्चीत, त्याची मुलगी सुंदरसा मफलर घालून बसली होती. तर राज्यपाल स्वतः नम्रपणे, पण आरामशीरपणे बसला होता. त्याचे फक्त हात दिसत होते. पडदा उघडल्यावर बराच वेळ वाद्यवृंद सुरात लावण्यात गेला. सर्व लोक येऊन आपापल्या जागी बसले. दमित्रीचे डोळे हावरटपणे शोध घेत होते. ॲना सर्गीव्हना आत आली. ती तिसऱ्या रांगेत बसली. तिच्याकडे पाहिल्यावर, दमित्रीचे हृदय धडधडू लागले. जगात

सर्वात महत्वाचे म्हणजे, तिच्या जवळचे असे कुणी तिच्या आसपास दिसत नव्हते. ती गर्दीत हरवून गेली होती. विशेष असे काही नाही. पण एक भिकार चष्मा तिच्या हातात होता. आता त्याचे आयुष्य सुखदुःखाने, नव्हे सुखाने, भरून पावल्यासारखे त्याला वाटले. आता सुखच सुख! वाईट वाद्यवृंदाकडे लक्ष न देता, तो तिच्याकडे स्वप्नाळू नजरेने पहात विचार करत होता, ‘ती किती सुंदर आहे.’

पण तिच्याबरोबर एक माणूस होता. तो तिच्यापुढील खुर्चीत येऊन बसला. खूप उंच, कल्ले असलेला, तालाबरोबर त्याचे डोके पुढेमागे करणारा, असा तो बहुधा तिचा नवरा होता. याल्टामधील तिच्या कटू भावनांचा उद्रेक होण्याच्या काळात तिने त्याला नोकरदार म्हटले होते. आणि खरेच त्याचे लांब कल्ले, उंच आकृती, लहानसे टक्कल यामध्ये थोडा नोकरदारगिरीचा नम्रपणा दिसत होता. त्याचे हसू गोड होते. त्याने लावलेल्या बॅचमधून सुशिक्षित समाजाची सभ्यता डोकावत होती.

पहिल्या मध्यंतरात, तो सिगरेट ओढायला बाहेर गेला. ती तिच्या जागी बसलेली होती. दमित्री उसने हसू आणत, तिच्याकडे जाऊन थरथरत्या आवाजात म्हणाला,

“काय, कसे काय?”

तिने त्याच्याकडे पाहिले. मग तिचा डोळयांवर विश्वास बसेना. घाबरून तिने हातातील पंखा उघडत व चष्मा लावत, स्वतःला चक्कर येण्यापासून कसेबसे वाचवले. दोघे स्तब्ध होते. ती बसलेली होती. तो उभा होता. तिचा गोंधळ पाहून, त्याने तिच्याशेजारी बसायचे धाडस केले नाही. व्हायोलीन व बासरीचे आवाज सुरु झाले. लोक त्यांच्याकडे बघत असल्याने, तिथे भीतीचे वातावरण तयार झाले. पण ती उठून बाहेर पडली. तो तिच्यामागे गेला. गोंधळलेल्या अवस्थेत ते पॅसेज ओलांडून, जिना चढले व उतरले. त्यांना तिथे कोर्टातील गणवेष व राजेशाही इमारती दिसू लागल्या. सर्वत्र स्त्रियांची गर्दी, टांगलेले फर कोट, वहाणारा वारा, या सगळ्यामधून त्यांना सिगरेटचा वास येत होता. धडधडते हृदय घेऊन, दमित्रीने विचार केला, ‘ अरे देवा, एवढे लोक आणि वाद्यवृंद कशासाठी?’

नंतर त्याला अचानक आठवले की तो तिला निरोप द्यायला स्टेशनवर गेला होता, त्यानंतरच्या संध्याकाळी तो स्वतःशी बोलला होता, की आता सर्व काही संपले आणि आता ते परत एकमेकांना कधीही बघणार नाहीत. पण तसे झाले नव्हते!

‘ॲम्फी थिएटरकडे’ असे लिहिलेल्या अंधारी अरुंद जिन्याशी ती थांबली.

धापा टाकत, अशक्तपणे व आश्चर्याने ती बोलली, "तू मला घाबरवून टाकलेस. मी मेलेच असते. तू का आला आहेस? का?"

घाईघाईने, हळू आवाजात तो बोलला, "पण समजून घे. ॲना, समजून घे. मी तुझी विनवणी करतो, समजून --- " तिने घाबरून त्याच्याकडे पाहिले. टक लावून, प्रेमाने व विनंती केल्यासारखे, त्याची छबी मनात साठवून ठेवण्याच्या दृष्टीने पाहिले.

त्याचे न ऐकता, ती बोलत राहिली, "मी इतकी त्रासले होते. मी सर्व वेळ तुझाच विचार करत होते. फक्त तुझाच विचार करून जगत होते. आणि तुला विसरण्याचा प्रयत्न करत होते. पण तू का आलास? का?"

जिन्याच्या चार पायऱ्या चढल्यावर तिथे दोन शाळकरी मुले सिगरेट ओढत खाली बघत होती. पण दमित्रीला काही पर्वा नव्हती. त्याने ॲना सर्गीव्हनाला जवळ ओढून, तिच्या हातांचे, गालांचे व चेहऱ्याचे चुंबन घ्यायला सुरवात केली. ती त्याला दूर ढकलत भीतीने म्हणाली, "तू हे काय करतो आहेस? काय करतो आहेस? आपले दोघांचे मन थाऱ्यावर नाही. आज मला सोड. लगेच सोड --- जे जे पवित्र आहे, त्याला स्मरून, मी तुला

कळकळीने सांगते. तुझ्याकडे भीक मागते --- कोणीतरी येते आहे!”

कुणीतरी जिना चढत होते.

ॲना सर्गीव्हिना कुजबुजत बोलली, “तुला गेलेच पाहिजे. दमित्री, तुला ऐकू येते आहे का? मी तुला मॉस्कोला येऊन भेटेन. मी कधीच आनंदी नव्हते. आताही मी दुःखी आहे. मी कधीच आनंदी होऊ शकणार नाही. कधीच नाही. मला अजून त्रास भोगायला लावू नकोस. मी शपथ घेऊन सांगते, मी मॉस्कोला येईन. पण आता आपल्याला वेगळे झाले पाहिजे. माझ्या प्रिया, माझ्या आवडत्या, माझ्या चांगल्या, आता आपल्याला वेगळे झाले पाहिजे.”

तिने त्याचा हात दाबला. मागे वळून त्याच्याकडे बघत, ती जिना उतरू लागली. तिच्या डोळयांवरुन समजत होते, की ती आनंदी नव्हती --- दमित्री क्षणभर ऐकत, स्तब्ध राहिला. मग सर्व शांत झाल्यावर, त्याचा कोट घेऊन थिएटर सोडले.

## IV

आणि ॲना सर्गीव्हना त्याला भेटायला मॉस्कोला येऊ लागली. दर दोन तीन महिन्यांनी ती तिचे गाव सोडे व नवऱ्याला सांगत असे, की तिच्या काही बायकी तक्रारींसाठी ती एका प्राध्यापकाला भेटायला जाते आहे --- तिचा नवरा तिच्यावर विश्वास ठेवे व ठेवतही नसे. मॉस्कोमध्ये आल्यावर, ती स्लॅव्हयान्स्काय बाजार ३ मध्ये रहात असे व लगेच लाल टोपीतील माणसाला दमित्रीकडे पाठवून ताबडतोप भेटायला बोलावत असे. हे मॉस्कोमध्ये कुणालाही माहिती नव्हते.

एकदा थंडीच्या दिवसात सकाळी, तो तिला भेटायला चाललेला असतांना, [ निरोप्या आदल्या दिवशी आला होता, पण त्याला तो भेटला नाही. ] त्याच्याबरोबर त्याची मुलगी होती तिला त्याच्या वाटेत असलेल्या शाळेत सोडून मग तो ॲनाकडे जाणार होता. मोठा बर्फवर्षाव होत होता.

दमित्री त्याच्या मुलीला म्हणाला, "आता शून्याच्या वर तीन डीग्री तापमान आहे. शिवाय बर्फ पडतो आहे. पण जमिनीजवळ उबदार आहे. पण वातावरणातील वरील थरात तापमान वेगळे आहे."

"पपा, हिवाळ्यात गडगडाट का नसतो?"

त्याने त्याचे स्पष्टीकरण दिले व विचार केला, की तो स्लॅव्हयान्स्काय बाजार ३ मध्ये तिला भेटायला जातो, हे कुणाला अजूनपर्यंत माहिती नाही व यापुढेही माहिती होण्याची शक्यता नाही. त्याची दोन आयुष्ये होती. एक त्याच्या ओळखीच्या व मित्रांच्यासारखे, खरेखुरे दिसणारे व गरज असलेल्या सर्वांना माहिती असलेले, पारंपारिक सत्याने व फसवणूकीने भरलेले! तर दुसरे गुप्तपणे, विचित्र योगायोगाने वा अपघाताने चाललेले चोरटे! त्यात त्याला रुची होती व त्याची ती गरज होती. त्याला त्याचे महत्व होते. त्यात तो प्रामाणिक असून, स्वतःला फसवत नव्हता. तो त्याच्या आयुष्याचा गाभा होता. त्याचा खोटारडेपणा, त्याचे सोंग, सत्यापासून पळून जाण्यासाठी चाललेली लपाछपी --- उदाहरणार्थ, त्याचे बँकेतील काम, क्लबमधील त्याची विधाने, खालच्या जातीच्या बायकोबरोबर हजेरी लावलेले सणसमारंभ --- हे वरवर जोरात चालू होतेच. तो स्वतःवरून, दुसऱ्याला जोखत असे. त्याला जे दिसे, त्यावर तो विश्वास ठेवत नसे. तो धरून चाले, की प्रत्येक माणूस त्याचे खरे व रुचीपूर्ण आयुष्य गुप्त पडद्याआड जगतो. प्रत्येकाचे व्यक्तिगत जगणे, हे गुप्त असते. कारण प्रत्येक सुसंस्कृत माणूस सावधानतेने अशी काळजी घेतो, की त्याच्या व्यक्तिगत गुप्ततेला मान मिळाला पाहिजे.

त्याच्या मुलीला शाळेत पोचवल्यावर, दमित्री स्लॅव्हयान्स्काय बाजार ३ मध्ये जात असे. तो त्याचा फर कोट खाली काढून ठेवे. मग वर जाऊन हळूवारपणे दारावर टकटक करे. त्याचा आवडता करडा ड्रेस घातलेली ॲना सर्गीव्हना आदल्या दिवशी संध्याकाळपासून त्याची वाट बघत बसलेली असे. ती अशक्तपणे त्याच्याकडे बघे. पण हसत नसे. तो यायचा अवकाश, की लगेच त्याच्या छातीवर डोके टेके. त्यांचे चुंबन लांबलचक व रेंगाळणारे असे, जसे काही दोन वर्षात, ते एकमेकांना भेटले नाही आहेत.

तो विचारे, “तुझे तिकडचे आयुष्य कसे चालले आहे? काय नवीन?”

“थांब. मी तुला सांगते --- पण मी हे करू शकत नाही”

ती रडत असल्याने बोलू शकत नाही. ती त्याच्यापासून लांब जाऊन रुमालाने डोळे पुसते.

तो विचार करतो, ‘तिला थोडा वेळ रडू दे. तोपर्यंत मी खाली बसतो. तो खुर्चीत बसतो. मग तो फोन करून चहा मागवतो. तो चहा पीत असतांना ती खिडकीकडे तोंड करून उभी रहाते --- ती काळजी वाटून रडत असते. त्यांचे आयुष्य इतके दुःखी ठरल्याच्या उदास जाणीवेने! ते फक्त गुप्ततेनेच भेटू शकतात!

लोकांपासून ते चोरासारखे लपून जगतात. त्यांचे आयुष्य मोडकेतोडके नाही का?

तो म्हणतो, “आता रडणे बास झाले.”

त्याच्यासाठी हे नक्की असते, की त्यांचे प्रेम एवढ्यात संपणार नाही. कधी संपेल, ते माहिती नाही.

त्याची ॲना सर्गीव्हनाबद्दलची ओढ वाढतच जाते. ती त्याच्यावर मनापासून प्रेम करत असते. हे सर्व केव्हातरी संपणार आहे, असा विचार करणे सुद्ध तिला अविश्वसनीय वाटते.

त्याने तिच्याजवळ जाऊन तिचे खांदे धरून, तिला कुरवाळले. विनोद म्हणजे त्याच वेळेस त्याने आरशात पाहिले.

त्याचे केस करडे होऊ लागले होते. गेल्या काही वर्षात तो वयस्क झाला, हे त्याला विचित्र वाटत होते. त्याचा देखणेपणा कमी झाला होता. त्याने हात ठेवलेले खांदे कोमट होते व थरथरत होते. त्याला तिच्या उबदार आणि सुंदर आयुष्याबद्दल करुणा वाटली. पण ते आता अशा टप्प्यावर येऊन पोचले होते, की ते त्याच्या आयुष्यासारखेच, उतरणीला लागून सुरकुतणार. ती त्याच्यावर इतके प्रेम का करे? स्त्रियांनी त्याला तो होता, त्यापेक्षा नेहमी वेगळेच समजले होते आणि त्याच्यावर प्रेम केले होते. त्याच्यावर नव्हे तर त्या आयुष्यभर हावरटपणे शोधत असलेल्या

कल्पनेतील माणसावर प्रेम केले होते. नंतर जेव्हा त्यांची चूक त्यांच्या लक्षात येते, तरीही त्या प्रेम करत रहातात. आणि त्यापैकी कुणीही त्याच्याबरोबर सुखी नसते. काळ सरतो. त्याला स्त्रिया भेटत रहातात. त्याच्या प्रेमात पडतात. दुरावतात. पण तो कुणावरही कधीच प्रेम करत नाही. ते दुसरे काही असू शकेल, पण प्रेम नव्हे. पण आता त्याचे केस करडे होऊ लागल्यावर, आता अटळपणे तो खरेच प्रेमात पडला होता --- त्याच्या आयुष्यात पहिल्यांदाच.

तो आणि ॲना सर्गीव्हना एकमेकांच्या फार जवळ असून, प्रेमात होते. आवडत्या लोकांसारखे, नवरा बायकोसारखे, कोवळीक असलेल्या मित्रासारखे. त्यांची श्रध्दा होती की नशीबानेच त्यांना इतके जवळ आणले आहे. त्यांना हे समजत नसे, की त्याला बायको व तिला नवरा का आहे. ते वाटेत भेटणाऱ्या दोन पक्ष्यांसारखे आहेत. एक पुरुष आणि एक बाई, ज्यांना पकडून वेगवेगळया पिंजऱ्यांमध्ये डांबले आहे. भूतकाळात घडलेल्या लाजिरवाण्या गोष्टींबद्दल त्यांनी एकमेकांना माफ केले आहे. वर्तमानकाळातील प्रत्येक गोष्टींबद्दल त्यांनी एकमेकांना माफ केले आहे. त्याना वाटते, की या प्रेमाने त्याना दोघांनाही बदलून टाकले आहे. अलीकडे उदास क्षणी तो त्याच्या डोक्यात येतील, त्या स्वतःला सर्व प्रकारच्या वादविवादांना शांत करतो.

पण कुठल्याच वादविवादांची पर्वा करत नाही. त्याला फार सहानुभूती वाटते. त्याला प्रामाणिक, तरल व्हायचे आहे ---

तो म्हणतो, “माझ्या चांगल्या ॲना, रडणे थांबव. खूप रडून झाले --- आता बास --- आता आपण बोलूया. आपण काही विचार करुया.”

छुप्या कारभारापासून, फसवणूकीपासून, वेगवेगळ्या गावी राहून एकमेकांचे दर्शन न होण्यापासून, आपली कशी सुटका करून घ्यावी, याबद्दल खूप वेळ त्यांची चर्चा चालते. या अशा बंधनातून मुक्ती कशी मिळवावी?

त्याचे डोके दाबत तो विचारतो, “कशी? कशी? कशी?”

आणि असे दिसते, की अजून थोडे थांबले की --- उत्तर सापडेल. मग सुंदर नवीन आयुष्य चालू होईल. त्या दोघांनाही हे पुरते कळून चुकले होते, की अजून शेवट बराच लांब आहे, खूप --- लांब आहे. सर्वात अवघड आणि गुंतागुंतीचा भाग आता कुठे सुरु होतो आहे.

## अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे एकोणीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.


मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.


संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५






ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)





























शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (४८ कथा)


ज्या कव्हरवर क्लिक


कराल ते पुस्तक उघडेल




## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.

## डॉ. वृषाली जोशी यांचे हे एकोणिसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशातही राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशीच वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतू मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(२ पुस्तके), शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१७ पुस्तके), शुभांगी पासेबंद (९ पुस्तके), अविनाश नगरकर ( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन

मोरे (२७ पुस्तके), अनील वाकणकर (९), अनंत पावसकर(४ पुस्तके), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(८), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ(भगवद्‌गीता) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।